



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार २८ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०








## मद्य घोटाळ्याच्या आरोपातून केजरीवालांसह

# 22 जणांची निर्दोष मुक्तता

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्लीतील कथित मद्य घोटाळ्याच्या आरोपातून राउज एवेन्यू कोर्टाने माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासह २२ आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. या घोटाळ्याच्या आरोपात अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया, विजय नायर यांच्यासह इतरांवर गंभीर आरोप झाले होते. मात्र या सर्व आरोपातून कोर्टाने निर्दोष मुक्तता केल्यानं अरविंद केजरीवाल यांच्या डोळ्यात अश्रू आले. मोदी-शाह यांनी षडयंत्र रचले आणि आम्हाला भ्रष्टाचारी ठरवले होते असा आरोप केजरीवाल यांनी केला. कोर्टाने आरोपातून निर्दोष मुक्तता केल्यानंतर अरविंद केजरीवाल



भावूक झाले. अरविंद केजरीवाल म्हणाले की, सत्येचा विजय होतो हे आम्ही कायम म्हणत होतो. आमचा भारतीय न्यायव्यवस्थेवर विश्वास आहे. न्यायाधीशांनी आम्हाला न्याय दिला. सत्याचा विजय झाला आहे. आम आदमी पक्षाला संपवण्यासाठी नरेंद्र मोदी-अमित शाह यांनी मिळून सर्वात मोठे षडयंत्र रचले. आमच्या नेत्यांना जेलमध्ये टाकले गेले. विद्यमान मुख्यमंत्र्यांना घरातून बाहेर काढत ६ महिने जेलमध्ये ठेवले. उपमुख्यमंत्र्यांना २ वर्ष जेलमध्ये ठेवले. हे सगळे खोटे गुन्हे होते. आम्हाला भ्रष्टाचारी ठरवण्यात

### कोर्टाच्या निकालानंतर अरविंद केजरीवाल ढसाढसा रडले

येत होते असं सांगताना अरविंद केजरीवाल यांच्या डोळ्यात अश्रू आले. तर मी भ्रष्ट नाही. मी माझ्या प्रामाणिकपणाने जीवन जगतोय. आमच्यावर खोटे आरोप लावले परंतु आज कोर्टात सिद्ध झाले. अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया असो आम आदमी पक्ष हा प्रामाणिक आहे. सत्तेसाठी (पान २ वर)

# 10 वीची परीक्षा देतानाच विद्यार्थिनीची प्रसुती

### अत्याचाराने तपासात पोलिसही हादरले

**धार /प्रतिनिधी :** दहावीचा गणिताचा पेपर सुरू असताना, एका अल्पवयीन विद्यार्थिनीने परीक्षा केंद्रावरील स्वच्छतागृहात एका गोंडस मुलाला जन्म दिल्याची घटना मंगळवारी घडली होती. मध्य प्रदेशातील धार जिल्ह्यात घडलेल्या या घटनेतील अल्पवयीन विद्यार्थिनीबाबत एक धक्कादायक वास्तव समोर आले आहे. एका ओळखीच्या तरुणाने गेल्या अनेक महिन्यांपासून आपल्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याची आपबिती या पीडितेने पोलिसांना सांगितली.धार जिल्ह्यातील एका खासगी शाळेत १० वीच्या बोर्डाच्या परीक्षेचे केंद्र होते.



संबंधित विद्यार्थिनी सकाळी गणिताचा पेपर सोडवण्यासाठी वर्गात बसली होती. सुमारे दोन तास पेपर लिहिल्यानंतर तिला अचानक तीव्र पोटदुखी जाणवू लागली. तिने शिक्षकांकडे विचारणा करून स्वच्छतागृहात जाण्याची परवानगी घेतली. थोड्याच वेळात स्वच्छतागृहातून नवजात बालकाच्या रडण्याचा आवाज आल्याने शिक्षकांनी तिकडे धाव घेतली. तिथे विद्यार्थिनीने एका बाळाला जन्म दिल्याचे पाहून सर्वांनाच धक्का बसला. शाळा प्रशासनाने तातडीने १०८ रुग्णवाहिकेला पाचारण केले. त्यानंतर विद्यार्थीनी आणि बाळाला जवळच्या सामुदायिक आरोग्य (पान २ वर)

### गणिताचा पेपर फुटला

***नागपूर/प्रतिनिधी :*** *बारावीच्या पेपरफूट प्रकरणात अटकेतील आरोपींची कसून चौकशी सुरू असताना आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. आरोपींनी बारावीच्या गणिताचा पेपरदेखील फोडला होता. आरोपींच्या फोनमधील डिलीट झालेल्या व्हाट्सअप चॅटमध्ये गणिताची प्रश्नपत्रिका आढळून आली. ही प्रश्नपत्रिका पाठविणा-या पाचव्या आरोपीचा शोध सुरू आहे.सिव्हिल लाइन्स परिसरातील सेंट उर्सुला हायस्कूलमधील परीक्षा केंद्रावर बुधवार दि.१८ रसायनशास्त्राचा पेपर होता. तेथील एका विद्यार्थिनीच्या मोबाइलमधील* (पान २ वर)

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते चौथ्या विश्व मराठी संमेलनाचे शानदार ऊद्‌घाटन

### मराठी भाषा जागतिक पातळीवर नेण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणार

**कविवर्य कुसुमाग्रजनगरी (नाशिक), दि. २७ :** कृत्रिम बुद्धिमत्ता एआयमुळे अनेक आव्हानांसोबत निर्माण झालेल्या संधींचा वापर करून जागतिक पातळीवर मराठी साहित्य नेण्याचे कार्य मराठी भाषा विभागाच्या माध्यमातून करण्यात येईल. नव्या पिढीत मराठीतील संवाद कौशल्य विकसीत करण्यासाठी भाषेची प्रयोगशाळा (लँग्वेज लॅब) कार्यान्वित करण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. केटीएचएम महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित चौथ्या विश्व मराठी संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, संमेलनाचे निमंत्रक तथा मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, महापौर हिमगौरी आहेर- आडके, खासदार डाॅ. शोभा बच्छाव, खासदार राजाभाउ वाजे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, भाषा विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, विश्व मराठी संमेलनासाठी अमेरिका, जर्मनी, फ्रान्स, नार्वेसह जगातील विविध देशातून मराठी बांधव नाशिक नगरीमध्ये दाखल झाले



आहेत. जगभरातील मराठी माणूस मराठी भाषा आणि महाराष्ट्राचे तेथील सदिच्छा दूत (ब्रॅण्ड ॲम्बेसेडर) आहेत. यांच्या माध्यमातून महाराष्ट्राची संस्कृती आणि वैभव जगभरात पोहोचते, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस यांनी परदेशस्थ मराठी बांधवांना पुढील वर्षी नाशिक त्र्यंबकेश्वर येथे होणा-या सिंहस्थ कुंभमेळ्याला येण्याचे निमंत्रण दिले. मराठी भाषेत सर्वाधिक साहित्य तयार होते. देशात सर्वात समृद्ध रंगभूमी मराठी मुलुखात आहे. इथे (पान २ वर)

### डॉ. भालचंद्र नेमाडे यांचा साहित्यभूषण पुरस्कार, तर मारुतीबाबा कुरेकर यांचा विशेष पुरस्काराने गौरव

**कविवर्य कुसुमाग्रजनगरी (नाशिक), दि. २७ :** गेली काही दशके मराठीची सेवा करणा-या ज्येष्ठ साहित्यिकांसोबत तरुण पिढीदेखील मायमराठीची सेवा करण्यासाठी पुढे येत असल्याने मराठी वैभवाचा रथ असाच पुढे जाईल आणि मराठी सारस्वत मराठी भाषेच्या लौकिकात आणखी भर घालतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्तकेला. मराठीच्या क्षेत्रात मौलिक कार्य करणा-या मान्यवर व्यक्तींना पुरस्कार प्रदान केल्याने पुरस्कारांचे महत्व आणि महात्म्य वाढले आहे, असेही गौरवोद्‌गार मुख्यमंत्री फडणवीस यांनी काढले. मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेच्या केटीएचएम महाविद्यालयाच्या प्रांगणातील कविवर्य कुसुमाग्रज नगरीत आयोजित चौथ्या विश्व मराठी संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी मराठी भाषा विभागातर्फे देण्यात येणा-या राज्य वाड्मय पुरस्कारांचे वितरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. शांतीब्रह्म गुरुवर्य मारुतीबाबा कुरेकर यांनी देशातील हजारो (पान २ वर)

### अभिनेता विजयच्या संसारात वादळ, पत्नीने घटस्फोटासाठी केला अर्ज

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीमधील सुपरस्टार आणि तामिळनाडूच्या राजकारणात नव्याने आलेल्या टीव्हीके पक्षाचा प्रमुख थलपती विजय याच्या संसारात वादळ आले आहे. विजयची पत्नी संगिता हिने २७ वर्षांच्या वैवाहिक जीवनानंतर पती विजय याच्यापासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला असून, तिने घटस्फोटासाठी कोर्टात अर्ज सादर केला आहे.याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार थलपती विजय याची पत्नी



संगीता सोरनलिंगम हिने विशेष विवाह कायदा १९५४ मधील कलम २७(१)(अ) नुसार घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला आहे. विशेष विवाह कायदा १९५४ मधील कलम २७(१)(अ) मधील तरतुदीनुसार पती किंवा पत्नीपैकी कुणीही जिल्हा न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज दाखल करू शकतो. याचा आधार प्रतिवादीने लग्नानंतर पती किंवा (पान २ वर)

### दारू पिउन वाहन चालवल्यास 'ड्रायव्हिंग लायसन' रद्द

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मद्यपान करून वाहन चालवल्याचे दिसून आले तर संबंधिताचे ड्रायव्हिंग लायसन रद्द केले जाईल अशी घोषणा केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली. ते आयसीआयसीयद्वारा आयोजित रस्ते सुरक्षितता कार्यक्रमात बोलत होते. देशातील अपघातांच्या वाढत्या संख्येवर चिंता व्यक्त करून गडकरी म्हणाले, एखादी व्यक्ती मद्यपान करून गाडी चालवत असल्याचे वारंवार दिसून आले तर संबंधित चालकाचे ड्रायव्हिंग लायसन कायमस्वरूपी रद्द केले जाईल.



देशात दरवर्षी पाच लाखांहून अधिक रस्ते अपघात होतात आणि त्यात सरासरी १ लाख, ८० हजार जणांचा अंत होतो. दखलपात्र बाब म्हणजे मृतांमध्ये १८ ते ४५ वयोगटातील लोकांची संख्या ७२ टक्के आहे. तसेच या अपघातांत १८ वर्षांखालील सुमारे दहा हजार जणांचा मृत्यू होतो. सीटबेल्ट आणि हेल्मेटचा वापर न केल्यामुळे वार्षिक सुमारे ६८ हजार जणांना जीव गमवावा लागतो. अतिवेग, वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलणे हीदेखील अपघातांमागील मुख्य कारणे आहेत. हे रोखण्यासाठी प्रामुख्याने युवक आणि किशोरवयीन मुलांवर विशेष लक्ष ठेवण्याच्या गरजेवर गडकरी यांनी भर दिला.




### काळजाचा थरकाप उडवणारा अपघात

# बसची ट्रेलरला धडक, 6 ठार, 7 गंभीर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** राजस्थानातील बालोतरा जिल्ह्यातील सरवडी गावाजवळील राष्ट्रीय महामार्गावर शुक्रवारी भीषण अपघात झाला. महामार्गावरून जाणा-या एका स्लीपर बसने समोर जात असलेल्या ट्रेलरला जोरदार धडक दिली. ही धडक एवढी भीषण होती की बसची उजवी बाजू पुर्ण पणे क्षतिग्रस्त झाली. या अपघातात ६ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला असून अनेक जण गंभीर झाल्याचे समजते.

**प्रवाशांचे मृतदेह बसच्या खिडक्यांबाहेर लटकलेल्या अवस्थेत दिसले -** अपघातानंतर घटनास्थळी अतिशय विदारक दृश्य बघायला मिळाले. माध्यमांतील वृत्तांनुसार, ही धडक एवढी भीषण होती की काही प्रवाशांचे रक्ताळलेले मृतदेह बसच्या खिडक्यांमधून बाहेर लटकलेल्या अवस्थेत




होते. या भयानक दृश्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. दरम्यान हायवेच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. माहिती (पान २ वर)

### पाक-अफगान सीमेवर संघर्ष पेटले! 274 तालिबानी ठार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील सीमा संघर्ष आता युद्धाच्या उंबरठ्यावर आला आहे. गुरुवारी रात्री अफगाणिस्तानने केलेल्या पलटवारानंतर पाकिस्तानने पुन्हा मोठी लष्करी कारवाई केली.



पाकिस्तानी लष्कराने दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री आणि शुक्रवारी पहाटे अफगाणिस्तानच्या २२ लष्करी तळांवर हल्ले करण्यात आले. या हल्ल्यांत सुमारे २७४ तालिबानी ठार झाल्याचा दावा पाकिस्तानने केला आहे. तर १२ पाकिस्तानी सैनिकांचाही मृत्यू झाल्याची कबुली पाक लष्कराने दिली आहे. यासंदर्भात माध्यमांशी बोलताना पाकिस्तानी लष्कराचे प्रवक्ते अहमद शरीफ चौधरी म्हणाले, संपूर्ण कारवाई पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या निर्देशानुसार करण्यात आली. आतापर्यंत २७४ अफगाण सैनिक (पान २ वर)

### पोलीस भरतीसाठी येणा-या उमेदवारांवर रस्त्यावर झोपण्याची वेळ

**मुंबई/प्रतिनिधी :** मीरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या पोलीस भरतीसाठी राज्यभरातून येणा-या उमेदवारांवर भाईंदरच्या मैदानाबाहेरील रस्त्यावर व पदपथावर झोपण्याची पाळी येत आहे. ह्या उमेदवारांसाठी जवळपासच्या परिसरात पालिकेच्या मालमत्ता असून देखील तिकडे व्यवस्था केली जात नाही तर दुसरीकडे पोलीस प्रशासनाकडून देखील उमेदवारांना रस्त्यावर सोडल्याने टीकेची झोड उठत आहे. पोलीस आयुक्तालया मधील रिक्त असलेल्या ८४० पोलीस शिपाई व ८१ चालक शिपाई अश्या एकूण ९२१ (पान २ वर)



पान १ व १० वरून

## 22 जणांची निर्दोष मुक्तता

पंतप्रधानांनी देशाशी खेळू नये. संविधानाशी खेळू नका. तुम्हाला सत्ता हवी तर चांगली कामे करा. आज देशासमोर कित्येक प्रश्न आहे. महागाई, बेरोजगारी त्याशिवाय देशात रस्त्यांची दुरावस्था आहे. सगळीकडे प्रदुषण आहे. चहुबाजूने देशात वेगवेगळ्या समस्या आहेत. त्या समस्यांचे निवारण करून सत्ता मिळवा. केजरीवाल आणि आम आदमी पक्षावर खोटे आरोप का करता असा सवालही केजरीवाल यांनी उपस्थित केला.

**कारस्थान करणे पंतप्रधानांना शोभत नाही-** २४ तास राजकारण करणे, खोटे आरोप करून विरोधकांना अडकवणे, त्यांना जेलमध्ये टाकणे हे पंतप्रधानांना शोभत नाही. त्यातून देश पुढे जाणार नाही. देशातील जनतेचे प्रश्न सुटले तर देश पुढे जाईल असेही केजरीवाल यांनी म्हटले आहे.

**कोर्टाने काय म्हटले?** दिल्लीतील कथित मद्य घोटाळ्याच्या आरोपातून अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया यांच्यासह इतर आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. आरोप सिद्ध करण्यात सीबीआय अपयशी ठरली. या प्रकरणात कुठलेही गुन्हेगारी षडयंत्र दिसत नाही. त्याशिवाय काही ठोस पुरावेही नाहीत. संपूर्ण खटला पाहिला तर त्यात गुन्हेगारी कृत्य झाल्याचे सिद्ध होत नाही. कुठल्याही ठोस पुराव्यांशिवाय एखाद्याला अडकवणे यावरून न्यायाधीश जितेंद्र सिंह यांनी सीबीआयला फटकारले. आरोपपत्रात अनेक त्रुटी आहेत ज्यात पुरावे, साक्षी अपु-या आहेत असेही कोर्टाने म्हटले.

## 10 वीची परीक्षा देतानाच

केंद्रात दाखल करण्यात आले. धारच्या मुख्य वैद्यकीय आणि आरोग्य अधिकारी डॉ. अनिता सिंघार यांनी सांगितले की, प्राथमिक तपासणीनुसार बाळाचा जन्म ३४ व्या आठवड्यात झाला आहे. नवजात बालकाचे वजन सुमारे २ किलो असून बाळ आणि माता दोघांचीही प्रकृती सध्या स्थिर आहे. मात्र, बाळ मुदतीपूर्व जन्मलेले असल्याने आणि वजन कमी असल्याने त्यांना विशेष उपचारांसाठी जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

**पोलिसांकडून पॉक्सो अंतर्गत गुन्हा-** या घटनेनंतर पोलिसांनी विद्यार्थिनीच्या पालकांशी संपर्क साधला. धक्कादायक म्हणजे, आपली मुलगी गरोदर आहे याची पुसटशी कल्पनाही आपल्याला नव्हती, असा दावा तिच्या पालकांनी केला आहे. मुलीचे लग्न ठरले असून ती १८ वर्षांची झाल्यावर तिचे लग्न करून देणार होतो, असेही त्यांनी सांगितले. धारच्या अतिरिक्त पोलीस अधीक्षक पारुल बेलापूरकर यांनी माहिती दिली की विद्यार्थिनीने दिलेल्या माहितीनुसार, शेजारच्या गावातील एका तरुणाशी तिचे गेल्या दोन वर्षांपासून संबंध होते. या प्रकरणात पोलिसांनी बलात्कार आणि पाक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

**गरबा कार्यक्रमात झाली होती ओळख-** गुरुवारी पालकांच्या उपस्थितीत झालेल्या चौकशीदरम्यान पीडितेने सांगितले की, २०२४ मध्ये एका गरबा कार्यक्रमादरम्यान तिची आरोपीशी ओळख झाली होती. त्यानंतर ती वडिलांच्या मोबाईलवरून त्या तरुणाशी संवाद साधत असे. या ओळखीचा फायदा घेत आरोपीने तिच्यावर अत्याचार करण्यास सुरुवात केली.

## गणिताचा पेपर फुटला

*व्हाट्सअ‍ॅप ग्रुपवर परीक्षा सुरू होण्यापूर्वीच पेपर आलेला होता,* तसेच त्याच ग्रुपवर प्रश्नांची उत्तरेसुद्धा आलेली होती. संबंधित विद्यार्थिनीने तिच्या मैत्रिणीचेही नाव सांगितले. विद्यार्थिनींच्या मोबाइलमध्ये १६ फेब्रुवारी रोजी झालेला भौतिकशास्त्राचाही पेपर सापडला. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अनिल दहीफळे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी पेपर फोडणा-यावर गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी एक्सआयआय या व्हाट्सअ‍ॅप ग्रुपचा अ‍ॅडमिन निशिकांत मूल (४५, मानकापूर) व फरहान अख्तर (१९, कामगारनगर), एक्सेलेन्ट अकॅडमीचा संचालक मुस्तफा खान मुनीर खान (४२, भानखेडा) व जुनेद अहमद (४२, हसनबाग) यांना अटक केली. विद्यार्थिनी व आरोपींच्या फोनमधील काही चॅट्स डिलीट झाले होते. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ते चॅट्स परत मिळविण्यात आले. त्यात एका आरोपीच्या मोबाइलवर तिन्हाईत व्यक्तीने २१ फेब्रुवारी रोजी गणिताची प्रश्नपत्रिका परीक्षेच्या वेळेअगोदर पाठविल्याचे स्पष्ट झाले. संबंधित व्यक्तीचा शोध सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. यासंदर्भात सदरचे ठाणेदार अमोल देशमुख यांच्याशी प्रतिक्रियेसाठी संपर्क होउ शकला नाही.

**सलग पेपरफुटीने हादरला बोर्ड-** नागपूर विभागीय बोर्डासाठी यंदाची बारावी परीक्षा वादांच्या भोव-यात अडकली आहे. सर्वप्रथम भौतिकशास्त्राचा पेपर विद्यार्थ्यांच्या मोबाइलमध्ये सापडला. त्यानंतर रसायनशास्त्राचा पेपर परीक्षेपूर्वीच व्हाट्सअ‍ॅप ग्रुपवर फिरत असल्याचे उघड झाले. आता गणिताचाही पेपर फुटल्याचे समोर आल्याने प्रकरण अधिकच गंभीर झाले आहे. सलग तीन विषयांच्या प्रश्नपत्रिका बाहेर कशा पडल्या, याबाबत सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. सायबर तपासातून डिलीट चॅट्स पुनर्प्राप्त झाल्याने प्रकरणाला तांत्रिक व गुन्हेगारी असा दुहेरी आयाम मिळाला आहे. विद्यार्थ्यांचा विश्वास परत मिळविणे हेच प्रशासनापुढील मोठे आव्हान ठरले आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते चौथ्या

नवनवीन नाट्याची निर्मिती होते आणि त्याला प्रतिसाद देणारे रसिकही आहेत. साहित्य, नाट्य आणि लोकगीतांची आवड या भूमीला आहे आणि त्याची जपणूक मराठीने केली आहे. मराठी भाषेमुळे तयार झालेल्या लोकपरंपरांमुळे आपले जीवन समृद्ध झाले आहे. कितीही आव्हाने निर्माण झाली, तरी अभिजात साहित्याला आव्हान मिळू शकत नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. भाषेचा अभिमान बाळगण्यासोबत ती ज्ञानभाषा आणि व्यवहार भाषा होणे गरजेचे आहे. त्यासाठी मराठी विभाग चांगले प्रयत्न करीत आहे, असेही ते म्हणाले. आपल्या इतिहासात स्वभाषेचा अभिमान आणि भाषाशुद्धी सर्वप्रथम शिकवली. परकीय आक्रमकांनी आपल्यावर राज्य केल्याने आपल्या राज्य कारभारात फारसी, अरबी शब्द होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रमाण भाषेचा कोष तयार केला. आधुनिक महाराष्ट्रात भाषा शुद्धीकरणाचे कार्य स्वातंत्र्यवीर सावरकरांनी केले. त्यांनी मराठी भाषेला अनेक नवे शब्द दिले. मराठी भाषेच्या सेवेची ही महान परंपरा नाशिक जिल्ह्याने जोपासली आहे, असे श्री.फडणवीस म्हणाले. तसेच कांदा प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी लवकरच बैठकीचे आयोजन करू, अशी ग्वाही त्यांनी शेतक-यांना दिली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या, नाशिक ही आध्यात्माची राजधानी आहे. ही भूमी, संत, विचारवंत, कवी, लेखकांची भूमी आहे. येथे मराठी भाषेचा कुंभमेळा विश्व मराठी संमेलनानिमित्त भरला आहे. मराठी ही मातीशी जोडलेली भाषा आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी लंडनमध्ये महाराष्ट्र भवन उभारणीसाठी पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. मराठी भाषेचा अभिमान बाळगत तिच्या संवर्धनासाठी प्रयत्न करू या, असेही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सांगितले.मराठी भाषा ज्ञान, विज्ञान, उपजिविकेची भाषा व्हावी अशी अपेक्षा करून नव्या पिढीला मराठीची गोडी लावण्यासाठी प्रत्येकाने मराठीचा अभिमान बाळगावा, असे आवाहन सुनेत्रा पवार यांनी केले. मराठी भाषा मंत्री उदय सामंत म्हणाले, अजित पवार आणि मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्यामुळे मराठी भाषा विभागाचे अंदाजपत्रक २६५ कोटी रुपयांपर्यंत पोहोचले. बोली भाषा समृद्ध व्हावी यासाठी बोली भाषा महोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईतील मराठी भाषा भवनाचे काम सुरू असून त्याच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण पुढील वर्षी २७ फेब्रुवारीला होईल.

## डॉ. भालचंद्र नेमाडे यांचा साहित्यभूषण

तरुणांपर्यंत आध्यात्माचा गोडवा पोहोचविला. त्यांना पुरस्कार प्रदान करतांना धन्यतेची भावना मनात आहे. त्यांचे व्यक्तिमत्व कोणत्याही पुरस्कारापेक्षा मोठे आहे. भालचंद्र नेमाडेंनी मानवी जीवन आणि मानवी संवेदनांची गुंतागुंत आपल्यापर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले. त्यांनी मराठी माणसाच्या अस्मितेला नवे पंख दिले. श्रीनिवास कुलकर्णी यांनी संवेदनशील आणि विचारप्रधान लेखन केले. डा. दिलीप धोंडगे यांनी तुकाराम महाराजांच्या अभंगावर पीएचडी करून ग्रंथ लिहिले. आपटे वाचन मंदिराने ७० हजारहून अधिक ग्रंथ आणि हस्तलिखितांचे जतन केले. विनोद कुलकर्णी यांनी मराठी अभिजात भाषा व्हावी यासाठी लाखो पत्र लिहून घेतली. कर्नाटक साहित्य परिषदेने महाराष्ट्राबाहेर मराठीला मान मिळवून देण्यासाठी मोठे योगदान दिले, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी पुरस्कारार्थींच्या कार्याचा गौरव केला. सात दशके मराठी भाषेची सेवा केली आहे. याच्यासोबत तरुणाईच्या प्रयत्नाने मराठी भाषेची सेवा घडेल असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. आपल्या सगळ्यांना मराठी असण्याचा आणि मराठी भाषेचा अभिमान आहे. मराठी माणसाने केलेल्या उत्तुंग कार्याचाही सर्वांना अभिमान आहे. हा अभिमान साजरा करण्यासाठीच मराठी विश्व संमेलन आयोजित करण्यात येते. मराठी भाषेचा गौरव जगभरात पोहोचविण्याचे शासनाचे प्रयत्न असून पुढील वर्षीचे विश्व मराठी संमेलन विदर्भात आयोजित करावे, त्यानंतरचे विश्व मराठी संमेलन परदेशात करण्याचे नियोजन करावे, अशी सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, मराठी भाषा मंत्री डा. उदय सामंत, खासदार राजाभाउ वाजे, शोभा बच्छाव, मराठी भाषा विभागाचे सचिव डा. किरण कुलकर्णी आदी उपस्थित होते.

**पुरस्कारार्थींची नावे अशी** (अनुक्रमे प्रौढ वाङ्मय प्रकार, पुरस्कार, लेखकाचे नाव, पुस्तकाचे नाव, प्रकाशन संस्थेचे नाव या क्रमाने) : काव्य, कवी केशवसुत पुरस्कार, सुनीता डागा, तुझं शहर हजारो मैलांवर, हस्ताक्षर प्राकशन गृह, नांदेड. नाटक/एकांकिका, राम गणेश गडकरी पुरस्कार, गणपत गायकवाड, रायगडावरून राजगृहाकडे, संकेत प्रकाशन, नागपूर. कांदबरी, हरी नारायण आपटे पुरस्कार, हिनाकौसर खान, इत्रनामा, रोहन प्रकाशन पुणे. लघुकथा, दिवाकर कृष्ण पुरस्कार, डा. पद्मनाभ केसकर, हॅल्युसिनेशन्स, सुनिधी पब्लिशर्स, पुणे. ललित गद्य (ललित विज्ञानासह), अनंत काणेकर पुरस्कार, सानिया, काही आत्मिक-काही सामाजिक, रोहन प्रकाशन, पुणे. विनोद, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर पुरस्कार, सारिका कुलकर्णी, बे दुणे पाच !, ग्रंथाली मुंबई. चरित्र, न. चिं. केळकर पुरस्कार, मृणालिनी चितळे, निलू निरंजना : गोष्ट हिची पृथ्वी मोलाची, कृष्णा पब्लिकेशन्स, पुणे. आत्मचरित्र, लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार, युनूस सय्यद, इनुची गोष्ट, न्यू इरा पब्लिकेशन्स हाउस, पुणे. समीक्षा/वाङ्मयीन संशोधन, सौंदर्यशास्त्र/ललितकला आस्वादपर लेखन, श्री. के. क्षीरसागर पुरस्कार, विनय नारकर, वस्त्रगाथा, राजहंस प्रकाशन प्रा. लि., पुणे. इतिहास, शाहू महाराज पुरस्कार, मेजर मोहिनी गर्गे-कुलकर्णी, अपराजिता गाथा विरांगनांची, मिहाना पब्लिकेशन्स, पुणे. भाषा शास्त्र/व्याकरण, नरहर कुरुंदकर पुरस्कार, सलिल वाघमारे, मराठी भाषा : लेखन-मार्गदर्शन, ग्रंथाली, मुंबई. विज्ञान व तंत्रज्ञान (संगणक व इंटरनेटसह), महात्मा जोतिराव फुले पुरस्कार, प्रा. डा. चंद्रकांत सहस्त्रबुद्धे, कल्पनेचा काजवा, मिहाना पब्लिकेशन्स, पुणे. शेती व शेतीविषयक पूरक व्यवसाय लेखनासह, वसंतराव नाईक पुरस्कार, मयूर बागूल, सर्जक, चपराक प्रकाशन, पुणे.

## अभिनेता विजयच्या संसारात

पत्नीशिवाय अन्य व्यक्तीसोबत स्वेच्छेने शरीरसंबंध ठेवणे हा असतो. हे व्यभिचारावर आधारित घटस्फोटाचे कारण आहे. तसेच ही तरतूद पती किंवा पत्नी यांच्यापैकी दोघांनाही समान रूपाने लागू आहे. तसेच ही याचिका कायद्यातील इतर तरतुदी आणि नियमांसी अधीन राहून दाखल केली जाते. दरम्यान, अभिनेता विजय याने हल्लीच आपल्या टीव्हीके या राजकीय पक्षाची स्थापना केली होती. तसेच त्याचा पक्ष यावर्षी होणा-या तामिळनाडू विधानसभेच्या निवडणुकीत पूर्ण ताकदीनिशी उतरण्याची शक्यता आहे. तसेच राजकारणात सक्रिय झाल्यानंतर विजय याने अभिनयक्षेत्रातून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला होता. मी अभिनयातून निवृत्ती स्वीकारली असून, नेता म्हणून जनतेची सेवा करू इच्छितो, असे विजयने सांगितले होते.

## पाक-अफगान सीमेवर संघर्ष पेटले!

मारले गेले आहेत, तर पाकिस्ताननेही १२ सैनिक गमावले आहेत. पाकिस्तानी लष्कराव्यतिरिक्त, परराष्ट्र मंत्रालयानेही या प्रकरणावर एक निवेदन जारी केले आहे. यात, अफगाण तालिबानने आणखी कोणत्याही चिथावणीखोर कृतीत सहभाग घेतला तर त्यांना योग्य उत्तर दिले जाईल, असे म्हण्यात आले आहे.

**सीमाभागात तणाव** - -गेल्या काही महिन्यांपासून पाकिस्तान सातत्याने अफगाणिस्तानवर टीटीपी च्या दहशतवाद्यांना आश्रय दिल्याचा आरोप करत आहे. ताज्या माहितीनुसार, तोरखम सीमा भागात रात्रभर गोळीबार आणि बॉम्बफेकीचे आवाज ऐकू येत होते. पाकिस्तानच्या हल्ल्यानंतर अफगाण सैनिकही आता सीमेच्या दिशेने कूच करताना दिसत आहेत. स्थानिक नागरिकांनी सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यास सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे, गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेला हा संघर्ष आता युद्धाच्या उंबरठ्यावर येउन ठेपला आहे.

## बसची ट्रेलरला धडक,

मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने धाव घेत स्थानिकांच्या मदतीने मदतकार्य सुरू केले. जखमी प्रवाशांना तात्काळ रुग्णवाहिकेच्या मदतीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यापैकी ७ प्रवाशांची प्रकृती अत्यंत गंभीर असून, त्यांना 'ग्रीन कॉरिडोर' तयार करून जोधपूरमधील मथुरा दास माथूर रुग्णालयात हलवण्यात आले आहे. मृत प्रवाशांचे देह नाहटा रुग्णालयाच्या शवागारात ठेवण्यात आले असून, त्यांची ओळख पटवून नातेवाईकांशी संपर्क साधला जात आहे. या भीषण अपघातानंतर पोलिसांनी ट्रेलर चालकाला ताब्यात घेतले असून त्याची कसून चौकशी सुरू आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## पोलीस भरतीसाठी येणा-या

पोलीस शिपाई पदाची भरती प्रक्रिया सुरु आहे. ८४० पोलीस शिपाई पदांसाठी तब्बल ३९ हजार २०९ तर अवघ्या ८१ चालक पदासाठी चक्क १८ हजार ७८८ इतके उमेदवारी अर्ज आले आहेत. एकूण ९२१ पदांसाठी ५७ हजार ९९० अर्ज आले असून ह्या भरतीचा शारीरिक चाचणी परीक्षेचा टप्पा हा २० फेब्रुवारी पासून भाईंदरच्या सुभाषचंद्र बोस मैदानात सुरु झाला आहे. राज्य भरातून येणा-या उमेदवारांना झोपणे, आंघोळ, प्रातविधी आदींसाठी मैदानाच्या जवळपास परिसरात पोलीस आणि महापालिके कडून सोया झाली नसल्याने टीकेची झोड उठली. पहिल्याच महासभेत काँग्रेसचे ज्येष्ठ नगरसेवक अनिल सावंत यांनी उमेदवारांचे हाल होत असल्याचा मुद्दा उपस्थित करत त्यांची राहण्याची व्यवस्था महापालिकेने करावी अशी मागणी केली. महापौर डिंपल मेहता यांनी देखील उमेदवारांच्या सुविधे बाबत प्रशासनास सांगितले. महापालिकेने भाईंदर पूर्व येथील पालिका सभागृहात उमेदवारांची राहण्याची व्यवस्था केली असली तरी मैदान पश्चिमेला असल्याने आणि पहाटे लवकर तेथे पोहचणे आवश्यक असल्याने उमेदवारांची गैरसोय होत आहे. कारण पूर्वे वरून पहाटे यायचे म्हटले तरी वाहने नाहीत आणि रिक्षा चालक मनमानी भाडे सांगतात. त्यामुळे आजही राज्यभरातून येणारे उमेदवार हे मैदानाच्या बाहेरील रस्त्यावर व पदपथावर रात्री झोपत आहेत. वास्तविक भाईंदर पश्चिमेला नगरभवन सभागृह, विनायक नगर सभागृह आदी आहेत. परंतु पालिकेने मात्र थेट पूर्वेला तेही लांब भागात उमेदवारांची व्यवस्था केली आहे. पहाटे शारीरिक चाचणी साठी हजर रहायचे असल्याने उमेदवार हे सोबत आणलेली चादर वा मिळेल ते अंथरून रस्त्यावरच झोपत आहेत. रात्रीच्या वेळी डासांचा प्रचंड जाच असून देखील उघड्यावर झोपण्याची पाळी त्यांच्यावर आली आहे. रात्री झोप कशीबशी लागली तर लागली नाहीतर जागरण करून पहाटे मैदानी चाचणी साठी उभे रहावे लागत आहे. या ठिकाणी सकाळी आंघोळ व प्रातःविधी साठी सार्वजनिक शौचालये असली तरी ती अपुरी आणि अस्वच्छ असून गैरसोयीची ठरत असल्याची नाराजी अनेक उमेदवारांनी बोलून दाखवली. खडतर शारीरिक श्रमाची परीक्षा मैदानात देण्यासाठी पुरेशी झोप व मानसिक मनोबल चांगले असणे आवश्यक आहे. मात्र आपल्याच राज्यात अशी बेवारस सारखी प्रतिस्थिती आणि हाल सहन करत परीक्षा द्यायची तरी कशी? असे प्रश्न देखील काहींनी केले.

## मेळघाटात अनोखी जोडी

दुसऱ्या प्रजातीचा सदस्य पुढे असणे ही अत्यंत दुर्मिळ बाब मानली जाते. डॉ. सावन देशमुख यांनी या घटनेची सविस्तर नोंद ठेवली असून तज्ज्ञांशी चर्चा सुरू केली आहे. आंतरप्रजाती वर्तन, अधिवासातील बदल आणि पर्यावरणीय दडपण या संदर्भात ही घटना नवे प्रश्न उपस्थित करते. या निरीक्षणावर आधारित संशोधन निबंध आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक नियतकालिकात प्रसिद्ध करण्याची तयारीही सुरू आहे. मेळघाटच्या समृद्ध जैवविविधतेतून समोर आलेली ही घटना केवळ 'अनोखी जोडी' नसून, परिसंस्थेतील संतुलन आणि सहअस्तित्वाची जिवंत साक्ष ठरत आहे.

## डाकघर बचत बँकेतून

बचतडाक विभागात गंभीर प्रकार उघडकीस आला. डाक विभागात कुठेही सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले नव्हते तर ग्राहकांना पैसे देत असतात तेथे पैसे मोजण्याची मशिनही उपलब्ध नव्हती. पैशांचे बंडल मोजण्यासाठी अकाउंटवर बसलेला कर्मचारी हा कार्यालयातील बंद कॅबिन मधुन पैशांचे बंडल मोजून खातेदारांना देत होते. त्यामुळे ग्राहकांच्या नजरे आड हा होत असलेला गैर प्रकार लक्षात येत नाही असे सर्वांच्या निदर्शनास आले . मात्र खातेदाराला पैसे कमी मिळाले की दुसऱ्या खातेदाराला जास्तीची रक्कम देण्यात आली हा भाग चौकशीचा आहे. अमुताई हिरोळे यांनी उघड केलेला हा प्रकार फक्त एक व्यक्तीचा नाही, तर पूर्ण यंत्रणेची उणीव दाखवतो. डाक विभागाने याची गंभीर दखल घेऊन सर्व शाखांमध्ये सिसिटीव्ही ,नोट मोजणी मशीन तातडीने बसवावीत. जेणे करुन असले प्रकार पुन्हा होणार नाही. सदर प्रकाराबद्दल अमुताई हिरोळे यांनी लेखी तक्रार डाकघर विभाग प्रमुखांना व खासदार बळवंत वानखडेंना याबाबत चौकशी करण्यासाठी केली आहे. आम्ही पुर्ण रक्कम खातेदाराला मोजून दिली आहे. खातेदाराने काऊंटर सोडण्यापूर्वी रक्कम मोजून घेणे आवश्यक होते. त्यामुळे हा आरोप चुकीचा आहे असे डाक विभागातील अधिकारी यांचे मत आहे.

## २१४ जागांसाठी झुंज

असलेल्या महिला उमेदवारांसाठी 'हिरकणी कक्ष' स्वतंत्र उभारण्यात आला होता. संपूर्ण प्रक्रियेदरम्यान जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती (इर्विन हॉस्पिटल) येथील तज्ज्ञ वैद्यकीय पथक तैनात होते. उष्णतेचा विचार करून शारीरिक चाचण्या सकाळच्या सत्रात घेण्यात आल्या. कोणतीही गंभीर दुखापत अथवा अनुचित प्रकार न घडता प्रक्रिया सुरळीत पार पडल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. २१४ जागांसाठी हजारोंची झुंज, त्यातून ९,२९० जणांची पुढील फेरीत एन्ट्री आणि आता खरी परीक्षा लेखी चाचणीत रंगणार आहे.

**पुरुष उमेदवारांची स्थिती :** प्रत्यक्ष उपस्थित : ११,८७८, गैरहजर : ४,४५५, कागदपत्र पडताळणीत अपात्र : २८, उंचीत अपात्र : ६९६,शारीरिक चाचणीस पात्र : ११,१५१, उत्तीर्ण : ७,४०८, अनुत्तीर्ण : ३,७४२

**महिला उमेदवारांची स्थिती** -प्रत्यक्ष उपस्थित : ३,८७६, गैरहजर : १,०४४, कागदपत्र पडताळणीत अपात्र : १२, उंचीत अपात्र : ३०२, शारीरिक चाचणीस पात्र : ३,५७४, उत्तीर्ण : १,८८२, अनुत्तीर्ण : १,६९२

**प्रवर्गनिहाय पदांची संख्या-** सर्वसाधारण – ६९, महिला – ६४, खेळाडू – १० प्रकल्पग्रस्त – १०, भूकंपग्रस्त – ०४, माजी सैनिक – ३१, अंशकालीन पदवीधर – १०, पोलीस पाल्य – ०६, गृहरक्षक दल – १०

## २२ वी बालनाट्य स्पर्धा

दिग्दर्शित मोतीचूर हे ६ बालनाट्य सादर झाले. ही संपूर्ण स्पर्धा महाराष्ट्र शासनाचे वतीने रसिक प्रेक्षकांकरिता निशुल्क ठेवण्यात आलेली आहे.आज शनिवार दि. २८ फेब्रुवारी रोजी 'लिझलस सिक्रेट', 'अजब लोठ्यांची महान गोष्ट', 'टरगुटर्गु', 'मारोतीची जत्रा', 'रद्दी' आणि 'बुद्धाची गोष्ट' हे ६ बालनाट्य सकाळी ११ वाजल्यापासून सादर होणार आहेत.अमरावतीकर कला रसिकांनी या स्पर्धेचा आनंद घ्यावा आणि बाल कलावंतांना प्रोत्साहित करण्याकरिता संपूर्ण स्पर्धेदरम्यान उपस्थित राहावे असे आवाहन नाट्यस्पर्धा समन्वयक विशाल फाटे, सहसमन्वयक हर्षद ससाणे आणि अमरावती नाट्य परिषदेचे अध्यक्ष अ‍ॅड. चंद्रशेखर डोरले यांनी केले आहे.

## चाकूच्या धाकावर लुटणारा

एरिया मध्ये नातेवाईकांच्या घरी जात असताना आरोपी राहुल उर्फ चाटी तडस याने काही कारण नसताना त्याला थांबवले आणि थापडा मारल्या व खिशातून चाकू काढून ६ हजार रुपये घेतले आणि जीवाने मारून टाकण्याची धमकी दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. गुन्हे शाखेच्या पथकाने पेट्रोलिंग दरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारावर सापळा रचून आरोपी राहुल तडस याला राजुरा बाजार मार्गावरून ताब्यात घेतले. प्रथम तो उडवा उडवीचे उत्तर देत होता. अधिक विचारपूस केली असता त्याने घटनेची कबुली दिली. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्या कडून मोबाईल सह १० हजार ९४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखेडे यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक नितीन इंगोले, सुनील महात्मे, निलेश डांगोरे, स्वप्निल पवार ,संजय प्रधान यांनी केली.

## अचलपूर नप लेखा

निधीतील रस्ते , नाली आदी कामे पूर्ण करतात .त्यानंतर अचलपूर नगर परिषद लेखा विभागात देयक मंजूर करण्याबाबत सर्व कागदपत्रे सादर करतात . पण लेखा विभागाकडून त्या कागद पत्रावर तत्काळ कारवाई केली जात नाही .यामुळे संबंधित कंत्राटदार अनेक चकरा या कार्यालयात मारत आहे .आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून उडवा उडवी ची उत्तरे दिली जाते .यामुळे अनेक कंत्राटदार आर्थिक व मानसिक भुर्दंड सहन करत आहे. या विभागातील कंत्राटदारांची थकीत देयकांचे प्रकरण तत्काळ मार्गी लावण्याची मागणी ठेकेदार मंडळीकडून होत आहे .सोने,दागिने गहाण ठेवून तसेच कर्ज घेऊन ठेकेदार विविध नगर परिषद अंतर्गत कामे पूर्ण करतो .त्यामुळे काम पूर्ण झाल्यानंतर सर्व कागदपत्रे सादर करून तत्काळ देयक प्राप्त झाल्यास सर्व कर्ज फेडू अशी आशा असते .बांधकाम साहित्य ,कामगारांची मंजुरी चा प्रामुख्याने समावेश आहे. पण अचलपूर नगर परिषद लेखा विभागाचे अधिकारी मात्र संथ गतीने व मर्जीप्रमाणे कारभार करीत असल्याने मानसिक व आर्थिक भुर्दंड ठेकेदार बांधवांना सहन करावा लागत आहे . याबाबत संबंधित अधिकारी लक्ष देणार,अशी आशा आहे.

-प्रफुल बर्वे,अचलपूर.

## वरुडमध्ये श्रीकृष्णा लॉजवर

याला कुंटणखाना चालविताना रंगेहात अटक करण्यात आली. आरोपीकडून दोन मोबाईल फोन (अंदाजे किंमत ११ हजार रुपये), इतर साहित्य ५६० रुपये आणि रोख १,७०० रुपये असा एकूण १३,२६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

छाप्यादरम्यान दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून त्यांना संरक्षण व आवश्यक मदतीसाठी पुढील प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. अटक आरोपीला पुढील कारवाईसाठी वरुड पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद व अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अर्जुन ठोसरे (वरुड) व पोलीस निरीक्षक किरण वानखेडे (एलसीबी) यांच्या नेतृत्वात पथकाने पार पाडली. प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून, या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

## महावितरण अचलपूर विभागीय

झाडे पूर्णपणे अर्ध्यातून कापल्याची तक्रार अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडे आदिवासी पर्यावरण सामाजिक संघटनेने केली होती.आदिवासी पर्यावरण सामाजिक विकास संघटन अध्यक्ष योगेश खानझोडे यांनी पार्क मध्ये पाहणी केली असता त्यांना हा संपूर्ण प्रकार दिसला.त्यांनी सहाय्यक अभियंता शाहा यांना याबाबत जाब ही विचारला. अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड नप अचलपूर यांना याबाबत संपूर्ण माहिती दिली.गेल्या पाच वर्षांत महावितरण कंपनी अचलपूर यांनी विद्युत पुरवठा करण्याचा नावावर अचलपूर तालुक्यात शहरी व ग्रामीण क्षेत्रातील शेकडो वृक्ष तोडली तर जिल्हात एकूण किती वृक्ष तोडली गेली असेल ? हा प्रश्न सुद्धा योगेश खानझोडे यांनी निर्माण केला आहे .एकीकडे प्रशासन झाडे लावा-झाडे जगवा बाबत जनजागृती करते तर दुसरी कडे महावितरण कडून वटवृक्ष नष्ट होत असल्याची खंत योगेश खानझोडे , संजय डोंगरे, सुरेश प्रजापती यांनी व्यक्त केली. अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी, अचलपूर उपविभागीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय येथे याबाबत तक्रार देत संयुक्त बैठक प्रति प्रस्ताव व निवेदन देण्यात आले. आताही शहरी व ग्रामीण भागातील अवैध वृक्षतोड थांबली नाही तर आमरण उपोषण सुद्धा वृक्ष बचाव साठी करण्यात येईल असा इशारा आदिवासी पर्यावरण सामाजिक संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

## क्रेडिटकार्ड मर्जच्या सापळा; ओटीपी

व्हिसा कार्डवर १० हजार रुपयांचा व्यवहार झाला असून त्यावर ९,६०० रुपयांचा हिडन चार्ज लागला आहे,' अशी भीती दाखवली. एवढेच नव्हे, तर तिने कार्डचा १६ अंकी क्रमांक अचूक सांगितल्याने रोशन यांचा संशय दूर झाला.यानंतर महिलेने रोशन यांच्याकडे असलेली तीन क्रेडिट कार्डे 'मर्ज' करून एकच कार्ड देण्याची ऑफर दिली. प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मोबाईलवर आलेला ओटीपी सांगण्यास सांगितले. विश्वासात घेतलेल्या रोशन यांनी ओटीपी शेअर करताच सायबर गुन्हेगारांनी आपले काम साधले. दुपारी ई-मेल तपासला असता तीन वेगवेगळ्या व्यवहारांतून ९४,४६५ रुपये, ४८,५८२ रुपये व १,८९९ रुपये अशी एकूण १,४४,९४६ रुपये रक्कम काढण्यात आल्याचे स्पष्ट झाले. फसवणूक लक्षात येताच रोशन यांनी तातडीने गाडगेनगर पोलीस ठाणे येथे धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात मोबाईलधारकाविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## ६ मार्चला मनपाला मिळणार

पंचफुला चव्हाण, विनोद तानवैस, काँग्रेस ललिता रतावा, अस्मा परविन फिरोज खान ,प्रशांत महल्ले, तर युवा स्वाभिमान पार्टीकडून प्रशांत वानखडे, दीपक साहू सम्राट, प्रियंका पाटणे, आणि राकाँपा कडून अविनाश मार्डीकर,मीनल सवई तसेच एमआयएम चे सल्लाउद्दीन इक्रामुद्दिन आणि नाजीम खान करीम खान, सेना-बसपा गटातून मंजुषा जाधव यांना स्थायी समितीमध्ये घेण्यात आले आहे. आता ६ मार्च रोजी होणाऱ्या पहिल्या बैठकीत सभापती ची निवड होणार आहे.

## तलाठी कार्यालयात धिंगाणा

उघडून आत प्रवेश केला. कोरोना निर्बंधामुळे खिडकीतून कामकाज सुरू असतानाही त्यांनी कागदपत्रांची फेकाफेक केली, तलाठींना मारहाण केली व बाहेर ओढत पुन्हा मारहाण केल्याचा आरोप होता. घटनेचे चित्रीकरणही करण्यात आले होते. तलाठींच्या तक्रारीवरून नांदगाव खंडेश्वर पोलीस स्टेशन येथे भा.दं.वि. कलम ३५३, ३३२, २९४, १८६ सह ३४ अंतर्गत गुन्हा दाखल झाला. तपासानंतर दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले. सरकारतर्फे सहायक सरकारी अभियोक्ता प्रफुल्ल प्रकाश तापडिया यांनी साक्षीदार व व्हिडिओ पुरावे सादर करत प्रभावी युक्तिवाद केला. लेखी व तोंडी पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने तिन्ही आरोपींना दोषी ठरवले. दोषी आरोपी निलेश प्रकाश गाडेकर (वय ४३), हरिदास भाऊराव तुपट (वय ४३) आणि रंजीत दिलीप वैद्य (वय ३०, सर्व रा. फुबगाव, ता. नांदगाव खंडेश्वर) यांना भादंविच्या कलम ३५३ अंतर्गत ६ महिने सश्रम कारावास व प्रत्येकी १,००० दंड, कलम ३३२ अंतर्गत १ वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी २,००० दंड (दंड न भरल्यास २ महिने कारावास), कलम २९४ अंतर्गत प्रत्येकी १,००० दंड, कलम १८६ अंतर्गत प्रत्येकी ५०० दंड (न भरल्यास १ महिना साधा कारावास) यांना या सर्व शिक्षा एकत्र भोगावयाच्या आहेत. या निकालामुळे शासकीय कर्मचाऱ्यांच्या कामात अडथळा आणणाऱ्यांना कायद्याचा स्पष्ट इशारा मिळाल्याची प्रतिक्रिया कायदेवर्तुळात व्यक्त होत आहे.

## श्री हनुमान व्यायाम

आहेत. मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके यांनी आयोजित पत्रपरिषदेत ही माहिती दिली. यावेळी सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके, कोषाध्यक्ष व डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, आंतरराष्ट्रीय समन्वयक प्रा. प्रणव चेंडके यांच्यासह इतर पदाधिकारी व रशियातून शिक्षण पूर्ण करून परतलेले आठ विद्यार्थी उपस्थित होते. मंडळाचे आंतरराष्ट्रीय समन्वयक प्रा. प्रणव चेंडके यांनी सांगितले की, रशियातील इंटरनॅशनल ऑलिम्पिक युनिव्हर्सिटी (सोची) सोबत २०२१ पासून प्रस्थापित संबंध दृढ झाले आहेत. तेथे 'मास्टर ऑफ स्पोर्ट अ‍ॅडमिनिस्ट्रेशन' अभ्यासक्रमाच्या माध्यमातून सहकार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. या करारांतर्गत मंडळाच्या विद्यार्थ्यांसाठी दोन आठवड्यांचा विशेष अभ्यासक्रम राबविण्यात येत असून नुकतेच आठ विद्यार्थी व दोन शिक्षक प्रशिक्षण पूर्ण करून परतले आहेत. दरवर्षी हा उपक्रम राबविण्याचे नियोजन आहे. आफ्रिका खंडातील एस्वास्थीनी देशातील हेल्थ अ‍ॅंड फिजिकल असोसिएशननेही मंडळाच्या सहकार्याची मागणी केली. तेथील क्रीडा मंत्रालय व विविध संघटनांशी चर्चेनंतर शैक्षणिक करार करण्यात आला असून लवकरच तेथील विद्यार्थी व प्रशिक्षक अमरावतीत प्रशिक्षणासाठी येणार आहेत. केंद्र शासनाच्या युवक कल्याण व क्रीडा मंत्रालयाशी संलग्न कॉन्फेडरेशन ऑफ स्पोर्ट अ‍ॅंड रिक्रीएशन इंडस्ट्रीतर्फे आयोजित जी-एसईसी-२०२६ सोहळ्यात मंडळाच्या डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनला 'बेस्ट गव्हर्नमेंट एडेड इन्स्टिट्यूशन इन स्पोर्ट अ‍ॅंड फिजिकल एज्युकेशन' हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच लक्ष्मीबाई नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ फिजिकल एजुकेशन, ग्वाल्हेर सोबत महत्त्वपूर्ण शैक्षणिक करार करण्यात आला आहे. या कराराअंतर्गत भारतीय पारंपरिक व आधुनिक खेळ, क्रीडाशास्त्र, योग, संशोधन व प्रशिक्षण क्षेत्रात संयुक्त उपक्रम राबविण्यात येणार आहेत. याशिवाय महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा सोबतही शैक्षणिक सहकार्य निश्चित झाले आहे.

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे १०५ वर्षांहून अधिक परंपरा असलेले ऐतिहासिक उन्हाळी शिबीर यंदाही निवासी व अनिवासी स्वरूपात आयोजित करण्यात येत आहे. भारतीय पारंपरिक व आधुनिक क्रीडाप्रकारांचे प्रशिक्षण शालेय विद्यार्थ्यांना दिले जाणार असून राज्य व राष्ट्रीय स्तरावर यश मिळविण्याची परंपरा यंदाही कायम ठेवण्याचा संकल्प आहे. प्रा. डॉ. माधुरी चेंडके यांनी अमरावतीकरांना आपल्या पाल्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

## यवतमाळ जिल्ह्यात १६ मे

संबंधित बाबींचे जलद निराकरण करण्यात येईल. ७ मार्च, १४ मार्च, २० एप्रिल, २७ एप्रिल, ४ मे व २५ मे २०२६ रोजी विभागीय पातळीवर शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. एकल-खिडकी पद्धतीद्वारे सेवा देत ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग व वंचित घटकांना प्राधान्य दिले जाईल. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समिती स्थापन करून सर्व विभागप्रमुखांना पूर्वतयारीचे निर्देश देण्यात आले आहेत.

'माझे गाव, निरोगी गाव' मोहिमेद्वारे शाश्वत विकास ध्येय (SDG-3) अंतर्गत आरोग्य मानके उंचावण्याचा प्रशासनाचा मानस आहे. १ ते ३० एप्रिल दरम्यान स्वमूल्यांकन, २९ मे ते १५ जून तहसीलस्तरीय तपासणी, १६ ते ३० जून जिल्हास्तरीय तपासणी आणि १ ते १५ जुलै विभागीय मूल्यांकन होईल. ३१ ऑगस्ट रोजी राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा होणार आहे. उत्कृष्ट ग्रामपंचायतींना ५०, ३० व २० लाखांची बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय व उपकेंद्रांसाठी अनुक्रमे ५०, ७५ व २५ लाखांचे पुरस्कार ठेवण्यात आले आहेत. संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोग नियंत्रण, माता-बाल आरोग्य, स्वच्छता आणि सामाजिक जबाबदारी हे पाच प्रमुख स्तंभ निश्चित करण्यात आले आहेत.

याशिवाय, मुख्यमंत्री बळीराजा फार्म ट्रेल रोड योजनेअंतर्गत ग्रामीण शेती पांदण मार्ग मजबूत करण्यासाठी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कार्यकारी समिती स्थापन करण्यात आली आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात समित्या कार्यरत असून यंत्रसामग्री दरनिश्चितीसाठी निविदा प्रक्रिया सुरू आहे. कालबद्ध नियोजनाद्वारे सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा प्रशासनाचा निर्धार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# जनमाध्यम


एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# अकोला पोलीसांचा 'प्रोजेक्ट त्रीनेत्र' राष्ट्रीय पातळीवर झेपावला!



## एनसीआरबी, नवी दिल्ली येथे एसपी चांडक यांनी केले सादरीकरण; 'बेस्ट आयटी प्रोजेक्ट'साठी महाराष्ट्रातून निवड

*__अकोला :__ जिल्हा पातळीवर सुरू झालेला एक अभिनव प्रयोग आता थेट देशाच्या व्यासपीठावर पोहोचला आहे. अकोला पोलीस दलाचा 'प्रोजेक्ट त्रीनेत्र' हा उपक्रम राष्ट्रीय स्तरावर झळकला असून ६९ व्या अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा-२०२५ मधील 'बेस्ट आयटी प्रोजेक्ट स्पर्धा'साठी महाराष्ट्राच्या वतीने या प्रकल्पाची निवड करण्यात आली आहे. ही बाब अकोला जिल्ह्यासाठी अभिमानाची आणि ऐतिहासिक ठरली आहे.*

*एनसीआरबी, नवी दिल्ली येथे प्रकल्पाचे सादरीकरण करण्यासाठी अकोला पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांना निमंत्रित करण्यात आले होते. महाराष्ट्रातून पाठविण्यात आलेल्या पाच आयटी प्रकल्पांपैकी 'प्रोजेक्ट त्रीनेत्र'ची अंतिम निवड करण्यात आली. दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी एनसीआरबी मुख्यालयात झालेल्या सादरीकरणावेळी राष्ट्रीय निवड समितीने या प्रकल्पाच्या एआय-आधारित संकल्पनेचे विशेष कौतुक केले.*



### एआय मॉनिटरिंगमुळे गुन्ह्यांत ४८ टक्के घट

'प्रोजेक्ट त्रीनेत्र' कार्यान्वित होण्यापूर्वी (फेब्रुवारी-जुलै २०२५) शरीराविरुद्ध पुनरावृत्ती गुन्ह्यांची संख्या ११४ होती. मात्र ऑगस्ट २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत ही संख्या ५९ वर आली आहे. म्हणजेच तब्बल ४८ टक्के घट नोंदली गेली.

एआय-आधारित मॉनिटरिंग प्रणालीद्वारे सराईत गुन्हेगारांच्या हालचालींवर लक्ष ठेवले जाते. दर बुधवारी संबंधित गुन्हेगारांना पोलीस स्टेशनला बोलावून ठाणेदारांसमोर हजेरी घेतली जाते, त्यांच्या हालचालींचा आढावा घेत प्रतिबंधात्मक कारवाई केली जाते आणि आवश्यक ते समुपदेशनही केले जाते. त्यामुळे गुन्हा घडण्यापूर्वीच तो रोखण्याचा प्रयत्न यशस्वी ठरत असल्याचे दिसून आले आहे.

### मोक्का, एमपीडीए आणि तडीपार कारवायांतही यश

'प्रोजेक्ट त्रीनेत्र'च्या देखरेखीखाली अकोला पोलिसांनी मोक्का अंतर्गत एका सराईत टोळीवर कारवाई केली आहे. तसेच एमपीडीए कायद्यान्वये २१ गुन्हेगारांना स्थानबद्ध करण्यात आले असून, मपोका कायद्याच्या कलम ५५ ते ५७ अंतर्गत ७३ गुन्हेगारांना शहरातून तडीपार करण्यात आले आहे.

### दूरदृष्टीतून साकारलेला उपक्रम

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक आणि युवा चेहरा किशन पानपालिया यांच्या संयुक्त पुढाकारातून 'प्रोजेक्ट त्रीनेत्र' साकारला. डेटा-आधारित प्रतिबंधात्मक पोलिसिंगच्या संकल्पनेवर आधारित हा प्रकल्प पारंपरिक पोलिसिंगला तंत्रज्ञानाधारित, मोजमापयोग्य आणि बुद्धिमान प्रणालीत रूपांतरित करण्याचा प्रयत्न आहे. जिल्हा पातळीवर सुरू झालेला हा उपक्रम आता राष्ट्रीय व्यासपीठावर अकोल्याचे प्रतिनिधित्व करत आहे. 'प्रोजेक्ट त्रीनेत्र'ची निवड ही केवळ एका प्रकल्पाची नव्हे, तर अकोला पोलीस दलाच्या कार्यक्षमता, दूरदृष्टी आणि तंत्रज्ञानाभिमुख दृष्टिकोनाची दखल असल्याचे मानले जात आहे.

# वीर स्त्री लताताई देशमुख यांची ४९ वी जयंती उत्साहात साजरा

## पुढील वर्षी ५० कर्तबगार महिलांना 'स्वामिनी' पुरस्कार

■ प्रतिनिधी | अकोला ■

स्वामिनी संघटना तथा स्वामिनी विधवा विकास मंडळ संस्थापिका तसेच विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता व कुमारिका अशा एकल महिलांच्या प्रेरणास्थान असलेल्या वीर स्त्री लताताई देशमुख यांची ४९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सामाजिक बांधिलकी आणि महिलांच्या सक्षमीकरणाच्या कार्याला वाहिलेल्या लताताईंच्या कार्याचा यावेळी गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी वीर स्त्री लताताई देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा आढावा घेत महिलांच्या आत्मनिर्भरतेसाठी त्यांनी उभारलेल्या चळवळीचे स्मरण केले. एकल महिलांना स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा देणे, त्यांना सामाजिक व कायदेशीर मार्गदर्शन उपलब्ध करून देणे आणि संघटनबांधणी करणे या त्यांच्या कार्याचा विशेष उल्लेख करण्यात आला.



यावेळी पुढील वर्षी ५० कर्तबगार महिलांना 'स्वामिनी' पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देण्याचा संस्थेचा मानस असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमाला ॲड. अभिषेक गौतम, ॲड. ओम मते, अंजली पाटील, संजय पाटील, शंकर जोगी, वैशाली जोगी, दिपाली शिरसाट, वैशाली सोनवणे, मनीष देशमुख, श्रीमद देशमुख, प्राजक्ता देशमुख, संयुक्त देशमुख, रविंद्र हिंगणकर, कैलास नेहा सरी, वृषाली पाठारे, सुकन्या तायडे, दीपशिखा वानखडे, प्रमिला घोगले, संध्या जवळकर, जाई देशपांडे, मानसी लोखंडे, मेघना पाठक, कोमल वानखडे, मालन जोग, शितल वाकोडे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन उत्साहात पार पडले. महिलांच्या सक्षमीकरणाच्या दिशेने पुढील काळात अधिक व्यापक उपक्रम राबविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त कार्यक्रम

**मालेगाव :** येथील तहसील कार्यालयाजवळ बोरगाव रोडवरील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथमिक शाळा मालेगाव येथे मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त शाळेमध्ये कार्यक्रम आयोजित केला या कार्यक्रमाचे अध्यक्ष विठ्ठल कुटे, प्रमुख अतिथी माऊली कॉम्प्युटरचे संचालक विजय कड उपस्थित होते. सदर कार्यक्रमाची सुरुवात विद्येची आराध्य देवता माता सरस्वती यांच्या प्रतिमा पूजन व हार आपण करून करण्यात आली. यानंतर प्रमुख उपस्थितीत असलेले विजय कड यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी भाषेबद्दल व मराठी भाषेच्या इतिहासाबद्दल सखोल मार्गदर्शन केले.

# वाशिममध्ये आज राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन पुरस्कार वितरण व चर्चासत्रांची रेलचेल



■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. २८ फेब्रुवारी) सकाळी १० वाजता येथील वाटाणे लॉन येथे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन, पुरस्कार वितरण सोहळा व पदाधिकारी सन्मान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यभरातील पत्रकार, संपादक, डिजिटल माध्यम प्रतिनिधी व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा भव्य सोहळा पार पडणार आहे.

अधिवेशनाचे उद्घाटन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार असून सहउद्घाटक म्हणून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित राहतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री दत्तात्रय भरणे राहणार आहेत. यावेळी सहकार मंत्री आकाश फुंडकर, मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्यासह खासदार, आमदार, विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आणि पत्रकार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

या अधिवेशनात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच जीवन गौरव, विदर्भ भूषण, विदर्भ गौरव, समाजसेवा, उद्योजक, युथ आयकॉन, सेवारत्न आदी विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. काही आदर्श सामाजिक व आध्यात्मिक संस्थांचाही विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

दुपारी २ ते ३ या वेळेत 'पत्रकारांचा डीएनए काय?' तसेच 'अजितदादा पवार यांच्या मृत्यूचे राजकारण तर होत नाही ना?' या विषयांवर चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय हरितसेनेतर्फे नैसर्गिक रंग निर्मीतीबाबत जनजागृती



■ प्रतिनिधी | वाशिम ■

एस एम सी इंग्लिश स्कूल वाशीमच्या राष्ट्रीय हरित सेना व निसर्ग ईकोक्लब व सामाजिक वनीकरण विभाग वाशीमच्या वतीने पर्यावरण पूरक होळी साजरी करण्याचे आवाहन प्राचार्य मीना उबगडे, सामाजिक वनिकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी अशोक प-हाड व राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी, पर्यवेक्षीका प्रणीता हरसुले वनपरिक्षेत्र अधिकारी राजेंद्र कातखेडे आणि हरितसेनेच्या चिमुकल्यांनी केले . दरवर्षी आपल्या राज्यात होळीचा सण मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होते व विशेषतः वनांमध्ये आगी लावून वन्य प्राण्यांची शिकार सुद्धा केली जाते .तसेच होळी जळतांना त्यासाठी मोठ्या प्रमाणावर हवेतील ऑक्सीजन वापरला जाऊन कार्बन वायूमुळे हवेचे प्रदूषण होते.

# कारंजा शहर पोलिसांची तात्काळ कारवाई

## १ लाख ३३ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

■ प्रतिनिधी | कारंजा ■

पोलीस स्टेशन कारंजा (शहर) हद्दीत घडलेल्या चोरीच्या गुन्ह्याचा अवघ्या काही तासांत छडा लावत पोलिसांनी दोन आरोपींना अटक करून १ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दि. २६/०२/२०२६ रोजी फिर्यादी अनिल उत्तम गडवाले (रा. कारंजा लाड) यांनी तक्रार दिली की, त्यांच्या कपड्यांच्या दुकानाच्या काउंटरजवळ ठेवलेल्या बॅगेतून सकाळी सुमारे ०९.३० ते १०.०० वाजताच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने नगदी १,३०,००० रुपये व टायटन कंपनीचे ३,००० रुपये किमतीचे घड्याळ असा एकूण १,३३,००० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.



सदर तक्रारीवरून गुन्हा क्र. १८१/२०२६ कलम ३०५ बी.एन.एस. प्रमाणे दाखल करण्यात आला. दिनेशचंद्र शुक्ला यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची सूत्रे हाती घेण्यात आली.

गोपनीय माहितीच्या आधारे सावरकर चौक, कारंजा लाड येथे सापळा रचून पोलिस पथकाने आरोपी (१) शिवम रविंद्र चौधरी (वय २४) व (२) स्वप्निल अंबादास मडावी (वय २२, दोघे रा. कारंजा लाड) यांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून नगदी १,३०,००० रुपये व टायटन कंपनीचे ३,००० रुपये किमतीचे घड्याळ असा एकूण १,३३,००० रुपयांचा मुद्देमाल दोन पंचांसमक्ष जप्त करण्यात आला.

ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक अनुज तारे, अप्पर पोलीस अधीक्षक लता फळ, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाडवी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपास पथकात सपोनि जयदीप पवार, पोलीस हवालदार उमेशकुमार बिबेकर (बं.नं. १०१७), अजय धनकर, मयुरेश तिवारी, गणेश जाधव, पोलीस कॉन्स्टेबल महम्मद परसुवाले, अमित भगत, नितीन पाटील, अनिस निनसुरवाले यांचा सहभाग होता.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वारावरून तणाव निर्माण झाल्याची तक्रार



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव पोलिस स्टेशन येथे लेखी तक्रार अर्ज दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, डोंगरकिन्ही येथे प्रवेशद्वार शासनाच्या नियमांनुसार आणि डोंगरकिन्ही ग्रामपंचायत यांच्या ठरावानुसार तसेच पोलिस प्रशासनाच्या पूर्वपरवानगीने उभारण्यात आले आहे. मात्र काही व्यक्तींनी या प्रवेशद्वाराला विरोध करत जमाव जमवून धिंगाणा घातल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, संबंधित लोकांकडून जातीय स्वरूपाच्या घोषणा देण्यात येत असून प्रवेशद्वार पाडण्याच्या तसेच बौद्ध समाजाला धमक्या देण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे गावातील महिला व पुरुषांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून कधीही हल्ला होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

# शेतकरी अर्थ परिषदेतून शेतकरी, शेतमजुरांची होणार एकजूट!

- जिल्हाभरातील शेतकऱ्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन
- व्यापार करारावर उठविणार आवाज

■ प्रतिनिधी | अकोला ■

देशात अमेरिकन कृषीमाल मोठ्या प्रमाणात आयात होणार असल्याने भारतीय शेती, शेतकरी, शेतमजुरांवर उपासमारीची वेळ येणार आहे. हा करार शेतकऱ्यांसाठी डेथ वॉरंट असून या विरोधात जनजागृती करण्यासाठी आयोजित शेतकरी अर्थ परिषदेला शेतकरी बांधवांनी हजेरी लावून लोक लढ्याला बळकटी द्यावी असे आवाहन काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक अमानकर यांनी केले.

शेतकरी आसमानी व सुलतानी संकट आणि भरडला जात असताना बाजारपेठेतील अनिश्चितता, वाढते कर्ज, नैसर्गिक आपत्ती आणि हमीभावाचा अभावाने शेतकरी अडचणीच्या गर्तेत आहे. यामध्ये भरीस भर भारत अमेरिका व्यापार करारामुळे शेती व्यवसाय, शेतकरी आणि शेतमजूर यांच्या उपजीविकेवर गंभीर परिणाम होणार होणार असून शेती, शेतकरी, लोकशाही टिकवायची असेल तर शेतकऱ्यांनी एकजूट होणे गरजेचे आहे. याकरिता महात्मा फुले आयुर्वेदिक महाविद्यालय, मूर्तिजापूर रोड, बाभुळगाव येथे रविवार दि. १ मार्च २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता ही शेतकरी अर्थ परिषद घेण्यात येणार आहे.या शेतकरी परिषदेला जिल्हाभरातून ३ हजार पेक्षा अधिक शेतकरी उपस्थित राहणार असून शेतकऱ्यांच्या हितासाठी आगामी काळात उचलल्या जाणाऱ्या ठोस पावलांवर विचार मंथन करण्यात येणार आहे.

या परिषदेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे महासचिव खा. मुकुल वासनिक, अखिल भारतीय किसान काँग्रेस अध्यक्ष सुखपाल शिंग खैरा, काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, कृषी व ग्रामीण अर्थ व्यवस्थेचे अभ्यासक व तज्ञ मिलिंद मुरुगकर, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव कुणाल चौधरी, देशोन्नतीचे संपादक शेतकरी नेते प्रकाश पोहरे, अकोला पश्चिम विधानसभेचे आमदार साजिद खान पठाण यांची उपस्थिती लाभणार आहे. या पार्श्वभूमीवर सर्व शेतकरी संघटना, नागरिक व लोकशाहीवादी शक्तींनी एकत्र येऊन या प्रश्नावर व्यापक जनआंदोलन उभारावे, असे आवाहन काँगेसतर्फे करण्यात आले.

# 'राजू कनेक्शन' उघडकीस येताच अकोटात खळबळ

## अवैध धंद्यांवर 'ब्रेक' : शहरात शुकशुकाट



अकोट पोलिसांसाठी 'राजू बन गया जेंटलमेन'?

वरली-मटका, जुगार आणि नकली नोटांच्या साखळीत 'कलेक्शन एजंट'ची चर्चा

■ *समीर ठाकूर* ■

***अकोट : वरली–मटका, टेबल जुगार आणि कथित नकली नोटांच्या साखळीवर प्रकाश टाकणारी बातमी शुक्रवारी सकाळी प्रसिद्ध होताच अकोट शहरात अक्षरशः खळबळ उडाली. नेहमी गजबजलेले अड्डे अचानक ओस पडले, 'लाइन' बंद झाल्या, कलेक्शन थांबले आणि संपर्क क्रमांक निष्क्रिय झाल्याची माहिती समोर येत आहे. अनेक ठिकाणी दररोज सुरू असलेली हालचाल थांबून 'शुकशुकाट' पसरल्याचे चित्र दिवसभर दिसून आले.***

ज्या गल्लीबोळांतून रात्री उशिरापर्यंत पैशांची उलाढाल होत असल्याची चर्चा होती, तेथे शुक्रवारी दिवसाढवळ्या अनपेक्षित शांतता होती. काही ठिकाणी तर अड्डेच हलविल्याची कुजबुज आहे. तर दुसरीकडे शहरात आठवड्याला लाखोंची उलाढाल होत असल्याचा अंदाज व्यक्त केला जात असताना, एवढा मोठा प्रवाह अचानक थांबणे शक्य आहे का? की 'वरून इशारा' मिळाल्याने तात्पुरती विश्रांती घेण्यात आली आहे? या चर्चांनी शहरातील राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळातही तापमान वाढवले आहे.

### 'तडीपारीच्या उंबरठ्यावर' असलेल्या राजूला आश्रय कोणाचा?

विविध गुन्ह्यांच्या मालिकेत नाव पुढे आलेला, काही प्रकरणांत संशयित म्हणून चर्चेत असलेला आणि सध्या अवैध धंदेवाईक व यंत्रणा यांच्यातील कथित 'दुवा' बनलेला राजू नेमका कोणाच्या बळावर सक्रिय आहे, हा प्रश्न आता अधिक तीव्र झाला आहे.

तडीपारीच्या उंबरठ्यावर असल्याची चर्चा असतानाही त्याची शहरातील मुक्त वावर, अड्ड्यांशी संपर्क आणि 'कलेक्शन'ची साखळी अखंडित कशी? अनेक वर्षांपासून वेगवेगळ्या प्रकरणांत नाव झळकूनही त्याच्यावर निर्णायक कारवाई का झाली नाही? जुगार–मटका अड्ड्यांतून होणाऱ्या पैशांच्या प्रवाहात त्याची भूमिका केवळ 'एजंट'पुरती आहे की सूत्रधारांपर्यंत पोहोचणारी कडी, याची चौकशी होणे गरजेचे आहे. नकली नोटांच्या संभाव्य सर्क्युलेशनमध्ये जुगार अड्ड्यांचा वापर 'सेफ झोन' म्हणून होत असल्याचा संशय व्यक्त होत असताना, या साखळीतील खरे संरक्षक कोण, हा मूलभूत प्रश्न अनुत्तरित आहे.

### 'तात्पुरती विश्रांती' की कायमची आवराआवर?

अवैध धंद्यांचे शटर आज बंद असले तरी ही केवळ तात्पुरती **'सेफ्टी मूव्ह'** तर नाही ना, अशी शंका व्यक्त केली जात आहे. प्रकरण शांत झाल्यानंतर पुन्हा त्याच जोमाने व्यवहार सुरू होणार का, याकडे शहराचे लक्ष लागले आहे. जर प्रशासनाने या संधीचा फायदा घेत मुळापर्यंत कारवाई केली, तरच अवैध साखळी खऱ्या अर्थाने खंडित होईल. अन्यथा काही दिवसांचा शुकशुकाट संपताच **'जेंटलमेन राजू'** पुन्हा जुन्याच भूमिकेत दिसणार नाहीत ना, असा रोखठोक सवाल नागरिक उपस्थित करीत आहे.

एकंदरीतच, बातमीच्या धक्क्याने सध्या अड्डे शांत असले तरी पुढील काही दिवसांत चित्र स्पष्ट होणार असून अकोटकरांच्या नजरा आता पोलिसांच्या पुढील पावलांकडे लागल्या आहेत.

### प्रशासनाची खरी कसोटी आता

शुक्रवारी बातमी प्रसिद्ध होताच अड्डे बंद पडणे हीच मोठी कबुली मानायची का, असा सवाल नागरिक विचारत आहेत. जर धंदे खरोखरच बंद असतील, तर पुढे सातत्यपूर्ण कारवाई होणार का? की काही दिवसांनी प्रकरण शांत झाल्यावर पुन्हा 'जेंटलमेन'चे जाळे सक्रिय होणार? अकोट शहर पोलिसांसाठी ही केवळ कारवाईची नव्हे तर विश्वास पुनर्स्थापित करण्याची संधी आहे. अवैध धंद्यांचे जाळे, त्यामागील आर्थिक प्रवाह, नकली नोटांचा संभाव्य शिरकाव आणि त्यातील 'दुवे' यांचा संपूर्ण उलगडा करून पारदर्शक कारवाई झाली तरच हा शुकशुकाट कायमचा ठरेल. अन्यथा, काही दिवसांनी पुन्हा त्याच गल्लीबोळांत अवैध धंद्यांचे अघोषित फलक लागतील आणि **'राजू बन गया जेंटलमेन पण कोणाच्या आश्रयाने?'** हाच प्रश्न पुन्हा शहरात घुमेल एवढे मात्र निश्चित !

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ९३ ■ शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# हायटेक कार, हायटेक चोर 'रिले अटॅक'चे सावट; वर्ध्यात सतर्कतेचा इशारा

## -टेक्नोसॅव्ही चोरट्यांच्या टोळ्या सक्रिय:वाहन मालकांनो काळजी घ्या

**वर्धा जनमाध्यम :** चारचाकी वाहनांच्या दुनियेत आता पारंपरिक चावी इतिहासजमा होत आहे. 'की-लेस' एन्ट्री, पुश बटन स्टार्ट, स्मार्ट सेन्सर सगळं काही एका स्पर्शात, पण कार जितकी स्मार्ट होत आहे, तितकेच चोरटेही 'टेक्नोसॅव्ही' बनत आहेत. मोठ्या शहरांमध्ये काही मिनिटांत महागड्या कार पळवण्याचे प्रकार वाढले असून, वर्ध्यातील वाहनधारकांनीही सावध राहण्याची वेळ आली आहे.

**तोडफोड नाही, थेट सिस्टीम हॅक**

आता कार चोरी म्हणजे काच फोडणे किंवा लॉक तोडणे नव्हे. चोरट्यांच्या टोळ्यांकडे लॅपटॉप, टॅब आणि विशेष सॉफ्टवेअर असते. कार मालकाच्या नकळत सिस्टीममध्ये प्रवेश मिळवून अवघ्या १५ मिनिटांत लॉक उघडले जाते आणि इंजिन स्टार्ट करून कार लंपास लक्झरी कार विशेषतः टार्गेट केल्या जात आहेत.



**'रिले अटॅक' म्हणजे काय?**

चोरटे 'रिले अटॅक' तंत्र वापरतात. स्मार्ट चावी घरात असतानाही बाहेरून शक्तिशाली अँटेनाद्वारे चावीचे सिग्नल पकडले जातात. ते सिग्नल कारच्या सिस्टीमपर्यंत पोहोचवले जातात आणि दार उघडले जाते.

तसेच कारमधील ओबीडी (ध्ह-र्दै अ्रैहदूग्रे) पोर्टचा वापर करून सिस्टीम रिप्रोग्राम केली जाते. हत्यारांची जागा आता गॅजेट्सनी घेतली आहे, आणि त्यामुळे पोलिसांसमोर तपासाचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

**वर्ध्यात धोका टळलेला नाही**

सध्या वर्ध्यात अशा घटना समोर आल्या नसल्या, तरी मोठ्या शहरांतील वाढत्या प्रकारांमुळे धोका नाकारता येत नाही. महागड्या आणि स्मार्ट फीचर्स असलेल्या कारधारकांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.

**कार पार्क करताना या खबरदारी घ्या**

कार नेहमी सीसीटीव्ही असलेल्या सुरक्षित ठिकाणीच पार्क करा.

स्टिअरिंग लॉक, गिअर लॉक यांसारखे पारंपरिक 'फिजिकल' लॉक वापरा. कारमध्ये जीपीएस ट्रॅकर बसवा, जेणेकरून लोकेशन ट्रॅक करता येईल.

स्मार्ट चावी घराच्या मुख्य दरवाजापासून दूर ठेवा.

**'फॅराडे बॅग'मध्ये चावी ठेवून सिग्नल ब्लॉक करा.**

स्मार्ट युगात सुरक्षितताही स्मार्टच हवी. अन्यथा एका क्लिकमध्ये कार गायब होण्याची वेळ येऊ शकते,

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ आयडीबाबत शिक्षणमंत्री सकारात्मक

## -आ.सुधाकर अडबाले यांच्या लक्षवेधीवर मंत्र्यांचे उत्तर

**वर्धा जनमाध्यम :** राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मान्यता व शालार्थ आयडी संदर्भातील प्रश्नावर शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी सकारात्मक भूमिका दर्शवली. मुंबई येथे सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार सुधाकर अडबाले यांनी लक्षवेधीद्वारे हा मुद्दा उपस्थित केला.



आमदार सुधाकर अडबाले यांनी सांगितले की, शासनाने २८ जानेवारी २०१९ रोजी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदरचनेबाबत नवीन आकृतीबंध जाहीर केला होता. त्यानंतर ७ मार्च २०१९ रोजी अनुदानित, अंशतः अनुदानित व उच्च माध्यमिक शाळांतील पदभरतीबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. मात्र, २०२२-२३ पर्यंत पदसंख्या संचमान्यतेत स्पष्ट न दर्शविल्याने भरती प्रक्रिया रखडली.

दि. २१ फेब्रुवारी २०२४ च्या शासन परिपत्रकानुसार पदभरतीला परवानगी देण्यात आली, तर ४ एप्रिल २०२५ रोजी काही अटींनुसार शंभर टक्के पदभरतीबाबत मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या. या आदेशांनुसार अनेक संस्थांनी जाहिराती काढून नियुक्त्या केल्या. शिक्षणाधिकारी यांनी मान्यताही दिल्या. परंतु, २८ मे २०२५ रोजी संचालक पुणे यांच्या स्तरावरून काढलेल्या पत्रामुळे ४ एप्रिल २०२५ च्या परिपत्रकाला स्थगिती मिळाली आणि अनेक शालार्थ आयडी प्रकरणे अडकून पडली.

या प्रक्रियेमुळे नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना दोन वर्षांपासून वेतन मिळालेले नाही. शालार्थ आयडी मंजुरीची अनेक प्रकरणे विभागीय शिक्षण उपसंचालक स्तरावर प्रलंबित असल्याने संबंधित कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे आमदार अडबाले यांनी सभागृहात नमूद केले. प्रलंबित प्रकरणांची तपासणी करून विभागीय उपसंचालकांना निर्णयाचे अधिकार देत तातडीने आदेश काढावेत, अशी मागणी त्यांनी लावून धरली.

यावर उत्तर देताना शिक्षणमंत्री दादाजी भुसे म्हणाले की, २१ फेब्रुवारी २०२४ ते २८ मे २०२५ या कालावधीत झालेल्या नियुक्त्यांची विहित कार्यपद्धतीनुसार तपासणी करण्यात येईल. अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन, शासन निर्णय २०१९ मधील तरतुदी आणि इतर आवश्यक निकष पडताळून पात्र प्रकरणांवर सकारात्मक निर्णय घेतला जाईल.

तसेच ४ एप्रिल २०२५ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने पुढील चार महिन्यांत विभागीय स्तरावर आवश्यक तयारी पूर्ण करून शिक्षकेतर पदांच्या संदर्भातील प्रक्रिया नियमानुसार मार्गी लावली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.या उत्तरामुळे राज्यातील प्रलंबित शालार्थ आयडीधारक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# उच्चशिक्षित नगराध्यक्ष... पण शहर कचऱ्यात

## -पदवी मोठी, पण रस्त्यांवर घाणच घाण : हिंगणघाटकरांनी केला प्रश्न उपस्थित

**हिंगणघाट जनमाध्यम :** शहराला उच्चशिक्षित नेतृत्व लाभल्याचा अभिमान मिरवला जात असताना वास्तव मात्र उलटेच चित्र दाखवत आहे. नंदोरी चौक, तुळसकर महाविद्यालयाकडे जाणारा मार्ग आणि नॅशनल हायवेच्या सर्व्हिस रोडवर साचलेले कचऱ्याचे ढीग प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे करत आहेत.

लोकनियुक्त नगराध्यक्ष नयना तुळसकर उच्च शिक्षित असल्या तरी शहर स्वच्छतेच्या बाबतीत ठोस कृती दिसत नसल्याची नागरिकांत नाराजी आहे. शिक्षणाचा दर्जा मोठा की शहराची अवस्था असा प्रश्न आता चौकाचौकात ऐकू येत आहे.



**घोषणांचा पाऊस, पण साफसफाईचा दुष्काळ**

स्वच्छतेच्या घोषणा केल्या जातात, बैठका होतात, मात्र प्रत्यक्ष रस्त्यावर कचऱ्याचे ढीग तसेच राहतात. सफाई कर्मचारी नियमित कामावर आहेत का, की फक्त कागदोपत्री हजेरी लावली जाते अशी शंका व्यक्त होत आहे.

**आरोग्य धोक्यात**

दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव आणि उडणारी धूळ यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. विद्यार्थ्यांना व ज्येष्ठ नागरिकांना या अस्वच्छतेचा मोठा फटका बसत आहे.

**शहराला कृती हवी**

उच्च शिक्षणाचा खरा उपयोग शहराच्या विकासात आणि स्वच्छतेत दिसायला हवा, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. हिंगणघाटकरांचा स्पष्ट संदेश पदवी नव्हे, तर प्रत्यक्ष कामगिरी दाखवा,

# ओएसडीच्या नावाखाली आदेशाचा खेळ:राज्यमंत्री भोयर अडचणीत

## -उसणवारीच्या आदेशाला हरताळ; काँग्रेसचा थेट न्यायालयाचा इशारा

### -शासन नियमांची पायमल्ली सहन करणार नाही : मनोज चांदूरकरांचा घणाघात

**वर्धा जनमाध्यम :** राजकारणात आदेश' एक आणि 'कारभार' दुसरा, अशी परिस्थिती निर्माण झाली तर प्रश्न उपस्थित होणारच राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या कार्यालयातील ओएसडी नियुक्तीवरून जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले आहे. ग्रामविकास विभागाच्या २५ मार्च २०२५ च्या शासन आदेशानुसार जिल्हा परिषद वर्धाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानदा फणसे यांची उसणवारी तत्त्वावर राज्यमंत्री कार्यालयाच्या आस्थापनेवर नियुक्ती करण्यात आली. मात्र त्या प्रत्यक्षात राज्यमंत्र्यांच्या ओएसडी म्हणून कार्यरत असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसने केला आहे.

जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मनोज चांदूरकर यांनी पत्रकार परिषदेत थेट शब्दांत हल्लाबोल केला. शासन आदेशात नमूद पद आणि प्रत्यक्षात पार पडणारे काम यात विसंगती असेल, तर तो नियमभंग आहे. महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ आणि उसणवारी धोरण स्पष्ट आहे. अधिकारी केवळ आदेशात नमूद पदावरच कार्यरत राहू शकतो, असा ठाम दावा त्यांनी केला.

३ एप्रिल २०२५ पासून जिल्हा परिषदेकडून कार्यमुक्त करण्यात आलेल्या डॉ. फणसे यांचे वेतन अद्याप जिल्हा परिषदेतूनच होत असल्याचेही काँग्रेसने नमूद केले. रुजू अहवाल कोठे? रजा कोण मंजूर करते? ओएसडी म्हणून स्वतंत्र शासन आदेश आहे का २५ मार्चच्या आदेशात बदल किंवा पूरक आदेश काढला आहे का असे प्रश्न उपस्थित करत चांदूरकर यांनी मुख्य सचिव, प्रधान सचिव, आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना निवेदन दिल्याचे सांगितले.

या निवेदनाची दखल न घेतल्यास आम्ही न्यायालयाचे दरवाजे ठोठावू,असा इशारा देत त्यांनी प्रशासनाला आव्हान दिले.

दरम्यान, जिल्हा परिषदचे सीईओ पराग सोमण यांनी या प्रकरणावर सावध भूमिका घेतली. हा विषय माझ्या येण्याअगोदरचा आहे. शासन आदेशानुसारच नियुक्ती झाली आहे, असे ते म्हणाले.

या प्रकरणी डॉ. ज्ञानदा फणसे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र प्रतिसाद मिळू शकला नाही.

राजकारणात नियुक्त्या नेहमीच चर्चेचा विषय ठरतात; पण शासन आदेश आणि प्रत्यक्ष कार्य यात तफावत असेल, तर तो केवळ प्रशासकीय मुद्दा राहत नाही, तो लोकशाहीच्या पारदर्शकतेचा प्रश्न बनतो. आता प्रशासन स्पष्टीकरण देते की न्यायालयीन लढाई रंगते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# 'राजश्री शाहू महाराज वसाहत' नामकरणाची मागणी

**आर्वी जनमाध्यम :** जनता नगर-मेहर नगर परिसराला लागून असलेल्या वसाहतीला 'झोपडपट्टी'ऐवजी 'राजश्री शाहू महाराज वसाहत' असे नाव देण्यात यावे, तसेच येथील रहिवाशांना नियमित करपावत्या देऊन शासकीय योजनांचा लाभ मिळावा, अशी मागणी महिला-बाल कल्याण सभापती सौ. भारती दिलीप पोटफोडे यांनी सर्वसाधारण सभेत केली.

या मागण्यांसंदर्भात त्यांनी आर्वी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुमितदादा वानखेडे यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करून निवेदन पाठविले. अधिवेशनासाठी मुंबईत असतानाही आमदारांनी विषय गांभीर्याने घेत आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती पोटफोडे यांनी दिली. त्यानंतर नगराध्यक्षा स्वातीताई प्रकाश गुल्हाने यांची भेट घेऊन विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. मुख्याधिकारी डॉ. किरण सुक्कलवाड यांच्याकडेही निवेदन देत विषय सभागृहात मांडून निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.



**करपावत्या व नोंदणीचा प्रश्न-** सदर वसाहतीला २००५ पर्यंत नियमित करपावत्या दिल्या जात होत्या. २०११ मधील ठरावानंतर अतिक्रमणाची नोंद झाल्याने अनेक कुटुंबे शासकीय योजनांपासून वंचित राहिली आहेत. तो ठराव रद्द करून पूर्वीप्रमाणे करपावत्या देण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली. झोपडीवजा घरांची नोंदणी बंद असल्याने नागरिकांना पाणी व वीज जोडणी मिळण्यात अडचणी येत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले.

**स्वच्छालय व इतर विकासकामे-** जनता नगर येथील बांधून पूर्ण झालेले शासकीय स्वच्छालय तातडीने सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली. तसेच जनता नगर ते बाग मोहल्ला दरम्यान लेंडी नाल्यावर पूल उभारणे, अंडरग्राउंड नाल्या, परिसर सौंदर्यीकरण व अभ्यासिकेसाठी पुस्तकांची उपलब्धता यांसारख्या विकासकामांवरही भर देण्यात आला. नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी पाठपुरावा सुरू राहणार असल्याचे पोटफोडे यांनी स्पष्ट केले.

# हॉर्टिकल्चर दिनानिमित्त पीकेव्ही अकोला येथे दोन दिवस शिवार फेरीचे आयोजन

**वर्धा जनमाध्यम :** डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठाच्यावतीने कृषि विभाग, आत्मा व पाणी फाऊंडेशनच्या सहकार्याने हॉर्टिकल्चर दिनानिमित्त २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी कृषी विद्यापीठात फळे, भाजीपाला, फुलपिके तथा औषधी- सुगंधी वनस्पती पिकांच्या शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी या शिवार फेरीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

विदर्भातील वातावरणात उत्पादित होणारे व बाजारपेठेत चांगली मागणी असणारे फळे, भाजीपाला, फुलपिके, औषधी व सुगंधी वनस्पती पिकांचे जिवंत प्रात्यक्षिके पाहण्याची व शास्त्रज्ञांकडून लागवड तंत्रज्ञान जाणून घेण्याची सुवर्णसंधी शेतकरी बंधू-भगिनींना या शिवार फेरीत मिळणार आहे. दोन्ही दिवस विद्यापीठाचे प्रक्षेत्र शेतकरी बंधू भगिनींचे अवलोकनासाठी खुले राहणार असून विविध चर्चासत्रांच्या माध्यमातून शास्त्रज्ञांकडून शंका समाधान देखील होणार आहे. याप्रसंगी कृषीविषयक प्रदर्शनीचे देखील आयोजन करण्यात आले असून बचत गटांच्या माध्यमातून प्रक्रियायुक्त पदार्थ तथा खाद्य पदार्थ देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

यंदाच्या हॉर्टिकल्चर दिनाचे वैशिष्ट्य म्हणजे एकूण ३७० एकर क्षेत्रावर उद्यान विद्याविषयक ७०३ पिकांचे प्रात्यक्षिके यामध्ये ३३ विविध भाजीपाला पिकांचे ३८ वाण, २० एकर क्षेत्रावर भाजीपाला लागवड प्रात्यक्षिके फळ पिकांच्या ४२ वाणांचे, ३०० एकर क्षेत्रावर लागवड तंत्रज्ञान प्रात्यक्षिके, १० एकर क्षेत्रावर ५४० औषधी व सुगंधी वनस्पती पिकांची प्रात्यक्षिके राहणार आहे.

सदर दोन दिवसीय उद्यानविद्या विषयक शिवार फेरी व चर्चासत्र कार्यक्रमाचे उद्घाटन शनिवार दिनांक २८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता उद्यान विद्या महाविद्यालयाचे प्रक्षेत्रावर होणार आहे. केवळ राज्यातीलच नव्हे तर देशभरातील शेतकरी बंधू-भगिनी, कृषीशी निगडित विस्तारकर्ते, अधिकारी, कर्मचारी, युवक युवती, विद्यार्थी विद्यार्थिनी युवक- युवती आदिनी अद्वितीय संधीचा स्वतः लाभ तर घ्यावाच मात्र सोबतच आपल्या संपर्कातील इतरांना देखील याविषयी माहिती द्यावी. वर्धा जिल्ह्यातील सर्व शेतकरी बंधू, महिला व युवकानी डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे अवश्य भेट देऊन आधुनिक व प्रगत कृषी तंत्रज्ञानाची माहिती घ्यावी व त्याचा लाभ घ्यावा, असे कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. जीवन कतोरे यांनी कळविले आहे.

### शुध्दीपत्रक

दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ ला छापण्यात आलेल्या ***कार्यालय ग्रामपंचायत, रिधोरा, त.सेलू, जि.वर्धा*** या कार्यालयाच्या बांधकाम निविदे मध्ये निविदा सादर करण्याचा दिनांक हा *२३.०२.२०२६ ते ०४.०३.२०२६ सायं.५ वाजेपर्यंत असे छापण्यात आले आहे. आता निविदा सादर करण्याचा दिनांक हा २३.०२.२०२६ ते ०२.०३.२०२६ सायं.५.०० वाजेपर्यंत असे वाचण्यात यावे.*

**आदेशानुसार**

# विजांच्या कडकडाटासह वादळ व गारपिटीचा इशारा : नागरिकांनी सतर्क राहावे

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात पुढील काही तासांत विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केले आहे.

जोरदार वाऱ्यामुळे झाडे उन्मळून पडणे, वीजवाहिन्यांचे नुकसान होणे तसेच कच्च्या घरांच्या छपरांचे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. गारपिटीमुळे उभ्या पिकांना फटका बसू शकतो. मोकळ्या जागेत असलेल्या नागरिकांनी आणि जनावरांनी विशेष काळजी घ्यावी, असेही सूचित करण्यात आले आहे.

नागरिकांनी शक्यतो घरातच राहावे, खिडक्या-दरवाजे घट्ट बंद ठेवावेत आणि अनावश्यक प्रवास टाळावा. झाडाखाली उभे राहणे टाळावे तसेच विजेच्या उपकरणांचे प्लग काढून ठेवावेत. पावसादरम्यान पाण्यात उभे राहणे किंवा वीजवाहक वस्तूंना स्पर्श करणे धोकादायक ठरू शकते. दरम्यान, शेतकऱ्यांनी परिपक्व पिकांची तातडीने काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवण करावी. फळबागांमध्ये गारजाळी किंवा संरक्षणात्मक उपाययोजना कराव्यात, असे कृषी विभागाने सुचविले आहे. प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत असून कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास स्थानिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन आपत्ती व्यवस्थापन विभागाने केले आहे.

# दारूच्या नशेत दुचाकी चालकाला अटक, वाहन जप्त

## -निर्मल बेकरी चौकात वाहतूक पोलिसांची कारवाई

**वर्धा जनमाध्यम :** शहरात होळी व रंगपंचमीच्या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलिसांनी विशेष तपासणी मोहीम राबविली असून दारूच्या नशेत दुचाकी चालविणाऱ्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. संबंधित वाहन जप्त करण्यात आले आहे.



पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या आदेशानुसार निर्मल बेकरी चौकात नाकाबंदी लावण्यात आली होती. सायंकाळी सहाच्या सुमारास हिरो होंडा (एमएच ३२ एफ ४२४५) ही दुचाकी अतिवेगाने व अनियंत्रितपणे येताना दिसली. पोलिसांनी वाहन थांबवून चालकाची चौकशी केली असता तो दारूच्या नशेत असल्याचे आढळले. वैद्यकीय तपासणीत वैभव गजानन श्रीरामे (वय ३५, रा. कुरझडी जामठा, वर्धा) यांनी दारू सेवन केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर वर्धा शहर पोलीस स्टेशन येथे मोटार वाहन कायदा कलम १८५ अन्वये गुन्हा नोंदवून आरोपीस अटक करून दुचाकी जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई वाहतूक पोलीस निरीक्षक विलास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एएसआय संजय भांडेकर, पोलीस हवालदार प्रदीप कोहळे, महिला अंमलदार दर्शना वानखेडे व वैशाली लेंडे यांनी केली.


## ग्रामपंचायत कार्यालय, वाठोडा (भा.) ता.आर्वी, जि.वर्धा

**ग्रामपंचायत वाठोडा (भा.) येथे शौचालय बांधकाम दुरुस्ती व नाली सफाई बाबतचे कामाबाबत निविदा**

| अ. क्र. | कामाचे नांव | गावाचे नांव | योजनेचे नांव | प्राकलन किंमत | निविदा स्विकारण्याचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | नाली साफसफाई करणे | वाठोडा (भा.) | २० टक्के देखभाल दुरुस्ती | २०४००० | ०२.०३.२०२६ ०९.०३.२०२६ | १०.०३.२०२६ |
| २. | प्राथमिक शाळेचे शौचालय बांधकाम दुरुस्ती. | वाठोडा (भा.) | १५ वा वित्त आयोग | ४०००० | ०२.०३.२०२६ ०९.०३.२०२६ | १०.०३.२०२६ |

**अटी व शर्ती-**

१) फंडात निधी उपलब्धतेनुसार देयके प्रदान करण्यात येतील. २) अटी व शर्ती शासकीय नियमानुसार राहील त्यात फेरफार करणे/नामंजूर करण्याचे अधिकार सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांना राहतील. शासकीय शर्थी लागू राहील. ३) कामाच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. ४) निविदा ग्रामपंचायतच्या सोयीनुसार उघडण्यात येतील. ५) कामाच्या मुल्यांकनानंतर देयकाचे शोधन करण्यात येईल.

**दिनांक २६.०२.२०२६**

**स्वा/-**
**प्रशासक,**
**ग्रामपंचायत कार्यालय वाठोडा**
**ता.आर्वी, जि.वर्धा**

**स्वा/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत कार्यालय वाठोडा**
**ता.आर्वी, जि.वर्धा**

# मराठीला ज्ञान भाषेत रूपांतरित करून पुढील पिढीपर्यंत नेऊया-मुख्यमंत्री

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विधान भवनात 'जावे विनोदाच्या गावा' विशेष कार्यक्रम



**मुंबई/प्रतिनिधी :** जगामध्ये ज्ञानभाषा असलेल्या भाषांच पुढे प्रवाहित होत असल्याचा इतिहास आहे. ज्या भाषेतून व्यवहार चालतो, रोजगार मिळतो, ती भाषा प्रगतीचा भाव जागृत करते. त्यामुळे आपल्या अभिजात मराठी भाषेला ज्ञानभाषेत रू पांतरित करू न समृद्ध अशी मराठी भाषा आपण पुढील पिढीपर्यंत नेउया, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित 'जावे विनोदाच्या गावा' या विशेष कार्यक्रमात व्यक्त केला.

कार्यक्रमास व्यासपीठावर विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधान परिषद उपसभापती डा. नीलम गो-हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, मराठी भाषा समिती प्रमुख आशुतोष काळे, विधिमंडळ सचिवालयाचे सचिव जितेंद्र भोळे उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांनी त्या काळात मराठी भाषा शुद्ध होण्यासाठी शब्दकोश तयार केला. त्यावेळी प्रशासन चालविताना मराठीवर फारशी, अरबी या भाषांचे आक्रमण होते. त्यामुळे मराठी भाषेचे शुद्धीकरण करण्याचे कार्य छत्रपती शिवाजी महाराज यांनी केले. मराठी भाषेचा अभिमान हा सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून सुरू होतो. सुरु वातीच्या काळातील आद्य ग्रंथांमधून आपली मराठी भाषा किती अभिजात आहे, हे आपल्याला पाहायला मिळते.

महाराष्ट्राच्या विधान मंडळात चालत असलेले कामकाज राजकीय क्षेत्र साहित्य निर्मिती करणारे आहे. या कामकाजामधूनच अनेक चित्रपट, नाट्य यांच्या कथानकांना विषय मिळत असतात. मराठीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अभिजात भाषेचा दर्जा देउन राजाश्रय मिळवून दिला आहे. मराठी भाषा, आपल्या भाषेतील साहित्य आणि लोककला जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

**■ तंत्रज्ञान, संशोधन मराठी भाषेतून झाले पाहिजे**-विधानसभा अध्यक्ष अड राहुल नार्वेकर

मराठी भाषेला समृद्ध करायचे असेल, पुढे न्यायचे असेल तर तंत्रज्ञान, संशोधने ही मराठी भाषेतूनच झाली पाहिजेत. तेव्हा मराठी ही ज्ञानभाषा होईल, असा विश्वास विधानसभा अध्यक्ष अड राहुल नार्वेकर यांनी व्यक्त केला.अध्यक्ष नार्वेकर म्हणाले, मराठी भाषा ही देशातील अधिकृत २२ भाषांपैकी एक असून देशात १ हजार ६५२ बोलीभाषा आहेत. मराठी भाषिक लोकसंख्या ही देशात तिस-या आणि जगामध्ये दहाव्या क्रमांकावर आहे. मराठी भाषेला समृद्ध आणि पुढे नेण्यासाठी शासनस्तरावर विविध प्रयत्न करण्यात येत आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यात आला. मराठी भाषा समृद्ध करणे आणि पुढील पिढीपर्यंत टिकवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची असल्याचेही ते म्हणाले.

**■ संकटातही जो विनोद शोधतो तो खरा मराठी माणूस-उपमुख्यमंत्री शिंदे**

मराठी माणसाच्या रक्तातच विनोद आहे. विनोद हा समाजामध्ये माणूस जोडणारा पूल आहे. त्यामुळे संकटातही जो विनोद शोधतो, तोच खरा मराठी माणूस आहे, अशा शब्दात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठी माणसाचा गौरव केला. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, आचार्य अत्रे आणि पु. ल. देशपांडे ही मराठी भाषेतील विनोदाची दोन शिखरे आहेत. त्यांच्या कर्तुत्वाची उंची हिमालयाएवढी आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून दिला आहे. त्यामुळे मराठी भाषा समृद्ध होण्यास मोठी मदत होणार आहे. मराठीचा वापर सर्व क्षेत्रात व्यवहाराची भाषा म्हणून केला पाहिजे. मराठीच्या समृद्धीची पताका सातासमुद्रापार आपल्याला फडकवत ठेवायची आहे. मराठी भाषेने मागील काळात बरेचसे बदल आत्मसात केले आहेत.

उपलब्ध साधनांचा पुरेपूर उपयोग करून मराठीची समृद्धी वाढविली पाहिजे. विश्व मराठी संमेलनाच्या माध्यमातून जगभरात विविध देशांमध्ये कार्यरत असलेले मराठी बांधव आपण एकत्र आणण्याचे काम केले आहे. अशा या समृद्ध मराठीचा वारसा पुढे नेण्यासाठी आपण कटिबद्ध होउया, असे आवाहनही यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केले.

**■ डिजिटल माध्यमांवर मराठी भाषेचा अधिकाधिक उपयोग करावा**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

तंत्रज्ञानाच्या युगात वावरत असताना डिजिटल माध्यमांमध्ये मराठीचा अधिकाधिक वापर करणे गरजेचे आहे. प्रत्येक डिजिटल माध्यमांचा उपयोग करताना मराठीचा उपयोग करीत अधिक सक्षमपणे पुढील पिढीपर्यंत समृद्ध मराठीचा वारसा नेण्यात यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.उपमुख्यमंत्री सुनिता पवार म्हणाल्या, लंडनमध्ये मराठी व महाराष्ट्राच्या संस्कृतीचे केंद्र ठरणा-या प्रस्तावित महाराष्ट्र भवन उभारण्यासाठी मागील काळात पाच कोटी रु पयांचा निधी देण्यात आला आहे. मराठी भाषेच्या प्रचारासाठी सार्वजनिक ग्रंथालयांना अनुदानही वाढवून देण्यात आले आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यामुळे समस्त मराठी जन आनंदित झाले आहेत. हा मराठी भाषेचा खूप मोठा गौरव आहे. मराठी भाषा ही अर्थाजनाची भाषा होण्यासाठी हा दर्जा निश्चितच महत्त्वाचा ठरणार आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपसभापती डॉ. नीलम गो-हे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट करीत मराठी साहित्याची महती विषद केली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मराठी भाषा समिती प्रमुख आशुतोष काळे यांनी केले.कार्यक्रमादरम्यान लोकसेवेचा लोकजागर या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाला मंत्री, राज्यमंत्री, विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे सदस्य, विधिमंडळाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने यांनी केले. जावे विनोदाच्या गावा कार्यक्रम सादर करणा-या कलावंतांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

**■ 'जावे विनोदाच्या गावा' विशेष कार्यक्रम**

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित 'जावे विनोदाच्या गावा' या विशेष कार्यक्रमामध्ये विनोदी कविता, विडंबन गीत, मराठी गीत सादर करण्यात आले. गायक श्रीरंग भावे आणि गायिका अदिती प्रभुदेसाई यांनी गीत सादर केले. लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी हे कविवर्य सुरेश भट यांनी लिहिलेले आणि कौशल इनामदार यांनी संगीतबद्ध केलेले मराठी अभिमान गीत सादर करण्यात आले. अभिनेते ऋषिकेश जोशी यांनी पु. ल देशपांडे यांच्या विनोदी लेखाचे वाचन केले. 'जगी हा खास वेड्यांचा पसारा' जयवंत दळवी लिखित लेखाचे वाचन दिग्दर्शक केदार शिंदे यांनी केले. मंगेश पाडगावकर लिखित कवितेचे केदार शिंदे यांनी वाचन केले. तसेच वि. दा करंदीकर लिखित 'साठीचा गजर' कविता ऋषिकेश जोशी यांनी सादर केली. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी यांनी आचार्य अत्रे आणि पु. ल. देशपांडे यांच्या जीवनकार्यांवर आधारित व्याख्यान केले.

# मार्च महिन्यातील बँकांच्या सुट्ट्या जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी-** मार्च महिन्यात बँकेत काही महत्त्वाचे काम असल्यास सुट्ट्यांचे नियोजन आधीच करून ठेवणे गरजेचे आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) दरवर्षीप्रमाणे विविध राज्ये आणि शहरांनुसार बँकांच्या सुट्ट्यांची यादी जाहीर करते. त्यानुसार मार्च महिन्यात अनेक सण आणि साप्ताहिक सुट्ट्यांमुळे बँकांचे कामकाज काही दिवस ठप्प राहणार आहे. त्यामुळे ग्राहकांनी वेळेत व्यवहार पूर्ण करणे आवश्यक आहे.फेब्रुवारी महिन्याचा चौथा शनिवार २८ फेब्रुवारी रोजी आल्यामुळे त्या दिवशी देशभरातील बँका बंद असतील. त्यानंतर १ मार्च हा रविवार असल्याने सलग दुस-या दिवशीही बँकांना सुट्टी असेल. त्यामुळे २७ फेब्रुवारीपर्यंतच आवश्यक व्यवहार पूर्ण करण्याचा सल्ला दिला जात आहे. मार्च महिन्यातील नियमित साप्ताहिक सुट्ट्यांमध्ये १, ८, १५, २२ आणि २९ मार्च या रविवारी बँका बंद राहतील. तसेच १४ मार्च हा दुसरा शनिवार आणि २८ मार्च हा चौथा शनिवार असल्याने त्या दिवशीही बँकांचे कामकाज होणार नाही. २ मार्च रोजी कानपूर आणि लखनौ येथे होलिका दहन निमित्त




बँका बंद राहतील. इतर शहरांमध्ये मात्र त्या दिवशी नियमित कामकाज सुरू राहणार आहे. ३ आणि ४ मार्च रोजी डोल जतरा, धुलिवंदन आणि होळी निमित्त देशातील अनेक शहरांमध्ये बँका बंद राहतील. भोपाळ, देहरादून, गंगटोक, गुवाहाटी, हैदराबाद, जयपूर, कोलकाता, मुंबई, नागपूर आणि पाटणा येथे ३ व ४ मार्चला सुट्टी असेल. ४ मार्च रोजी होळी निमित्त अहमदाबाद, भुवनेश्वर, चंदीगड, इम्फाळ, ईटानगर, जम्मू, कानपूर, लखनौ, नवी दिल्ली आणि रायपूरसह इतर काही शहरांत बँका बंद राहतील.१३ मार्च रोजी चापचर कुट सणानिमित्त आयजोल येथे बँकांना सुट्टी असेल. १७ मार्च रोजी शब-ए-कद्र निमित्त जम्मू आणि श्रीनगर येथे बँका बंद राहतील. १९ मार्च रोजी गुढी पाडवा निमित्त महाराष्ट्रासह सुमारे ११ राज्यांतील विविध शहरांत बँका बंद राहण्याची शक्यता आहे. २० मार्च रोजी ईद-उल-फित्र आणि जुमात-उल-विदा निमित्त पाच राज्यांमध्ये बँकांना सुट्टी असेल. २६ आणि २७ मार्च रोजी श्री रामनवमी निमित्त काही राज्यांमध्ये बँकांचे कामकाज बंद राहील. तसेच ३१ मार्च रोजी महावीर जयंतीनिमित्त १५ राज्यांतील शहरांत बँका बंद असतील. दरम्यान, शाखा बंद असल्या तरी ग्राहकांना नेट बँकिंग, मोबाईल बँकिंग आणि एटीएमच्या माध्यमातून व्यवहार करता येणार आहेत.

# विश्व मराठी संमेलनानिमित्त दुमदुमली कुसुमाग्रजांची नगरी

**नाशिक/प्रतिनिधी-** मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, परंपरा, मराठी भाषा - अभिजात मराठीचा जागर करीत आणि ज्ञानोबा माउली, तुकारामाच्या गजराने आज सकाळी कविवर्य कुसुमाग्रजांची नगरी अर्थात नाशिक शहर दुमदुमून निघाले होते. त्यात भर पडली होती ती लेझीम, ढोल वादनाची. निमित्त होते, चौथे विश्वमराठी संमेलनाचे. कविवर्य कुसुमाग्रज यांच्या निवासस्थानापासून आज सकाळी चौथ्या विश्व मराठी संमेलनानिमित्त शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत विद्यार्थ्यांसह हजारो नागरिक सहभागी झाले होते.महापौर हिमगौरी आडके- आहेर, उपमहापौर विलास शिंदे, मराठी भाषा विभागाचे सचिव डा किरण कुलकर्णी, सहसचिव डा. नामदेव भोसले, मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस अड. नितीन ठाकरे, मराठी भाषा विकास संस्थेचे संचालक डा. श्यामकांत देवरे, जिल्ह्यातील कवी, साहित्यिक यांच्यासह नीलम शिर्के आदी सहभागी झाले होते. त्यांच्या हस्ते ग्रंथ आणि पालखीचे पूजन करण्यात आले. तसेच मराठी भाषा गौरव दिवस अर्थात कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.चौथे विश्व मराठी संमेलन मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेच्या केटीएचएम महाविद्यालयाच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या कविवर्य कुसुमाग्रज नगरीत होत आहे. या नगरीत १ मार्च २०२६ पर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आज सकाळी पालखीसह शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत पारंपरिक लोककला, नृत्य पथक, बोहाडा पथक, लेझीम, ढोल पथकासह वारकरी दिंडी काढण्यात आली. भव्य-दिव्य अशी विठ्ठलाची मूर्ती, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा मुकुट, बोहाडा पथकातील विविध रूपे नागरिकांचे आकर्षण ठरली होती.कुसुमाग्रजांच्या निवासस्थानापासून निघालेली शोभायात्रा त्र्यंबक रोड, सीबीएस, मेहेर सिग्नल, अशोकस्तंभ मार्गे कविवर्य कुसुमाग्रज नगरीत पोहोचली. तेथे शोभायात्रेचा समारोप



झाला. या शोभायात्रेत मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, परंपरा, मराठी भाषा अभिजात मराठीचा जागर करण्यात आला. या शोभायात्रेत विविध शाळा, महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शालेय विद्यार्थ्यांनी अभिमान मराठी, अभिजात मराठी संदर्भात विविध संदेश देत विश्व मराठी संमेलनाचाही संदेश दिला. या शोभायात्रेत विन्टेज कार देखील सहभागी झाल्या. त्यात बसण्याचा आनंद अनेकांनी लुटला.

# रोहित पवारांनी शिवतीर्थावर घेतली राज ठाकरेंची भेट



**मुंबई/प्रतिनिधी-** रोहित पवार यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची शिवतीर्थ येथे भेट घेत महाराष्ट्राच्या राजकारणात चर्चेला उधाण आले आहे. आज मराठी भाषा गौरव दिनाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या भेटीत मराठी माणसाला न्याय मिळत नसल्याची खंत रोहित पवार यांनी व्यक्त केली. विशेषतः अजित पवार यांच्या कथित विमान अपघात प्रकरणातील चौकशीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करत त्यांनी या विषयात मनसेने पाठिंबा द्यावा, अशी मागणी केली. भेटीनंतर माध्यमांशी संवाद साधताना रोहित पवार यांनी सांगितले की, राज ठाकरे यांनी तातडीने वेळ दिली आणि जवळपास सव्वातास सविस्तर चर्चा झाली. सुरु वातीला नेमका विषय काय आहे, अशी विचारणा राज ठाकरे यांनी केली असता अजित दादांच्या अपघातासंदर्भातील संशय आणि घातपाताच्या शक्यतेविषयी माहिती द्यायची असल्याचे त्यांनी सांगितले. दादांशी जुने संबंध असल्यामुळेच राज ठाकरे यांनी हा विषय गांभीर्याने ऐकून घेतल्याचे रोहित पवार म्हणाले.

या बैठकीत सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पोलिसांनी एफआयआर का दाखल केला नाही, हा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज ठाकरे यांनी कायदेशीर बाबींचा अभ्यास करत सुप्रीम कोर्टाच्या दोन महत्त्वाच्या दाखल्यांचा उल्लेख केल्याचे रोहित पवार यांनी सांगितले. अपघाती मृत्यूची नोंद झाल्यानंतरही आवश्यक असल्यास एफआयआर दाखल करणे बंधनकारक असते, तसेच कोणतीही तक्रार आल्यास पोलिसांनी एफआयआर घेणे कायद्याने आवश्यक आहे, असे मत राज ठाकरे यांनी मांडल्याचे ते म्हणाले. रोहित पवार यांनी सांगितले की, महाराष्ट्रात एखाद्या व्यक्तीची तक्रारच नोंदवली जात नसेल तर ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे, असे राज ठाकरे यांनी नमूद केले. मराठी माणसाला न्याय मिळत नसेल तर त्यासाठी जे काही करावे लागेल ते करू , अशी भूमिका त्यांनी व्यक्त केल्याचेही रोहित पवार यांनी सांगितले. अजित दादांशी आपण जवळून काम केले असून वैयक्तिक संबंधही होते, त्यामुळे हा विषय आपल्यासाठी भावनिकदृष्ट्याही महत्त्वाचा असल्याचे राज ठाकरे यांनी नमूद केल्याचे त्यांनी सांगितले.मराठी भाषा दिनाच्या दिवशीच ही भेट झाल्याचा उल्लेख करत रोहित पवार म्हणाले की, मराठी अस्मितेसाठी राज ठाकरे सातत्याने लढत आले आहेत. त्यामुळे दादांच्या प्रकरणात न्याय मिळावा यासाठी मनसेने आपल्या पक्षाच्या माध्यमातून आणि कार्यकर्त्यांच्या ताकदीने साथ द्यावी, अशी विनंती त्यांनी केली. त्यावर राज ठाकरे यांनी विचार करण्याची गरज नसून आपण दादांसोबत आहोत आणि न्याय मिळवण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करू , असे आश्वासन दिल्याचे रोहित पवार यांनी सांगितले. या भेटीनंतर राज्यातील राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, मनसे या प्रकरणात नेमकी कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# एफआयआरला सरकार का घाबरतेय?

## ■ अजितदादांच्या विमान अपघातावर राज ठाकरेंचा सवाल ■ संशयाची सुई

**मुंबई/प्रतिनिधी :** अजित पवारांच्या विमान अपघाताबाबत एफआयआर का नोंदवला जात नाही?, ३-३ ठिकाणी प्रयत्न करू नही एफआयआर नोंदवण्यासाठी सरकार आडकाठी का आणतंय याची उत्तरे सरकारने दिली पाहिजेत. पोलीस अधिका-यांवर दबाव का आणला जातोय? सरकारी दबावामुळे जर एफआयआर नोंदवला जात नाही तर यामागे काहीतरी काळबेर आहे, सरकार एका एफआयआरला का घाबरतंय? हे जनतेला सांगावे लागेल असे सांगत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी बारामती विमान अपघातावरू न सरकारला प्रश्न विचारले आहेत.आमदार रोहित पवार यांनी राज ठाकरे यांची भेट घेतली होती. या भेटीनंतर राज ठाकरे यांनी या संपूर्ण प्रकरणावर भाष्य केले. पत्रकारांशी बोलताना राज ठाकरे म्हणाले की, रोहित पवारांनी येउन मला अपघाताबाबत सगळ्या तांत्रिक गोष्टी सांगितल्या. मला त्या सगळ्या बोलण्यातून एक गोष्ट जाणवली. त्यांनी ३ ठिकाणी एफआयआर करण्याचा प्रयत्न केला. तिन्हीही ठिकाणी सरकारकडून एफआयआर घेतले नाहीत. त्यामुळे इथेच मला संशयाची सुई जाते. पोलिसांनी एफआयआर घेउ नये असं सरकारला का वाटते? मरीन ड्राईव्ह पोलिस स्टेशनला तिथले अधिकारी एफआयआर लिहून घेत होते. तो टाईप करत असतानाच डीसीपी आले आणि एफआयआर लिहून घेउ नका असं सांगितले, हे कशासाठी? हा निव्वळ अपघात असेल, तो घातपात नसेल किंवा त्यांच्या घरच्यांना जर संशय असेल आणि तपास नीट व्हावा यासाठी



एफआयआर हवा असेल तर त्यांना सरकारकडून अडथळे का आणले जातायेत? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री म्हणून तिथे बसल्या आहेत. त्यांनीही या गोष्टीचा विचार केला पाहिजे.

# राजस्थानात ९ वर्षीय विद्यार्थिनीचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

## शाळेच्या मैदानात खेळताने अचानक कोसळली



**नागौर/वृत्तसंस्था-** राजस्थानच्या नागौर जिल्ह्यामधील गोटन येथे एका ९ वर्षीय शाळकरी विद्यार्थिनीचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची घटना घडली. दिव्या राजेंद्र बापेडिया असे या बालिकेचे नाव असून ती गोटन येथील गोटन इंटरनॅशनल स्कूलची विद्यार्थीनी होती.यासंदर्भातील माहितीनुसार दिव्या बापेडिया नेहमीप्रमाणे २६ फेब्रु वारी रोजी सकाळी ७.४८ वाजता शाळेत पोहचली.प्रार्थना सुरू होण्यापूर्वी ती इतर विद्यार्थ्यांसोबत शाळेच्या क्रीडांगणावर खेळत होती. त्याच वेळी ती अचानक तोल जाउन खाली कोसळली व बेशुद्ध झाली. शाळेच्या प्रशासनाने तत्काळ हालचाल करून तिला गोटन येथील शासकीय रु ग्णालयात दाखल केले; मात्र वैद्यकीय अधिका-यांनी तपासणीअंती तिला मृत घोषित केले. प्राथमिक वैद्यकीय तपासणीत मृत्यूचे कारण हृदयविकाराचा तीव्र झटका असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तिच्या शरीरावर कोणतीही बाह्य दुखापत आढळली नाही तसेच पूर्वी कोणत्याही गंभीर आजाराचा इतिहास नसल्याची माहिती देण्यात आली. घटनेचे सीसीटीव्ही चित्रफीत समोर आली असून त्यात दिव्या खेळत असताना अचानक कोसळताना दिसत आहे. ही चित्रफीत सोशल मिडीयावर व्हायरल झाली आहे.या घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अवघ्या ४ महिन्यांपूर्वी दिव्याच्या मोठ्या भावाचाही हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला होता, अशी माहिती आहे. अल्पावधीत एका कुटुंबातील २ मुलांचे निधन झाल्याने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.नातेवाईकांनी शवविच्छेदनास नकार दिल्यानंतर आवश्यक शासकीय प्रक्रिया पूर्ण करून पार्थिव त्यांच्या ताब्यात देण्यात आले. या घटनेमुळे लहान मुलांमधील वाढत्या हृदयविकाराच्या धोक्यांविषयी चिंता व्यक्त केली जात आहे.

# पवारांसाठी राज्यसभेची जागा सोडणार नाही

## उबाठा आमदार वरू ण सरदेसाई यांची स्पष्टोक्ती

**मुंबई :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संपल्यानंतर आता सर्वांचं लक्ष लागलंय ते राज्यसभा आणि विधानपरिषदांच्या निवडणुकांकडे. विशेष म्हणजे एप्रिल महिन्यात राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांचा कार्यकाळ संपत असल्याने शरद पवार पुन्हा राज्यसभेवर जाणार का याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. कारण, गेल्या काही दिवसांपासून ते रुग्णालयात आहेत. त्यामुळे, प्रकृतीच्या कारणास्तव ते थांबणार की पुन्हा राज्यसभेवर



जाणार याचे कोडे पुढील काही दिवसांतच उलगडेल. मात्र, राज्यसभेच्या एका जागेवर महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांकडून दावा केला जात आहे. ठाकरेंच्या शिवसेनेचे आमदारा आदित्य ठाकरेंनंतर आता आमदार वरुण सरदेसाई यांनीही दावा केला आहे. राज्यसभेच्या जागेसाठी कुठल्याही परिस्थितीत आम्ही आमचा दावा सोडणार नाही, आमच्या पक्षातील आमदारांनी उद्धव ठाकरेंसमोर आपले मत मांडले आहे. सन २०२० साली आम्ही राष्ट्रवादीच्या फौजिया खान यांच्या उमेदवारीवेळी मदत केली होती. त्यानंतर संजय पवार आमचे उमेदवार दिलेले असताना आणि संख्याबळ असताना सुद्धा ते पराभूत झाले. आता संख्याबळानुसार आमचे संख्याबळ अधिक आहे. त्यामुळे जर आमचा खासदार कार्यकाळ पूर्ण करत असेल तर आमच्याच पक्षाचा उमेदवार राज्यसभेसाठी जाईल, असे वरुण सरदेसाई यांनी म्हटले.शरद पवार हे मोठे नेते आहेत, शरद पवार उमेदवार म्हणून इच्छुक असतील आणि त्यांच्या नेत्यांकडून तसेच महाविकास आघाडीकडून तसं बोललं गेलं तरीही आम्ही आमचा राज्यसभेच्या जागेसाठीचा दावा सोडणार नाहीत, अशा शब्दात वरुण सरदेसाई यांनी राज्यसभेच्या जागेवर ठाकरेंच्या शिवसेनेचा दावा केला आहे. विधान परिषद आणि राज्यसभा या दोन वेगवेगळ्या जागा आहेत. दोन वेगळे विषय आहेत, विधानपरिषदेत उद्धव ठाकरे यांचा कार्यकाळ पूर्ण होणार असल्याने ती जागा सुद्धा अर्थातच आमची असेल, असेही सरदेसाई यांनी स्पष्ट केले.

विकसित देशांसोबतच्या व्यापारातून भारताला दीर्घकालीन फायदे मिळण्याची आशा आहे. अमेरिका आणि युरोपमध्ये उच्च क्रयशक्ती आहे आणि ते दर्जेदार उत्पादनांसाठी जास्त किंमत देण्यास तयार आहेत. भारताचा औषध उद्योग, माहिती तंत्रज्ञान, कापड, वाहन घटक, अभियांत्रिकी वस्तु, रत्ने आणि दागिने आणि कृषी प्रक्रिया क्षेत्रांना चालना मिळू शकते. विकसित देशांसोबत व्यापार आणि करारांमुळे भारतात परकीय गुंतवणूक वाढू शकते. त्यामुळे उत्पादन क्षमता, रोजगार आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे हस्तांतरण शक्य होऊ शकते. यामुळे जागतिक पुरवठा साखळीत भारताची भूमिका मजबूत होऊ शकते. विकसित देशांच्या मजबूत अर्थव्यवस्था आणि भांडवलशाही समाजाशी जुळवून घेताना भारताचा विकसनशील समाज आव्हानांना तोंड देतो. विकसित देशांमध्ये भांडवल, तंत्रज्ञान, दरडोई उत्पन्न, बचत, गुंतवणूक आणि नागरिकांचे राहणीमान आणि मजबूत अर्थव्यवस्था यांचे उच्च स्तर आहेत. विकसनशील देशांमध्ये दरडोई उत्पन्न कमी आहे आणि राष्ट्रीय उत्पन्नाच्या प्रमाणात बचत आणि गुंतवणुकीचे प्रमाण कमी आहे. लोकसंख्या मोठी आहे; परंतु कमी कार्यक्षम आहे. भांडवलनिर्मितीचे प्रमाण कमी आहे आणि आयात जास्त आहे. म्हणूनच भारतासाठी या देशांमध्ये अधिक गुंतवणुकीची संधी आहे. या पार्श्वभूमीवर बदलत्या काळात कामगिरीची झेप आणि नेमकी आव्हाने या अनुषंगाने भारताची स्थिती समजून घ्यायला हवी. विकसनशील देशांमध्ये, लोकसंख्येचा एक महत्त्वाचा भाग शेतीमध्ये गुंतलेला आहे, तरीही उत्पादन देशाच्या गरजेपेक्षा कमी आहे. विकसित देशांना कच्चा माल आणि कामगारकेंद्रित उत्पादनांची आवश्यकता असते, तर विकसनशील देशांना भांडवल, तंत्रज्ञान, यंत्रसामग्री आणि उच्च गुणवत्तेच्या उत्पादनांची आवश्यकता असते. म्हणूनच दोघांमधील व्यापार बहुतेकदा गरज-आधारित दृष्टिकोनावर आधारित असतो. परिणामी, विकसित देशांसोबत मुक्त व्यापार करार करणे भारताची जलद प्रगती भविष्यातील आर्थिक संधी तसेच धोरणात्मक जोखीमदेखील निर्माण करू शकते. विकसित देशांच्या कंपन्या, त्यांच्या तंत्रज्ञानावर, भांडवलावर आणि ब्रँड नावांवर अवलंबून भारतीय बाजारपेठेत वेगाने प्रवेश करतील. त्यामुळे लहान शेतकरी आणि देशांतर्गत उद्योगांवर दबाव निर्माण होण्याची शक्यता आहे. स्वस्त आयातीमुळे व्यापार तूट वाढण्याचा, स्थानिक उत्पादन कमकुवत होण्याचा आणि

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# बाजारपेठेतील अनिश्चितता

रोजगारावर परिणाम होण्याचा धोकादेखील निर्माण होतो; शिवाय पेटंट, डेटा, पर्यावरणीय आणि कामगार मानके यासारखी परिस्थिती भारताच्या आर्थिक आणि राजकीय निर्णय घेण्याच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालू शकतात. गेल्या चार दशकांमध्ये भारताच्या अर्थव्यवस्थेने उल्लेखनीय परिणाम साध्य केले आहेत. जागतिक व्यापार संघटनेच्या धोरणांमुळेदेखील लक्षणीय आणि सकारात्मक फायदे मिळाले आहेत. १९९५ मध्ये जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेमुळे जागतिक व्यापार नियमांमध्ये एकरूपता आली, व्यापारातील अडथळे कमी झाले आणि देशांमधील बाजारपेठेतील प्रवेश सुलभ झाला.विकसित देशांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत वर्चस्व गाजवण्यापासून रोखण्यासाठी जागतिक व्यापार संघटनेने अन्याय्य अनुदाने,डंपिंग आणि व्यापारातील अडथळ्यांवर नियम स्थापित केले.याचा फायदा भारतासारख्या विकसनशील देशांना निर्यात विस्ताराच्या स्वरूपात झाला. जागतिक व्यापारांतर्गत आयात शुल्क कमी करण्याच्या आणि व्यापार अधिक पारदर्शक करण्याच्या प्रक्रियेमुळे भारतीय उत्पादनांसाठी नवीन बाजारपेठा उघडल्या. जागतिक व्यापार संघटना आणि मुक्त व्यापार करार जागतिक व्यापार वाढवण्याबद्दल बोलतात; परंतु त्यांच्या स्वरूप, उद्देश आणि परिणामात मूलभूत फरक आहेत. हा फरक विकसित आणि विकसनशील देशांमधील व्यापार संबंधांमध्ये एक प्रकारचा विरोधाभास निर्माण करतो. जागतिक व्यापार संघटना ही एक बहुपक्षीय संस्था आहे, जी नियमांवर आधारित जागतिक व्यापार प्रणाली स्थापित करते, तर मुक्त व्यापार करार हे निवडक देशांमधील विशेष सवलती आणि अटींवर आधारित प्रादेशिक किंवा द्विपक्षीय व्यवस्था असतात. यामुळे विकसित आणि विकसनशील देशांमधील व्यापारात समानतेऐवजी असंतुलन वाढते. दुसरीकडे, मुक्त व्यापार करार पूर्णपणे वेगळे असतात. मुक्त व्यापार करारांमध्ये काही देश आपापसात शुल्क कमी करून किंवा काढून टाकून व्यापार वाढवतात. मुक्त व्यापार करार बहुतेकदा विकसित देशांसाठी एक धोरणात्मक शस्त्र बनतात. जागतिक व्यापार संघटनेत व्यापक सहमती मिळवू शकत नाहीत, तेव्हा ते मुक्त व्यापार करारांद्वारे आपले हितसंबंध पुढे नेतात. विकसित देश, मुक्त व्यापाराच्या नावाखाली, केवळ शुल्क कमी करण्यापुरते मर्यादित राहत नाहीत, तर पेटंट नियम, डेटा स्थानिकीकरण, कठोर कामगार आणि पर्यावरणीय मानके, सरकारी नियम आणि इतर नियमांवरदेखील निर्बंध लादतात. ते परदेशी कंपन्यांना वस्तू खरेदी करण्याची संधी आणि गुंतवणूक विवादांचे निराकरण अशा अटी जोडतात. या अटींचा परिणाम असा होतो, की विकसनशील देशांचे आर्थिक धोरणे तयार करण्याचे स्वातंत्र्य मर्यादित होते. भांडवलशाही शक्तीकडून राजकीय प्रभावाची शक्यतादेखील वाढते आणि ही परिस्थिती भारतासारख्या विकसनशील आणि लोकशाही देशासाठी आव्हाने वाढवू शकते. नवीन व्यापार करारांमुळे भारताचा अमेरिका आणि युरोपीय बाजारपेठांमध्ये प्रवेश वाढेल, निर्यात वाढेल आणि परकीय गुंतवणूक आणि तंत्रज्ञान हस्तांतरणासाठी संधी खुल्या होतील. त्याच वेळी, विकसित देशांमधील मोठ्या कंपन्या कमी दराने देशांतर्गत बाजारात प्रवेश केल्याने भारताच्या लघु आणि मध्यम आकाराच्या उद्योगांवर आणि शेतीवर दबाव वाढू शकतो. नियमांवर आधारित बहुपक्षीय प्रणालीबद्दल बोलत असतानाही, विकसित देश स्वतःचे हितसंबंध पुढे नेण्यासाठी प्रादेशिक करारांचा अवलंब करतात. ट्रम्प यांच्या धोरणांमुळे आणि जागतिक वित्तीय बाजारपेठेतील अनिश्चिततेमुळे भांडवल जागतिक स्तरावर विकसित आणि मजबूत अर्थव्यवस्थांकडे वळले आहे. शिवाय, त्या देशांमध्ये सोने आणि चांदीची गुंतवणूक सुरक्षित आणि आशादायक मानण्याचा कल वाढत आहे. तेथील गुंतवणुकीत पाच ते बारा टक्क्यांनी वाढ झाली आहे, तर आपल्या देशात परदेशी संस्थात्मक आणि पोर्टफोलिओ गुंतवणुकीत लक्षणीय घट झाली आहे.

# आसाममध्ये, भाजपा विजयाची हॅट्रिक साधणार ?

आसाममध्ये लवकरच विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत.त्या दृष्टीने सत्ताधारी भाजपा आणि प्रमुख विरोधी पक्ष असलेली काँग्रेस पार्टी यांची निवडणुकीसाठी जोरदार तयारी सुरू आहे.आसाममध्ये यावेळी गेल्या खेपेप्रमाणे काँग्रेसच्या नेतृत्वाखालील विरोधी पक्षांची आघाडी (महाजोत) निवडणुकीच्या रिंगणात दिसणार नाही.यावेळेस काँग्रेस,स्वबळावर विधानसभा निवडणूक लढण्याची शक्यता आहे.२०२१ मध्ये झालेल्या आसाम विधानसभा निवडणुकीत काँग्रेस बरोबर असलेले ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट आणि बोडो पिपल्स फ्रंट हे पक्ष याखपेस काँग्रेस बरोबर असणार नाहीत.परफ्युम किंग बद्रुद्दीन अजमल यांच्या नेतृत्वाखालील ऑलइंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट हा पक्ष या खेपेला स्वबळावर निवडणूक लढवणार आहे,तर बोडो पिपल्स फ्रंट हा पक्ष भाजपा बरोबर निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे.२०२१ मध्ये झालेल्या आसाम विधानसभा निवडणुकीत आसाम विधानसभेच्या एकूण १२६ जागांपैकी ९४ जागा काँग्रेसने लढवल्या होत्या,तर ३२ जागा काँग्रेसने आघाडी (महाजोत) मधील मित्र पक्षांसाठी सोडल्या होत्या.काँग्रेसने लढविलेल्या ९४ जागांपैकी २९ जागांवर पक्षाला विजय मिळाला होता.काँग्रेसने मित्र पक्षांसाठी सोडलेल्या ३२ जागांपैकी १६ जागा ऑलइंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट या पक्षाने जिंकल्या होत्या,तर बोडो पिपल्स फ्रंटने ४ जागा जिंकल्या होत्या.वरील दोन्ही घटक पक्षांचा जिंकण्याचा स्ट्राईक रेट हा काँग्रेसपेक्षा चांगला होता.२०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीने (महाजोत) एकूण ५० जागा जिंकल्या होत्या.

गेल्या खेपेला भाजपाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने आसाम विधानसभा निवडणुकीत ७५ जागा जिंकल्या होत्या.त्या मध्ये भाजपाने जिंकलेल्या ६० जागांचा समावेश होता.अशा प्रकारे भाजपाने २०२१ मध्ये लागोपाठ दुसऱ्यांदा आसामची सत्ता काबीज केली होती.२०११ साली विधानसभेच्या ७८ जागा जिंकून आसामची सत्ता काबीज करणाऱ्या, काँग्रेसची नंतर घसरगुंडी झाल्याचे चित्र आपल्याला पाहायला मिळाले आहे.२०१६ मध्ये झालेल्या आसाम विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला २६ जागांवर विजय मिळाला होता.तर ६० जागा जिंकून भाजपाने आसामची सत्ता काबीज केली होती.२०११ साली ७८ जागा जिंकणाऱ्या काँग्रेसने,२०१६ साली झालेल्या निवडणुकीत पुर्वीच्या तुलनेत ५२ जागा गमावल्या होत्या.तर २०११ मध्ये विधानसभेच्या केवळ ५ जागा जिंकणाऱ्या भाजपाने २०१६ साली झालेल्या निवडणुकीत ६० जागा जिंकून पुर्वीच्या तुलनेत ५५ जागा जास्त मिळवल्या होत्या.



या पार्श्वभूमीवर लवकरच होणाऱ्या आसाम विधानसभा निवडणुकीत भाजपा आणि काँग्रेस यांची कामगिरी कशी होईल,याचा थोडक्यात आढावा घेऊया.२०२१ मध्ये झालेल्या आसाम विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने २९ जागा जिंकल्या होत्या.काँग्रेसला मिळालेल्या मतांची टक्केवारी होती २९.७ टक्के इतकी.तर ६० जागा जिंकणाऱ्या भाजपाला मिळालेल्या मतांची टक्केवारी होती ३३.२ टक्के इतकी.याचा अर्थ दोन्ही पक्षांना मिळालेल्या मतांच्या टक्केवारीत ४ टक्क्यांपेक्षाही कमी अंतर होते.मात्र दोन्ही पक्षांना मिळालेल्या जागांमध्ये ३१ जागांचे अंतर होते.याखेपेला काँग्रेससाठी फारशी अनुकूल परिस्थिती दिसत नाही.

गेल्या खेपेस काँग्रेसच्या बरोबर असलेले मित्रपक्ष आता त्यांना सोडून गेले आहेत.विशेषत: ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट हा पक्ष यावेळी काँग्रेस बरोबर नसल्याने,त्याचा मोठा फटका काँग्रेसला यावेळी बसू शकतो.लोअर आसाममध्ये बंगाली मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणात असून तेथे काँग्रेस आणि ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट यांच्यात मुस्लिम मतांचे मोठ्या प्रमाणात विभाजन झाल्यास त्याचा फायदा भाजपाला मिळू शकतो.लोअर आसाम मध्ये बंगाली मुस्लिमांचा,ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंटला आजवर मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आला आहे.

अप्पर आसाममध्ये भाजपा अतिशय मजबूत स्थितीत असून तेथे भाजपा समोर काँग्रेसची डाळ शिजेल असे वाटत नाही.काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष भुपेन बोरा यांनी नुकताच काँग्रेसचा राजीनामा देऊन भाजपात प्रवेश केला आहे.त्यामुळे काँग्रेस संघटनेचे फार मोठे नुकसान झाले आहे.२०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत विरोधी पक्षांची (महाजोत) आघाडी उभारण्यात,भुपेन बोरा यांनी महत्वाची भूमिका बजावली होती.आता ते भाजपा बरोबर गेल्याने,त्याचा मोठा फटका काँग्रेसला याखेपेच्या विधानसभा निवडणुकीत बसू शकतो.२०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत काही जागा, काँग्रेसने अतिशय कमी मतांनी जिंकल्या होत्या.

गेल्यावेळच्या तुलनेत या खेपेस काँग्रेसच्या मतांची टक्केवारी एक-दोन टक्क्यांनी कमी झाली तर काँग्रेसला मिळणाऱ्या जागांवर त्याचा विपरित परिणाम होऊ शकेल.अशा परिस्थितीत गेल्या खेपेला जिंकलेल्या २९ जागा टिकवणेही काँग्रेससाठी अवघड होऊन बसेल.

या उलट गेल्या वेळच्या तुलनेत या खेपेस भाजपाला जास्त जागा मिळण्याची शक्यता असून विजयाची हॅट्रिक साजरी करण्याची संधी भाजपाला मिळू शकेल.

**अभय गोखले**

## दूषित हवेबरोबर पाण्याचे संकट

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने राज्यसभेत दूषित पाण्यासंबंधी मोठी आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. त्या आकडेवारीनुसार गेल्या पाच वर्षात पाण्यापासून पसरणाऱ्या रोगात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. या आजारामध्ये हिपॅटायटिस ,कॉलरा, लेप्टोस्पायरोसिस तसेच टाईफाईड याचा समावेश आहे . केंद्र सरकारने केंद्रशासित प्रदेश, व सर्व राज्ये यामधून केलेल्या आकडीवरी नुसार पाण्याचे पासून पसरणारे रोग मोठ्या प्रमाणात पसरत आहेत असे दिसते. २०२१ हे वर्ष विचार करता हिपॅटायटिस रुग्णामध्ये ८९० टक्के तर कॉलरा रुग्णात ४२१ टक्के वाढ झाली आहे. याच बरोबर टायफाईड मध्ये १९१ टक्के , लेप्टोस्पायरोसिस मध्ये २४३ टक्के वाढ झाली आहे. ही बातमी नुकतीच वाचण्यात आली. आजपर्यंत दूषित हवेपासून रोग मोठ्या प्रमाणावर पसरतात असे ऐकत होतो पण आता दूषितहवेप्रमाणेच पाण्यापासून सुद्धा मोठ्या प्रमाणावर रोग पसरत आहेत . असे दिसते आहे. २०२५ मध्ये मध्य प्रदेशामध्ये तब्बल टायफाईड चे ५६००७ एवढे रुग्ण आढळून आले आहेत.हे देशातील सर्वात जास्त रुग्ण आहेत . अलीकडे दूषित पाण्याचे मोठे संकट देशभर आहे . त्याने अलीकडे उग्र स्वरूप धारण केले आहे. नद्या स्वच्छ राहिलेल्या नाहीत . शहरीकरणामुळे नद्या मध्ये सांडपाणी व औद्योगिक वसाहतीमधील दूषित द्रव्ये मिसळत आहेत यामुळे देशातील अनेक नद्या मोठ्या प्रमाणावर दूषित झालेल्या आहेत दिवसेंदिवस हे संकट वाढत जाणार आहे. वेळीच सावध राहावयास हवे नाहीतर भविष्य काळात आपण काहीही करू शकणार नाही.

**शांताराम वाघ**

## सन्मान की मनोरंजनाच्या नावाखाली अपमान?

येत्या काही दिवसांत आपण जागतिक महिला दिन साजरा करणार आहोत. स्त्रीशक्तीचा, तिच्या कर्तृत्वाचा, त्यागाचा, संघर्षाचा आणि स्वाभिमानाचा सन्मान करण्याचा हा दिवस आहे. स्त्री सन्मानाचे गोडवे गात विविध कार्यक्रम, व्याख्याने आणि सत्कार समारंभ आयोजित केले जातील. मात्र एकीकडे स्त्रियांचा सन्मान करण्यासाठी कार्यक्रम आयोजित केले जात असताना दुसरीकडे डिजिटल माध्यमांतून महिलांचे वस्तूकरण करणारे कार्यक्रम सर्वत्र प्रसारित होत असतील, तर हा सन्मान केवळ दिखावा ठरत नाही का? असा प्रश्न उपस्थित होतो.

जिओ हॉटस्टार या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रसारित होणाऱ्या 'रिॲलिटी शो' मध्ये दाखवले जाणारे 'टास्क' म्हणजे मनोरंजनाच्या नावाखाली स्त्रीची घोर विटंबनाच आहे.'लॅप डान्स', 'मड टास्क', 'आइस क्यूब टास्क' यांसारख्या अत्यंत हीन दर्जाच्या कृत्यांद्वारे महिलांचे वस्तूकरण केले जात आहे. हाताचा वापर न करता केवळ तोंडाने महिलांचे वस्त्र काढण्यासारखे, सार्वजनिकरीत्या महिलांना स्पर्श करून आंघोळ घालणे, अंगाला चिखल लावणे असे अत्यंत घाणेरडे प्रकार दाखवले जात आहे. अशा दृश्यांचा तरुण पिढीवर किती घातक परिणाम होऊ शकतो, याचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे.अशा कार्यक्रमांमुळे स्त्री म्हणजे केवळ करमणुकीचे साधन अशी मानसिकता तयार होण्याचा धोका आहे आणि जी समाजासाठी धोक्याची घंटा आहे असे स्पष्टपणे दिसून येते. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली सुरू असलेला स्वैराचार बंद व्हायलाच हवा. डिजिटल माध्यमांवर अंकुश ठेवण्यासाठी राज्य सरकारने 'सांस्कृतिक देखरेख समिती' चे गठण करून कठोर कारवाई करावी.

**प्रिया बागडदेव**

## सणाचे पावित्र्य जपा

होळीच्या ठिकाणी बोंब मारण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे; मात्र हल्ली या प्रथेच्या आड कुणाचे तरी नाव घेऊन घाणेरड्या शिव्या घातल्या जातात. धुलीवंदनाच्या दिवशी एकमेकांना रासायनिक रंग फासले जातात ज्यामुळे बऱ्याचदा गंभीर स्वरूपाचे त्वचाविकार होतात. नासकी अंडी फेकून मारली जातात, मद्यपान करून रस्त्यांवर धिंगाणा घातला जातो, महिलांना पाहून अश्लील शेरेबाजी केली जाते. लोकांना आणि गाड्या अडवून जबरदस्तीने पैसे उकळले जातात. या अपप्रकारांना रोखण्यासाठी दरवर्षी पोलिसांना शासनाकडून आदेश द्यावे लागतात, याची खरे तर आपल्याला लाज वाटायला हवी. हिंदू धर्मातील प्रत्येक सण आणि उत्सव यामागे लोककल्याणाचा आणि सामाजिक एकोप्याचा उदात्त हेतू दडलेला आहे.सणांमागील शास्त्र लक्षात घेऊन ते साजरे केल्यास मनुष्याला त्यातून आनंद मिळतो.

**मोक्षदा घाणेकर**

# शेतकरी आत्महत्येचा कलंक पुसा...

कृषिशास्त्रज्ञ एम. एस. स्वामिनाथन यांनी व्यापक राष्ट्रीय कृषी धोरणावर आधारित दिलेल्या आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सखोल मांडणी करणाऱ्या अहवालाला वीस वर्षे लोटली. कृषी सुधारणांसाठी त्यांनी केलेल्या प्रमुख शिफारशी स्वीकारल्या गेल्या नाहीत. त्यातील काही सोयीच्या वा फारशा अडचणीच्या न ठरणाऱ्या तरतुदी धोरणात आणल्या गेल्या. मात्र, शेती तोट्याची बनल्याने होत असलेल्या शेतकरी आत्महत्यांवर ठोस मार्ग काढण्यात राज्यकर्त्यांना अपयश आले आहे, हे मान्य करावे लागेल. विकासाचे प्राधान्यक्रम ठरवताना डावलला गेलेला शेतकरीवर्ग, मध्यमवर्ग मतदाराचे जपले गेलेले ग्राहकहित, त्यातून अनुनयाचे राजकारण करताना शेती आणि शेतकऱ्याच्या प्रश्नांकडे कमालीचे दुर्लक्ष झाले. शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक मान्य करण्यास अलिखित नकार दिला गेला. या वस्तुस्थितीमागील कारणांचा शोध घेण्याची तयारी ठेवावी लागेल. ती याचसाठी की, करभारात अडकलेल्या जागतिक व्यापाराच्या लाटा थोपवताना सरकारची दमछाक होताना दिसते. या लाटेत शेती-शेतकरी टिकवण्याचे आव्हान आणखी गडद झाले. आज या प्रश्नाचे गंभीर परिणाम दिसू लागल्याने त्याची दखल घेण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.

वाढत्या शेतकरी आत्महत्या, अर्थव्यवस्थेतील शेतीची अपरिहार्य भूमिका, या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा ठरतो. तो घेताना शेतकरी आत्महत्यांचा हा विषय केवळ कर्जमाफीने किंवा तकलादू योजनांनी सुटणारा नाही, त्यासाठी आणखी एक ठोस पाऊल टाकण्याची गरज सरकारने मान्य केलेली दिसते. राज्याच्या विकासाचे प्रयत्न सुरू असताना सामाजिक विकासाचा आलेख घटता असेल, तर त्याला विकास तरी कसे म्हणावे? या



**महाराष्ट्रात वाढत्या शेतकरी आत्महत्यांवर सरकारने टास्क फोर्स स्थापन करत हा विषय अजेंड्यावर आणला ते बरे झाले. या जिव्हाळ्याच्या आणि एकुणात कृषी समुदायाला दिलासा देणाऱ्या निर्णयाचे आजतरी स्वागत करायला हवे.**

विकास निर्देशांकात शेतकरी आत्महत्येचा कलंक कसा पुसावा, असा प्रश्न पडणे साहजिक आहे. त्याचे समाधानकारक उत्तर आता तरी शोधावे लागणार आहे. ते सरकारला कृतीतून द्यावे लागेल. टास्क फोर्सच्या कामाची रूपरेषा लक्षात घेता आत्महत्येमागील मानसिक, आर्थिक आणि सामाजिक कारणांवर बरीच चर्चा आधीच झाली आहे. त्याचे अहवाल सरकारकडे आहेत. आता नव्याने काय शोध घेणार? प्रश्न आहेच. सरकारच्या हेतूबद्दल संशय घेता येणार नसला, तरी आव्हान मोठे आहे.

ज्या सांख्यिकीच्या आधारे सरकारला जाग आली, ती धक्कादायक आणि अस्वस्थ करणारी आहे. आत्महत्या हा गुन्हा असल्याने पोलिस दफ्तरी झालेल्या नोंदीवरून पुढे आलेली ही आकडेवारी आहे. या गंभीर सामाजिक प्रश्नाचे मोजमाप करणारी स्वतंत्र यंत्रणाही अस्तित्वात नसावी, हे त्याहून गंभीर. राष्ट्रीय गुन्हे सांख्यिकी विभागाच्या २०२३ च्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्र हा शेतकरी आत्महत्येचा देशातील प्रमुख ?'हॉटस्पॉट?' बनला आहे. गेल्या दोन वर्षांतील आकडेवारीही चिंतेत भर घालणारीच. शेतकरी आत्महत्या प्रभावग्रस्त राज्यांमध्ये महाराष्ट्राचा क्रमांक वरचा आहे, म्हणजे सुमारे ३९ टक्के. पाठोपाठ कर्नाटक २३ टक्के, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, तामिळनाडू या राज्यांचा समावेश होतो. या अहवालातून आणखी एक धक्कादायक आकडेवारी समोर येते, ती म्हणजे शेतकरी आत्महत्या करतोच, त्याचबरोबर शेतमजूरही गळफास जवळ करतो आहे. या आकडेवारीनुसार, ४ हजार ६९० शेतकऱ्यांनी, तर ६ हजार ९६ शेतमजुरांनी आत्महत्या केल्या. त्यातही पुरुषांची संख्या अधिक. तुलनेत महिला हा मरणाचा मार्ग न स्वीकारता जगण्याच्या संघर्षाला हिमतीने, जबाबदारीने सामोऱ्या जाताना दिसतात.

देशातील एकूण आत्महत्याग्रस्तांपैकी सुमारे ६६ टक्क्यांहून अधिक शेतकरी आणि मजुरांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी होते आणि आत्महत्येच्या प्राथमिक कारणांपैकी ते एक महत्त्वाचे आहे. गरिबी, दारिद्र्य, तुटपुंजी आणि न परवडणारी शेती, जगण्याच्या बंद झालेल्या अन्य वाटा, ऐन हंगामात धान्याचे दर पाडून शेतकऱ्याची सरकारी यंत्रणांच्या डोळ्यांदेखत केली जाणारी लूट, केवळ कागदावर राहिलेला शेतीमाल हमीभाव, लहरी निसर्ग, जलसिंचनाच्या सोयीसुविधांचा, शिक्षणाचा अभाव, कर्जबाजारीपणा, कुटुंबावरील वाढता खर्च, मुलांचे शिक्षण, सामाजिक दबाव, कर्त्या पुरुषातील व्यसनाधीनता, सामाजिक सुरक्षा योजनांचा अभाव, वैद्यकीय कारणासाठी होणारी लूट अशा काही प्रमुख कारणांनी ही शेतकरी कुटुंबे देशोधडीला लागली. मराठवाडा, विदर्भात मोठ्या संख्येने होणाऱ्या शेतकरी आत्महत्यांमागे दडलेल्या अन्य कारणांचाही शोध घ्यावा लागेल. यातील गंभीर वास्तव म्हणजे शेतमजूर हा मूळचा शेतकरी होता. मुंबईत स्थलांतरित झालेला मोठा वर्ग शेतीतून बाहेर फेकला गेलेला आहे. आत्महत्यांमागील आर्थिक, सामाजिक, मानसिक, कौटुंबिक कारणांचा शोध घेता या सर्वांच्या तळाशी शेतकरी कुटुंबाचे तोट्यातले, न परवडणारे अर्थकारण दडले आहे. कारणांचे मूळ येथे आहे. या शेतकरी कुटुंबांचे जीवनमान सुधारताना त्यांना कायमस्वरूपी आर्थिक स्थैर्य कसे मिळेल, त्यासाठीच्या प्रयत्नांवर धोरणकर्त्यांचा भर हवा. तो न दिल्यास विकासातील हा मोठा अडसर ठरू शकतो.

शेतकरी कर्जमाफीसह सरकार शेतकऱ्यांसाठी विविध योजनांवर जो खर्च करते त्यातील किती रक्कम थेट शेतकऱ्यापर्यंत पोहोचते, याचाही शोध घेतलेला बरा. शेतकऱ्याचा आर्थिक स्तर वाढवताना त्याला किमान जगण्यापुरते उत्पन्न शेतीतून कसे मिळेल, त्यासाठी मुळातूनच कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील, जलसिंचनाच्या योजना त्याच्या बांधापर्यंत कशा पोहोचवता येतील यावर भर हवा. सरकार समित्या नेमते, त्यांचे अहवाल कधी येतात ते कधीच स्पष्ट होत नाही. समित्यांच्या शिफारशी राज्यकर्त्यांच्या दुर्बल इच्छाशक्तीत अडकून पडतात; मग ते सरकार कोणत्याही पक्षाचे असो. हे अपयश गेल्या तीस-चाळीस वर्षांतील कृषिनीतीचे आहे. या टास्क फोर्सच्या निमित्ताने शेतकऱ्यांसाठीच्या योजनांवर होणाऱ्या खर्चाचे ऑडिट करावे, त्यावर श्वेतपत्रिका जाहीर करावी. या योजनांचे सकारात्मक परिणाम का दिसत नाहीत, याचा शोध घ्यावा. या त्रुटी किंवा त्यातील दोष मान्य करावेत. हे पाऊल परिणामकारक ठरायचे असेल, तर या मूलभूत प्रश्नाचे उत्तर शोधलेच पाहिजे. ही महाराष्ट्रासारख्या प्रगतिशील राज्याने, संवेदनशील सरकारने अत्यंत गंभीरपणे घेण्याचीच बाब आहे.

जिल्हा परिषद, पंचायत समित्या,ग्रामपंचायती, साखर कारखाने, सहकारी सोसायट्या, बँका-पतसंस्थांच्या निवडणुकांसाठी घराघराचा उंबरा झिजवणाऱ्या कार्यकर्त्यांना शेतकऱ्याच्या दारातील, घरातील हे दैन्य आणि त्याचे मरण दिसत कसे नाही? विकासाच्या प्राधान्यक्रमात कृषक समुदायाला वरचे स्थान द्यावे लागेल. या पार्श्वभूमीवर टास्क फोर्सचा निव्वळ फार्स ठरणार नाही, ही अपेक्षा.

**विजय जाधव**

जनमाध्यम

## संस्थापक अध्यक्ष संपर्काबाहेर, डी.डी.आर. कार्यालयाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह

# तेजस्विनी सोसायटी प्रकरणात सायबर चौकशीची धडक !



हीच ती बँक जीला कुलूप ठोकण्यात आले

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : तेजस्विनी अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट वूमन सोसायटी लिमिटेड (रजि. नं. 404/23-24) या पतसंस्थेभोवती निर्माण झालेल्या संशयाच्या वातावरणात आता प्रशासनाच्या भूमिकेवरही गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रमोद सुधाकर शिंदे संपर्क क्षेत्राबाहेर असल्याची माहिती समोर आली असून अनेक खातेदारांना मुदतपूर्तीची रक्कम न मिळाल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, नागपूर सायबर सेल पथकाने यवतमाळ येथे येऊन प्राथमिक चौकशी केल्याने प्रकरण अधिकच गाजू लागले आहे.

सोसायटीच्या नावावर कथित 'फ्रॉड अकाउंट'मधून लाखो रुपयांचे व्यवहार झाल्याची तक्रार नागपूर येथे दाखल झाल्याची माहिती समोर येत आहे. अध्यक्षांचा मोबाईल बंद असून ते निवासस्थानीही उपलब्ध नसल्याचे सांगितले जात आहे. परिणामी एफडी, डीआयडी व इतर ठेवखातेधारकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेकांनी घरातील दागिने गहाण ठेवून ठेवी केल्याची चर्चा असून "आमचे कष्टाचे पैसे परत मिळणार का?" असा सवाल सर्वत्र उपस्थित होत आहे.खातेदारांच्या चौकशीदरम्यान सोसायटी कर्मचाऱ्यांनी आपण अधिकृत नियुक्तीपत्राविना, केवळ मानधनावर काम करत असल्याचे सांगितल्याने व्यवस्थापनाच्या कार्यपद्धतीवर शंका अधिकच बळावली आहे. अध्यक्षांशी संपर्क होत नसल्याने सभासदांनी व सोसायटी कर्मचाऱ्यांनी सोसायटीला कुलूप ठोकले आहे व कामकाज बंद ठेवण्याचा निर्णय घेतल्याचे समजते.

### डी.डी.आर. कार्यालयाची जबाबदारी निश्चित होणार का?

याप्रकरणात सर्वाधिक चर्चेत आहे ते सहकार विभागाचे स्थानिक नियंत्रण यंत्रणा. जिल्हा उपनिबंधक (DDR) कार्यालयाचे प्रमुख म्हणून कार्यरत असलेले नानासाहेब चव्हाण यांच्या कार्यालयाकडून नियमित तपासणी, लेखापरीक्षण व नियंत्रणाची जबाबदारी पार पाडली गेली का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. सहकार क्षेत्रात कार्यरत शासकीय कार्यालयांची जबाबदारी केवळ नोंदणीपुरती मर्यादित नसून, ठेवीदारांच्या हितरक्षणासाठी वेळोवेळी ऑडिट, ताळेबंद तपासणी व अनियमितता आढळल्यास तात्काळ कारवाई करणे अपेक्षित असते.मात्र जिल्ह्यात यापूर्वीही काही पतसंस्थांची प्रकरणे गाजली, पण ती परस्पर दाबली गेल्याची चर्चा वारंवार समोर आली आहे. कारवाई न होता प्रकरणे थंड बस्त्यात गेल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. जर प्राथमिक टप्प्यातच कठोर पावले उचलली असती, तर आजची परिस्थिती उद्भवली नसती, असे मत सहकार क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत.

### नागरिकांना न्याय मिळणार का?

सध्या सर्वात मोठा प्रश्न आहे तो ठेवीदारांच्या पैशांचा. शासनाने व सहकार विभागाने तात्काळ विशेष लेखापरीक्षण जाहीर करून वस्तुस्थिती जनतेसमोर मांडावी, जबाबदाऱ्यांची निश्चिती करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच संबंधित शासकीय अधिकाऱ्यांच्या कामकाजाचीही चौकशी करून निष्काळजीपणा आढळल्यास त्यांच्यावरही कारवाई व्हावी, अशी नागरिकांची भूमिका आहे.सहकार क्षेत्र हे विश्वासावर उभे असते. तो विश्वास डळमळीत झाल्यास सर्व सामान्यांचा आर्थिक कणा मोडतो. त्यामुळे "प्रकरण दाबण्याची परंपरा" मोडून काढत पारदर्शक व कठोर कारवाई झाली तरच खातेदारांना खरा न्याय मिळेल का अन्यथा जिल्ह्यातील ठेवीदारांचा विश्वास कायमचा ढासळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# टिपेश्वर ESZ मध्ये बेकायदेशीर रिसॉर्ट्स ?

## प्रधान मुख्य वनसंरक्षकांकडे तक्रार ; प्रकरण विधानसभेत गाजणार

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - टिपेश्वर वन्यजीव अभयारण्य परिसरालगत घोषित इको सेन्सिटिव्ह झोन (ESZ) क्षेत्रामध्ये सुरू असलेल्या रिसॉर्ट, हॉटेल व कृषी पर्यटन प्रकल्पांविरोधात गंभीर कायदेशीर आक्षेप नोंदवत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्याकडे औपचारिक तक्रार दाखल करण्यात आली आहे.

यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष, ट्रायबल फोरमचे अंकित नैताम यांनी सादर केलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

संबंधित प्रकल्प हे केंद्र शासनाच्या १७ जानेवारी २०१६ च्या ESZ अधिसूचनेशी तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ मधील कलम ३(२)(v) व नियम ५(३) शी विसंगत असल्याची शक्यता आहे. सदर अधिसूचनेनुसार अभयारण्यालगत नवीन व्यावसायिक प्रकल्पांसाठी सक्षम प्राधिकरणाची पूर्वपरवानगी व पर्यावरणीय परिणाम मूल्यमापन बंधनकारक आहे. अनेक रिसॉर्ट व पर्यटन प्रकल्प ESZ मर्यादेत कार्यरत असून त्यांच्याकडे आवश्यक पर्यावरणीय व वनविभागीय मंजुरी आहे का याबाबत पारदर्शक माहिती उपलब्ध नाही. Wildlife Protection Act नुसार अभयारण्य क्षेत्रात किंवा त्यालगत कोणत्याही व्यावसायिक उपक्रमासाठी सक्षम प्राधिकरणाची पूर्वपरवानगी आवश्यक आहे. वन्यजीवांच्या अधिवासाला बाधा आणणारी कोणतीही क्रिया दंडनीय आहे. संबंधित प्रकल्पांनी परवानगीविना कामकाज सुरू केले असल्यास ही बाब फौजदारी स्वरूपाची ठरू शकते. सर्वोच्च न्यायालय यांनी दिनांक ३ जून २०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार देशातील सर्व अभयारण्ये व राष्ट्रीय उद्यानाभोवती किमान १-कि.मी. ESZ बंधनकारक करण्यात आले आहे.

या आदेशाच्या अनुषंगाने टिपेश्वर परिसरातील प्रकल्पांचे पुनर्मूल्यांकन झाले आहे का, याबाबत स्पष्टता नसल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. Environment Protection Act, १९८६ च्या कलम १५ नुसार पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन झाल्यास दंड व कारावासाची तरतूद आहे. जर ESZ नियमांचे उल्लंघन झाले असल्यास संबंधित प्रकल्पधारकांसह प्रशासकीय जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद आहे.

जिल्हास्तरीय ESZ समितीवर प्रश्न - जिल्हाधिकारी अध्यक्ष असलेल्या ESZ अंमलबजावणी समितीकडून नियमित तपासणी, उल्लंघनावरील कारवाई व अहवाल सार्वजनिक करण्याबाबत माहिती उपलब्ध नसल्याने प्रशासनिक निष्क्रियतेचा प्रश्न उपस्थित झाला आहे.

प्रमुख मागण्या - संपूर्ण ESZ क्षेत्राची संयुक्त विशेष तपासणी, परवानगीविना सुरू असलेल्या प्रकल्पांवर तात्काळ फौजदारी गुन्हे नोंद, संबंधित अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशी तपासणी पूर्ण होईपर्यंत तात्पुरती स्थगिती, ३० दिवसांत सविस्तर अहवाल सार्वजनिक करणे. निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, पर्यावरण संरक्षण, वन्यजीव संवर्धन व सार्वजनिक हित लक्षात घेता तातडीची कारवाई आवश्यक असून अन्यथा उच्च न्यायालयीन हस्तक्षेपाची मागणी केली जाईल.

प्रकरण विधानसभेत गाजणार - उद्धव ठाकरे यांनी हा विषय महाराष्ट्र विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्राथमिकतेने मांडण्याचे संकेत दिले आहेत. "प्राथमिकतेने विषय मांडतो. अधिक माहिती असल्यास जरूर कळवा," अशी प्रतिक्रिया देत उद्धव ठाकरे यांनी प्रकरणाची गंभीर दखल घेतल्याची माहिती अंकित नैताम यांनी प्रसिद्ध पत्रकारांद्वारे दिली आहे.

## • वेचक

### मनसेचा दणका ; पांढरकवडा सी.सी.आय.केंद्रावर शेतकऱ्यांची अडवणूक थांबली



पांढरकवडा - येथील सी.सी.आय. खरेदी केंद्रावर कापूस उत्पादक शेतकऱ्यांची होत असलेली अडवणूक अखेर थांबली आहे. मनसेच्या आक्रमक भूमिकेनंतर प्रशासनाने सर्व कापूस खरेदी करण्याचे आश्वासन दिले. गेल्या काही दिवसांपासून केंद्रावर कापूस विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना विविध तांत्रिक निकष व अटी दाखवून त्यांचा माल परत पाठवला जात होता. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. ही बाब स्थानिक शेतकऱ्यांनी मनसे तालुका अध्यक्ष ठाकरे यांच्या निदर्शनास आणून दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन ठाकरे यांनी कार्यकर्त्यांसह सी.सी.आय.केंद्रावर धडक देत संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला. "किरकोळ कारणांवरून शेतकऱ्यांचा कापूस नाकारणे अन्यायकारक आहे. शेतकऱ्यांची पिळवणूक सहन केली जाणार नाही," असा इशारा मनसे पदाधिकाऱ्यांनी दिला. यावेळी अधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये जोरदार खडाजंगी झाली. त्यानंतर प्रशासनाने नमती भूमिका घेत सर्व शेतकऱ्यांचा कापूस कोणत्याही जाचक अटींशिवाय खरेदी करण्याचे आश्वासन दिले. मनसेच्या या हस्तक्षेपामुळे रखडलेली कापूस खरेदी पुन्हा सुरळीत सुरू झाली असून पांढरकवडा परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

### पुणे येथील राष्ट्रीय कोशीक विज्ञान संस्थेत संशोधनाकरिता यश साखरकर यांची निवड



पुसद - येथील शंकर नगरमध्ये वास्तव्यास असलेले प्रा.कल्याण साखरकर यांचे चिरंजीव यश यांची विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अधिकारातील जैवतंत्रज्ञान (Biotechnology)विभागाची एक प्रमुख राष्ट्रीय संस्था १९८६ मध्ये राष्ट्रीय कोशिक विज्ञान केंद्र,पूणे येथे आचार्य पदवीच्या संशोधनाकरिता यश रुपाली कल्याण साखरकर ची निवड करण्यात आली आहे. ते पुणे येथील या संस्थेत २ मार्च २०२६ रोजी रुजू होत आहे. यश साखरकर ने राष्ट्रीय कोशिक विज्ञान संस्थेत प्रवेशा करिता कुटुंबातील शैक्षणिक व संशोधनात्मक पर्यावरण उत्तरदायी आहे. याशिवाय राष्ट्रीय पात्रता परीक्षा, ज्युनियर रिसर्च फेलोशिप व आयसर तिरुपतीतील जैविक तथ्य विज्ञानातील पदव्युत्तर पदवी चे शिक्षण महत्त्वाचे ठरले आहे. यश साखरकर डॉ. बाबासाहेब आंबेडकर टीचर्स असोसिएशन अमरावती चे सहसचिव डॉ.कल्याण साखरकर व डॉ.रुपाली साखरकर यांचा मुलगा आणि आचार्य पदवीचे संशोधक शाश्वत साखरकर चा लहान भाऊ आहे. यश साखरकर ची राष्ट्रीय कोशिक विज्ञान संस्थेत आचार्य पदवीच्या संशोधनाकरिता निवड झाली त्याबद्दल डॉ.सुनील खाडे ,डॉ. हेमलता नांदुरकर, प्रा.विनोद नागले, डॉ.मुकुंद इंगळे, डॉ.अशोक भोरजार, डॉ.संजय खडसे,डॉ. रवी जुमले प्रा.दिनकर गुल्हाने ,विठ्ठल खडसे, डॉ.विनायक साखरकर,डॉ. गोपाळ शेळकीकर,प्रा.जावेदखान, डॉ. रवी चापके प्रा.प्रल्हाद दवणे डॉ. भास्कर पाढेन इत्यादींनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.

### लो. बा.अणे महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनींची विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत उत्तुंग भरारी

यवतमाळ - लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयातील लोकनायक आचार्य संशोधन पदवी केंद्रांतर्गत इतिहास विषयात वंदना धवणे या विद्यार्थिनीला अमरावती विद्यापीठाच्या बेचाळीसाव्या दीक्षांत समारंभात आचार्य पदवी प्रदान करण्यात आली. महाविद्यालयाच्या पदव्युत्तर समाजशास्त्र विभागातील कल्पना दादाराव पिंजारकर व पदव्युत्तर इंग्रजी विभागातील प्रगती सुखदेव भरणे ह्या विद्यार्थिनीनि अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक पटकावल्याने दीक्षांत समारंभात त्यांना सुवर्णपदकाने पुरस्कृत करण्यात आले. एम ए समाजशास्त्र व इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करून विद्यार्थिनींनी सुवर्णपदके आणि रोख पारितोषिके पटकावून महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत भरीव योगदान दिले आहे. त्यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या 42 व्या दीक्षांत समारंभाचे प्रमुख अतिथी माजी भारतीय सेना प्रमुख जनरल मनोज पांडे, कुलगुरू डॉ मिलिंद बारहाते, यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# जी.प.बांधकाम प्रभारी उपअभियंत्याची मनमानी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

दिग्रस - जी.प.बांधकाम उपअभियंता आर्णी येथील प्रभार दारव्हा येथील अभियत्याकडे कारभार सोपवीला असून साहेब रुजू होताच एक टक्क्याचे कमिशन दोन टक्क्यावर गेल्याची कंत्राकदार, ग्रामसेवक, सरपंच दबक्या आवाजात चर्चा करीत आहे..2023 -24 मध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत पांदण रस्ते,सिमेंट रस्ते,नाली बांधकाम, सीडी वर्क च्या कामांना तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता मिळाली असून तत्कालीन जी.प.बांधकाम उपअभियंत्यांनी कामे सुरू केली. परंतु चालू वर्षी मात्र 2026 मध्ये तीच कामे सुरु करण्यासाठी मजुराने केलेली कामाची मागणी त्यावर मजुरांची डिमांड जिल्हा परिषद बांधकाम उप अभियंता कार्यालय आर्णी येथे सादर करताना उप अभियंत्यांकडून दोन टक्क्याची मागणी होत असल्याची चर्चा एकण्यास मिळत आहे.

संबंधित उपअभियता राजकीय पाठबळामुळे ते कुणासही जुमानत नसल्याचे सांगण्यात येत आहे. मागील काही महिने पूर्वी याच कार्यालयात लाच लुचपत विभागाने धाड टाकून अभियंत्यासह त्यांचे साथीदारास रंगेहात रक्कम स्वीकारताना पकडले होते. एवढी मोठी ताजी घटना असताना पुन्हा तोचx विषय सदर कार्यालयामध्ये पुन्हा होत असल्याचे कळते. लाच घेणे आणि देणे हा कायद्याने गुन्हा आहे.याचे फलक प्रत्येक शासकीय कार्यालयाच्या मुख्य द्वारावर लावलेले असतानाही मी दोन टक्केच्या कमी घेत नसतो अशी हिम्मत होतेच कशी?असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांच्या मनात भिडत आहे. माझे काहीच कुणी करू शकत नाही असे बोलून दाखविणाऱ्या या उप अभियंत्याला धडा कोण शिकविणार? असा प्रश्न सध्या उपस्थित होत आहे. एकीकडे फडणवीस सरकारने रोजगार हमी योजनेअंतर्गत च्या जाचक अटीमुळे ती कामे मुख्यमंत्री बळीराजा पांदण रस्त्यांना मंजुरी देऊन प्रत्येक शेतकऱ्याला बांधापर्यंत रस्ता पोहोचविण्यासाठी ही मोहीम हाती घेतली असताना दुसरीकडे मात्र जुन्या कामांना संबंधित उपअभियंता कंत्राटदार,ग्रामपंचायत स्तरावरील कामांना वेटीस धरून त्रास देण्याचा प्रयत्न करीत असल्याचे सांगण्यात येत आहे. मागील कित्येक वर्षापासून एकाच तालुक्यात स्थान मांडून बसणाऱ्या या उपअभियत्याची सखोल चौकशी करून दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

# महागाव न.प.च्या नगराध्यक्षपदी रंजना दिपक आडे यांची बहुमताने निवड

## राजकीय कुरघोडीत भाजप ठरली वरचढ,काँग्रेसच्या नगरसेवकांनी झुगारला व्हिप

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - नगर पंचायत च्या नगराध्यक्षपदी भाजपच्या सौ.रंजना दिपक आडे यांची बहुमताने निवड करण्यात आली असुन काँग्रेसकडून नगराध्यक्षपदासाठी सौ.रुपाली संतोष कोळेकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला होता.परंतु त्यांना केवळ ५मते मिळाल्याने त्यांचा पराभव झाला.

महागाव नगर पंचायत मध्ये मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय घडामोडींना अखेर ब्रेक लागला असुन काँग्रेसप्रणित अपक्ष नगरसेविका असलेल्या नगराध्यक्षा सौ.सुनंदा दिलीपराव कोपरकर यांच्यावरील अविश्वास ठराव पारित करण्यासाठी काँग्रेसच्याच नगरसेवकांनी पक्षाचा व्हिप झुगारला होता.याच बंडखोर काँग्रेस नगर सेवक व शिवसेना नगरसेवकांच्या साथीने भाजपाने याठिकाणी सत्ता स्थापनेचा दावा केला होता. अविश्वास ठराव पारित झाल्यानंतर त्यांनी भाजपाकडून सत्ता स्थापनेसाठी हालचाली सुरू करण्यात आल्या यात भाजपा जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांची खेळी यशस्वी झाली. यामध्ये काँग्रेसच्या नगरसेविका जयश्री संजय नरवाडे यांना नगरध्यक्षपद दिल्या जाण्याची जोरदार चर्चा राजकीय गोटात सुरू असतांनाच भाजपाने आपल्या गोटातील नगरसेविका सौ.रंजना दिपक आडे यांचा नगरध्यक्ष पदाचा उमेदवारी अर्ज आज दाखल करून सर्वांनाच धक्का दिला .यावेळी काँग्रेसकडून सुद्धा नगरसेविका सौ.रुपाली संतोष कोल्हेकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला होता. उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांच्या उपस्थितीमध्ये निवडणुक प्रक्रिया पार पडली. यामध्ये भाजपच्या रंजना आडे, सुरेश नरवाडे, गजानन साबळे, आशा बावणे, शिवसेनेचे उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे रामराव पाटील नरवाडे, विशाल पांडे, करुणा नारायण शिरबिरे, सुनीता डाखोरे या पाच व काँग्रेसच्या परवेज सुरैय्या, जयश्री संजय नरवाडे, जयश्री इंगोले अशा बारा नगरसेवकांनी



सौ. रंजना आडे यांच्या बाजूने मतदान केले तर काँग्रेसच्या उमेदवार कोल्हेकर यांना केवळ काँग्रेसच्या शैलेश कोपरकर, महेश पाटील, सुरेखा विनोद कोपरकर,सौ.रुपाली संतोष कोल्हेकर ४ वअपक्ष सौ.सुनंदा दिलीप राव कोपरकर अशा पाच नगरसेवकांनी मतदान केले यात आडे यांचा बहुमताने विजय झाला. यावेळी भाजपा जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, माजी तालुकाध्यक्ष दिपक आडे, डॉ.इरफान कुंदन, जिल्हा उपाध्यक्ष अजय पुरोहित, माजी आ. विजय खडसे, सुरेश पाटील नरवाडे, शिवसेना स्वीकृत नगरसेवक सुजित ठाकुर, माजी नगरसेवक नारायण शिरबिरे, मंडळ अध्यक्ष योगेश वाजपेयी, श्रीधर भवानकर,महागाव शहराध्यक्ष निलेश नरवाडे, माजी तालुकाध्यक्ष संजय पाटे, विलास शेबे, भाजप महिला आघाडी जिल्हाध्यक्षा जयश्रीताई सुनिल राठोड, बुद्धिजीवी सेल जिल्हाध्यक्ष मुकुंद पांडे, विलासराव कवाने, रामजी राठोड, संतोष पडळकर, सुरेश आव्हाड यांनी नवनिर्वाचित नगरध्यक्ष सौ.रंजना आडे यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

> **शहराचा संपुर्ण सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय**
>
> सत्ता हस्तगत करणे हे आमचे धोरण नसुन सत्ताधाऱ्यांनी शहरातील विकास कामांची लावलेली वाट पाहून भविष्यात शहराचा संपुर्ण सर्वांगीण विकास करण्यासाठी आम्ही शहर विकासाची तळमळ असलेल्या नगरसेवकांना सोबत घेऊन या ठिकाणी सत्ता स्थापन केली.भविष्यात शहरातील अनेक विकास कामांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी आणुन जनतेच्या सेवेत ही विकास कामे पुर्ण करून शहराचा काय पालट केला जाईल. - **नितीन भुतडा (जिल्हा समन्वयक भाजपा)**

# NMMS शिष्यवृत्ती मध्ये महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय उमरखेडचे १२१ विद्यार्थी उत्तीर्ण

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयातील वर्ग आठवी मधील १२१ विद्यार्थी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक(NMMS) विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेत सत्र २०२५-२६ मध्ये उत्तीर्ण झाले. साडेतीन लाखापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या विद्यार्थ्यास या परीक्षेत प्रविष्ट होता येते. "सातत्य नियोजन सराव व योग्य मार्गदर्शन नियमित परीक्षा व निकाल प्रेरणा या गोष्टी कोणत्याही क्षेत्रात यश मिळवण्यासाठी आवश्यक असतात" असे गौरवोद्गार विद्यालयाचे मुख्याध्यापक यांनी या यशा नंतर व्यक्त केले. मागील शैक्षणिक क्षेत्रामध्ये ११८ विद्यार्थी सदर परीक्षेत उत्तीर्ण झाले होते. योग्य नियोजनामुळे विद्यालय सातत्याने प्रगतीचा चढता आलेख गाठत आहे. विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी वृंद प्रमोदराव देशमुख व पर्यवेक्षक राने सर यांच्या मार्गदर्शनाखाली दिलेले नियोजन करून काम करत आहेत. या परीक्षेसाठी शिष्यवृत्ती चे मार्गदर्शक पृथ्वीराज पतंगे यांनी जवळपास २० सराव परीक्षा सातत्याने घेऊन विद्यालयाच्या प्रगतीचा आलेख उंचाविला विद्यालयातून कु.



प्राप्ती गजानन शिंदे हिने १३८ गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळवला तर गोपाल जांबुवंत वानखेडे, १३४ गुण श्रुती दगडू जाधव १२७ गुण प्राप्त केले. वरील परीक्षेमध्ये घवघवीत यश मिळवण्यासाठी दर शनिवारी रविवारी सराव परीक्षा व लगेच निकाल देण्यात आला. परीक्षेमधील पात्र विद्यार्थ्यांना नववी ते बारावी दरमहा १००० रुपये शिष्यवृत्ती देण्यात येत असते. पात्र विद्यार्थ्यांना जवळपास ४८ हजार रुपये शिष्यवृत्ती बारावीपर्यंत मिळत असते. या यशामध्ये पालकांनी सुद्धा बरीच मेहनत घेतली. अशा प्रकारच्या परीक्षा विद्यालयामध्ये आयोजित केल्यास भविष्यातील विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळू शकते असा आशावाद विद्यालयाचे मुख्याध्यापक देशमुख सर यांनी व्यक्त केला.

# वसंतपूर खेरडा फाटा ते गावात जाण्याचा मुख्य रस्ता दुरुस्तीमध्ये काळा गोंधळ

**जनमाध्यम प्रतिनिधी**

दिग्रस - दिग्रस पुसद रोड वरून तीन किलोमीटर दक्षिणेकडे आतमध्ये तालुक्यातील वसंतपूर खेरडा गावात जाणारा मुख्य रस्त्याचे डांबरीकरणाचे काम मागील एक महिनेपासून सुरू असून सदर काम हे अतिशय चाल चलावू पद्धतीने सुरू असून यामध्ये भ्रष्टाचार दडलेला दिसून येत आहे. संबंधित विभागाचे याकडे हेतू पुरस्पर दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

सदर रस्ता हा पूर्णता उखडलेला असताना कित्येकदा या रस्त्यावर छोटे-मोठे अपघात घडल्याच्या घटना घडल्या आहे. पालकमंत्री संजय राठोड यांच्या विशेष प्रयत्नातून जिल्हा परिषद बांधकाम विभाग अंतर्गत रस्ते योजनेअंतर्गत सदर रस्ता दुरुस्ती करता अंदाजी दिड ते दोन कोटीच्या जवळपास निधी मंजूर झाला असून या कामाचे



वसंतपूर खेरडा फाट्याजवळ फलक लावलेले नसून रस्त्यावरील सुरु असलेले खडीकरण, सीलकोट, डांबरीकरण पाहल्यास रस्ता वर गीटा टाकून थातूरमातूर रोलर फिरवत आहे त्यावरच साईडची पिवळी माती टाकून डांबरीकरण करीत आहे जुनेच रस्त्यावर गीटी व साईटची पिवळी माती वापरून अनेक ठिकाणी खडीकरणाचा निधी वाचविण्याचा प्रयत्न संबंधित कॉन्ट्रॅक्टदाराकडून सुरू असल्याचे दिसून येत आहे. तसेच डांबराचा वापर अंदाज पत्रकानुसार न होता डांबर कमी वापरले जात असल्याचे रस्त्यावरून जाणारे काही सुज्ञ नागरिक चर्चा करताना दिसून येत आहे. संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळीच लक्ष न दिल्यास पुनश्च सहा महिन्यातच हा रस्ता उखडल्याशिवाय राहणार नसल्याची वास्तविकता आहे. रस्ता विकासाकरीता आलेला निधी हा निकृष्ट कामे करून जणू काही कॉन्ट्रॅक्टदार स्वतःच्याच घशात घालण्याच्या तयारीत असून काम मात्र दर्जाहीन होत असल्याने नागरिकांच्या सुविदेकरिता उपलब्ध करून दिलेला निधीची उधळपट्टी होऊन दर्जाहीन होणाऱ्या या कामामुळे नागरिकांना याचा अतोनात त्रास सहन करावा लागणार आहे त्यामुळे या संपूर्ण गंभीर बाबीची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेऊन कंट्राकदार च्या बोगसगिरीवर लक्ष देऊन कारवाई करणार का हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# दैनिक जनमाध्यमने बातमी प्रकाशित करताच मंगलमूर्ती- उमरखेड रोडवर गतीरोधक बसविले

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - नगरपरिषद अंतर्गत प्रभाग क्रमांक १५ मधील महावीर नगर जैन मंदिर समोरील येत असलेल्या मंगलमूर्ती नगर ते पवननगर-उमरखेड रोड वळणावर जात असलेल्या रस्त्यावर ग्लोबल डिस्ट्रीब्यूटर होलसेल मॉल समोर सतत अपघाताच्या घटना घडत आहेत.या ठिकाणी उमरखेड रोड कडून येणाऱ्या व मंगलमूर्ती नगर कडून जाणाऱ्या वाहनांच्या मोठ्या प्रमाणात स्पीड, वेग असतो त्यामुळे या ठिकाणी अपघात होऊन जीवित हानी होत असल्यामुळे या रोडवर

परिसरातील महावीर नगर व पवननगर मधील नागरिकांनी गेल्या दहा ते पंधरा दिवसापासून गतिरोधक लावण्याची नगर परिषदचे अभियंता शुभम आचमारे यांच्याकडे केली



होती. परंतु बरेच दिवस गतीरोधक बसविले नसल्यामुळे काही सामाजिक कार्यकर्त्यांनी नगर परिषद समोर आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. अशी बातमी दैनिक जनमाध्यम या वृत्तपत्रांत दि.२७ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध होताच नगरपरिषद प्रशासनाने दखल घेऊन आज २७ फेब्रुवारी दुपारी मंगलमूर्ती,पवन,नगर ते उमरखेड रोड वर गतीरोधक तात्काळ बसविले मात्र अपघात होत असलेल्या ठिकाणी एक गतीरोधक बसविण्याची गरज आहे.

# घरकुल लाभार्थ्यांना रेतीसाठी प्रतीक्षाच ! मनसेचा आरोप !!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - शासन निर्णयानुसार शहरी व ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांना निशुल्क पाच ब्रास रेती उपलब्ध करून देण्याची तरतूद असताना, तालुक्यात अद्याप त्याची प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष तथा घरकुल लाभार्थी संजय बिजोरे पाटील यांनी दि 27 रोजी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे केला आहे.

तालुक्यात पैनगंगा नदीवरील चार रेती घाटांवर परवाना देण्यात आला असून अद्यापही प्रशासन घरकुल लाभार्थ्यांचा या रेतीघाटावरून कुठल्या नियमाने लाभार्थ्यांपर्यंत रेती उपलब्ध होईल असा कुठलाही विचार केला नसून फक्त रेतीघाट मालकांचा विचार करण्यात येत असून शहरातील व ग्रामीण भागातील लाभार्थ्यांच्या हातात शासनाने फक्त गाजर दिले असल्याचेही निवेदनात वाटले आहे . महाराष्ट्र शासनाने महसूल विभागामार्फत प्रधानमंत्री आवास योजना तसेच इतर आवास योजनांतील लाभार्थ्यांना पाच ब्रास निशुल्क रेती देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र प्रत्यक्षात तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातील हजारो घरकुल लाभार्थ्यांना ही सुविधा मिळालेली नाही. रेतीच्या कृत्रिम तुटवड्यामुळे बाजारात रेतीचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. त्यामुळे आधीच अल्प अनुदानावर घर बांधणाऱ्या लाभार्थ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. अनेकांचे बांधकाम रेतीअभावी अर्धवट अवस्थेत थांबले असून लाभार्थ्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे, शासन गोरगरिबांच्या हितासाठी विविध योजना राबवत असले तरी स्थानिक पातळीवर निर्णयांची अंमलबजावणी होत नसल्यास त्याचा फटका थेट लाभार्थ्यांना बसतो. त्यामुळे तालुक्यातील सर्व शहरी व ग्रामीण घरकुल लाभार्थ्यांना शासन निर्णयानुसार तात्काळ निशुल्क रेती उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

> शासन निर्णयाची अंमलबजावणी कधी?

# आसरपेंड येथे पोस्को कायद्याविषयी जनजागृती शिबिर संपन्न.!



पुसद - २६ फेब्रुवारी रोजी तालुका विधी सेवा समिती,पुसद व वकील संघ पुसद यांच्या संयुक्त विद्यमाने " कॉमन मिनिमम प्रोग्राम " अंतर्गत कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम अनुसूचित जाती मुलींची शासकीय निवासी शाळा, आसरपेंड,पुसद ता.पुसद जि.यवतमाळ येथे सकाळी ९.३० वाजता पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तदर्थ अतिरित व जिल्हा न्यायाधीश पुसद श्रीमती.सोनल एन.शाह मॅडम उपस्थित होत्या.तसेच पुसद वकील संघाचे कोषाध्यक्ष ॲड.अमोल एन.भालेराव तसेच मुख्याध्यापिका श्रीमती.सविता घरजारे मॅडम यांची उपस्थिती लाभली. या शिबिरात ॲड.जयश्री एस.देशमुख सदस्य,वकील संघ पुसद यांनी "Protection of Children from Sexual Offences Act, 2012" (POCSO Act) या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.त्यांनी पॉक्सो कायद्याचे उद्दिष्ट,बालकांचे हक्क,तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया,तसेच कायद्यातील तरतुदी व शिक्षांचे स्वरूप याविषयी विद्यार्थिनींना सोप्या भाषेत माहिती दिली. बालकांवरील लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी जागरूकता आणि तत्परता किती महत्त्वाची आहे,यावर त्यांनी विशेष भर दिला. अध्यक्षीय भाषणात जिल्हा न्यायाधीश श्रीमती.सोनल एन.शाह यांनी विद्यार्थिनींना आत्मविश्वास बाळगण्याचे,कोणत्याही अनुचित प्रकाराविरुद्ध आवाज उठविण्याचे व कायद्याची मदत घेण्याचे आवाहन केले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### 'वैदर्भी महोत्सव जागर स्त्री शक्तीचा'

**अमरावती-** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान-उमेद अंतर्गत अमरावती येथे विभागीय मिनी सरस व जिल्हा प्रदर्शनी 'वैदर्भी महोत्सव - जागर स्त्री शक्तीचा'चे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन येत्या दि. ४ ते ८ मार्च या कालावधीत सायन्स स्कोर मैदानात होणार आहे.यात प्रदर्शनात अमरावती विभाग व जिल्ह्यातील महिला बचतगटांच्या उत्पादनांची विक्री व प्रदर्शनासाठी एकूण १५० स्टॉल्स लावण्यात येणार आहेत. दररोज अमरावती तसेच इतर जिल्ह्यांतील सुमारे एक हजार महिला महोत्सवात उपस्थित राहतील. या प्रदर्शनादरम्यान महिला सक्षमीकरणासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा आणि प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करणे हा या महोत्सवाचा मुख्य हेतू आहे. या महोत्सवाला नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख यांनी केले आहे.

### सोमवारी जिल्हा लोकशाही दिन

**अमरावती-** मार्च महिन्याचा जिल्हा लोकशाही दिन सोमवार २ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. यावेळी संबंधितांनी व्यक्तिश: उपस्थित राहावे, असे आवाहन अधीक्षक निलेश खटके यांनी केले आहे.

### अजिंक्य पोटे याला आंतरराष्ट्रीय अन्वेषण स्पर्धेत प्रथम क्रमांक



**अमरावती-** अखिल भारतीय विद्यापीठ संघ, नवी दिल्लीच्यावतीने आंतरराष्ट्रीय संशोधन महोत्सव 'अन्वेषण-२०२६' ही आंतरराष्ट्रीय अन्वेषण स्पर्धा शूलिनी विद्यापीठ, सोलन (हिमाचल प्रदेश) येथे नुकतीच पार पडली. या संशोधन महोत्सवात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संशोधक विद्यार्थी अजिंक्य पोटे याने प्रथम क्रमांक प्राप्त करून विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे विद्यापीठाच्या गौरवात भर पडली आहे.राजर्षी शाहू कॉलेज ऑफ फार्मसी, बुलडाणा येथील पीएच.डी. संशोधक असलेला श्री अजिंक्य पोटे याने या प्रतिष्ठित स्पर्धेत यश मिळविले आहे.अजिंक्य पोटे याने आंतरराष्ट्रीय अन्वेषण स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल आणि त्याच्या या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनिषा कोडापे यांनी अजिंक्य पोटे याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्यात.

### लोकेश देशमुख यांना आचार्य पदवी



**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीचा ४२ वा दिक्षांत समारंभ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे संपन्न झाला. त्यामध्ये संशोधन केंद्र शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा विद्यार्थी लोकेश देशमुख यांना आंतर-विद्याशाखीय अभ्यास अंतर्गत ग्रंथालय व माहिती विज्ञान या विषयातील 'Management and use of E-resources in Agriculture College Libraries in Maharashtra State' या विषयावर आचार्य पदवी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे आंतर-विद्याशाखीय अभ्यासाच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.ते आपल्या यशाचे श्रेय मार्गदर्शक ग्रंथपाल डॉ. महेंद्र मेटे, डॉ. वैशाली गुडधे, डॉ. सोनाली देशमुख, डॉ. कविता जाधव व पत्नी डॉ. स्वाती देशमुख या सर्वांनी मदत केल्याबद्दल आभार मानले आहे.

### राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालयात निबंध स्पर्धा



**नांदगाव खंडे-** स्थानिक महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे 'इंटरनेट शिवायचे मानवी जीवन' या विषयावर नुकतीच एक भव्य निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. सदर निबंध स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीकांत दांडगे तसेच प्रमुख अतिथी म्हणून डॉ. विवेक चौधरी उपस्थित होते.निबंध स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. शंभरकर यांनी काम पाहिले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या लेखनाचे सखोल परीक्षण करून आपला निकाल जाहीर केला.निकालामध्ये प्रथम बक्षीस रीता बांबोडे व द्वितीय बक्षीस निकिता सोनोने ह्यांना देण्यात आले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग लाभला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. काज्देकर , प्रा. बेलोरे , प्रा. डांगे , डॉ. सातदिवे , डॉ. गोरे आणि डॉ. मेश्राम यांची उपस्थिती आणि मार्गदर्शन लाभले.प्राचार्य डॉ. दांडगे यांनी आपल्या भाषणात विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### रामविलास मुंदडा हायस्कूल च्या विद्यार्थी स्कॉलरशिप परीक्षेत उत्तीर्ण

**काटपुर-** मोर्शी तालुक्यातील रामविलास मुंदडा हायस्कूल उदखेड येथील इयत्ता आठवीतील विद्यार्थी भूमिका नरेश जवंजाळ व क्रिष्णा गजानन लोणारकर वर्ग आठवी मधील विद्यार्थी एन.एम.एम.एस. स्कॉलरशिप परीक्षा २०२५ मध्ये उत्तीर्ण झाले. ग्रामीण भागातून सर्वसाधारण कुटुंबातल्या या दोन विद्यार्थ्यांनी एन.एम.एम.एस. या सारख्या कठीण परीक्षेत अभ्यासाच्या बळावर उत्तीर्ण झाल्यामुळे त्यांच्या यशाबद्दल त्यांचे विद्यालय व परिसरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

त्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई - वडील मुख्याध्यापक व वर्गशिक्षक तसेच मार्गदर्शक अक्षय यावले तसेच सीमा गांधी, प्राजक्ता वाटाणे, अतुल पचारे, नंदलाल डागा, उषा शहाणे, पूजा ठाकरे, राज ठाकरे यांना दिले आहे.

---

## अमरावती महानगरपालिकेचा ऐतिहासिक निर्णय

# साहित्यिकांच्या निवासस्थानी 'निल फलक' लावून सन्मान



**अमरावती/का.प्र.**

अमरावती शहरातील साहित्यिक सांस्कृतिक परंपरेचा गौरव जपण्याच्या दृष्टीने अमरावती महानगरपालिका ने एक महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. २० फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत शहरातील नामवंत मराठी साहित्यिकांच्या निवासस्थानी 'निल फलक' लावून त्यांचा सन्मान करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

प्रस्ताव क्रमांक २५ अंतर्गत हा विषय सभेत मांडण्यात आला.सदस्या ॲड. प्रीती हर्षल रेवने यांनी प्रस्ताव मांडला, तर सन्माननीय सदस्या नंदा धनंजय सावदे यांनी त्यास अनुमोदन दिले. चर्चेनंतर सभागृहाने हा ठराव सर्वानुमते मंजूर केला. या निर्णयानुसार अमरावती शहरातील दिवंगत तसेच साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिलेल्या साहित्यिकांच्या निवासस्थानी निल फलक लावण्यात येणार आहेत. प्राथमिक यादीत गझलसम्राट सुरेश भट, कथाकार उद्धव शेळके, साहित्य अभ्यासक मानिक कानेड, स्वातंत्र्यपूर्व काळातील विचारवंत दादासाहेब खापर्डे, कवी मधुकर केचे, साहित्यिक प्रभाकर माचवे, समीक्षक रा. भा. पाटणकर, वसंत आबाजी डहाके, डॉ. प्रभा गणोरकर आणि नाटककार दत्ता भगत यांचा समावेश आहे.

तसेच अमरावतीत वास्तव्य केलेल्या किंवा येथे कार्य केलेल्या अन्य साहित्यिकांची अधिकृत व अद्ययावत नावेही या योजनेत समाविष्ट करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित प्रस्तावावर पुढील प्रशासकीय कार्यवाही तातडीने करण्याचे आदेश सभेत देण्यात आले.महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत या ठरावाला मान्यवर पदाधिकाऱ्यांनी त्वरित मंजुरी दिली. महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे, आयुक्त सौम्या शर्मा चांडक, सभागृह नेते चेतन गावंडे, विरोधी पक्षनेते विलास इंगोले, गटनेते अविनाश मार्डीकर, नाना आमले, डॉ.राजेंद्र तायडे, शेख हमिद शेख वाहेद, तसेच सर्व नगरसेवक व नगरसेविका यांनी या विषयाचे महत्त्व ओळखून ठरावाला तत्काळ संमती दर्शविली.

या उपक्रमामुळे अमरावतीच्या समृद्ध साहित्यपरंपरेला नवसंजीवनी मिळणार असून शहराच्या सांस्कृतिक ओळखीला अधिक बळकटी मिळेल. नव्या पिढीला आपल्या साहित्यिक वारशाची जाणीव होऊन प्रेरणा मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले.या उपक्रमामुळे अमरावती शहरातील साहित्यिक वारसा अधोरेखित होईल व मराठी भाषा संवर्धनासाठी एक कायमस्वरुपी स्मृतीचिन्ह निर्माण होईल, असा विश्वास आहे. तरी मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने साहित्यिकांच्या घरांवर निल फलक लावण्याच्या उपक्रमास चर्चा करुन संमती देण्यात आली आहे.

---

# तळवेल येथील ३४० कुटुंबांना मालमत्ता पत्रकाचा मार्ग मोकळा



### आ. तायडे यांच्या पुढाकाराने महसूल विभागात हालचाल

**ब्राम्हणवाडा थडी/वार्ताहर**

भाजपाचे तालुकाध्यक्ष रमेश तायवाडे यांच्या कुशल कौशल्यामुळे तळवेल गावातील वाढीव गावठाण व नजुलशीट प्रकरणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला मालमत्ता पत्रक प्रश्न अखेर मार्गी लागण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.तळवेल गावातील सुमारे ३४० कुटुंबांना मालमत्ता पत्रक नसल्यामुळे शासकीय घरकुल योजना, विविध अनुदाने तसेच खरेदी-विक्री व्यवहारांमध्ये अडचणींचा सामना करावा लागत होता.या गंभीर प्रश्नाची दखल घेत आ.प्रवीण तायडे यांनी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेत संबंधित प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

वाढीव गावठाणाची नझुलशीट तयार करून पात्र कुटुंबांना मालमत्ता पत्रक वितरित करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याबाबत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे.

तळवेल गावात सुमारे ९१८ कुटुंबे वास्तव्यास असून त्यापैकी ३४० कुटुंबांकडे अद्याप मालमत्ता पत्रक नाही. १९८६ साली इंदिरा गांधी आवास योजनेंतर्गत अनेक कुटुंबांना जागांचे वाटप झाले होते. मात्र संबंधित जागांची अधिकृत नोंद व पीआर कार्ड तयार न झाल्याने वारसाहक्क, बक्षीसपत्र, मृत्युपत्र किंवा खरेदी-विक्री व्यवहारांमध्ये अडथळे निर्माण झाले आहेत.२०१७ पूर्वी स्टॅम्प पेपरवर नोटरी करून ग्रामपंचायतीमध्ये नोंदी घेतल्या जात होत्या.

मात्र कायद्यातील बदलांनंतर ही प्रक्रिया बंद झाल्याने अनेक व्यवहार प्रलंबित राहिले आहेत. परिणामी संबंधित कुटुंबे शासकीय योजनांपासून वंचित राहिली आहेत.

---

### महानगरपालिकेकडून

# 'मिळकतकर अभय योजना २०२६' जाहीर

### थकीत मालमत्ता करावरील दंडावर ५०% सूट

**अमरावती/का.प्र.**

शहरातील कर थकबाकीदार नागरिकांना मोठा दिलासा देत अमरावती महानगरपालिकेने 'मिळकतकर अभय योजना २०२६' जाहीर केली आहे. या विशेष योजनेअंतर्गत थकीत मालमत्ता करावरील दंडाच्या रकमेवर तब्बल ५० टक्के सूट देण्यात येणार आहे. ही योजना २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मर्यादित कालावधीसाठी लागू राहणार असल्याने नागरिकांनी तात्काळ लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

महानगरपालिकेच्या कर विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, शहरात मोठ्या प्रमाणात मालमत्ता कराची थकबाकी प्रलंबित आहे. या पार्श्वभूमीवर करदात्यांना दिलासा देत कर वसुलीत गती आणण्याच्या उद्देशाने ही अभय योजना राबविण्यात येत आहे. दंडाच्या रकमेतील अर्धी रक्कम माफ केल्यामुळे नागरिकांवरील आर्थिक ताण लक्षणीयरीत्या कमी होणार आहे.जुनी थकबाकी नियमित करण्यासाठी ही एक सुवर्णसंधी असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे. अनेक नागरिकांनी विविध कारणांमुळे कर भरणा प्रलंबित ठेवला होता. अशा सर्वांना दंडामध्ये सवलत देऊन मुख्य थकबाकी भरण्यास प्रोत्साहन दिले जात आहे.

योजनेचे फायदे–निवासी, व्यावसायीक व खुल्या भुखंडासाठी लागू,जुनी थकबाकी नियमित करण्याची उत्तम संधी, दंडामध्ये अर्धी रक्कम माफ.ही योजना २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंतच लागू राहणार आहे. त्यानंतर नियमित दंड आकारणी पुन्हा सुरू होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे अंतिम तारखेची वाट न पाहता त्वरित मालमत्ता कर भरणा करावा, असे आवाहन अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे.

नागरिकांना सुलभतेने कर भरता यावा यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मालमत्ता कर भरण्यासाठी महानगरपालिकेच्या www.amravatimc.org या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

याशिवाय, अधिक माहितीसाठी नागरिकांनी थेट अमरावती महानगरपालिकेच्या संबंधित विभागाशी संपर्क साधावा. 'मिळकतकर अभय योजना २०२६' ही योजना नागरिक व प्रशासन यांच्यातील सहकार्याचे उत्तम उदाहरण ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे. कर थकबाकी नियमित झाल्यास शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार असून, नागरी सुविधा अधिक सक्षमपणे पुरविता येणार आहेत.कर थकबाकीदार नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन आपली थकबाकी तत्काळ भरावी आणि ५० टक्के दंड सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमरावती महानगर पालिका आयुक्त शर्मा यांनी केले आहे.

---

# शाश्वत पेट-शो आज



### मनपा, वसा फाउंडेशन व शाश्वत शाळेचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**

शाश्वत कन्सेप्ट स्कूल, अमरावती महानगरपालिका, वसा फाउंडेशन आणि जीवन रक्षा फाउंडेशन च्या सहकार्याने उद्या शनिवार २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता शाश्वत पेट शोचे आयोजन रामगांव येथील शाश्वत जंगल, शाश्वत शाळांमध्ये करण्यात आले असल्याची माहिती पत्रकार परिषद मध्ये आयोजकांनी दिले.

आजकालची मुले खूप चिडचिड करतात,लवकर थकतात आणि त्यांच्या संवेदनशीलता कमी होत आहे अशी तक्रार नेहमी पालकांकडून ऐकायला मिळते यावर ठोस उपाय काय? याचा विचार शाश्वत कन्सेप्ट स्कूलच्या विद्यार्थिनींनी केला आहे. त्याच्या नुसार जर लहान मुलांना सुरुवातीपासूनच चांगल्या सवयी लावल्या तर त्यांना वाईट सवयी लागणार नाहीत. मुलांनी जर एखादा प्राणी, पक्षी किंवा मासे पाळले तर त्यांच्यात काळजी घेण्याची वृत्ती निर्माण होईल आणि त्यांचा स्क्रीन टाईम देखील कमी होईल. या उदात्त हेतूने शाश्वत पेट शो आयोजित करण्यात आला आहे. या शो-मध्ये पेट फॅशन शो होणार ज्यामध्ये पाळीव प्राण्यांचा सहभाग राहणार. पाळीव प्राण्यांचा पालकांना आपल्या लाडल्या प्राण्याबद्दल एक मिनिटांची गोष्ट सांगता येईल. कार्यक्रमात तज्ञ डॉक्टर्स ॲनिमल केअर आणि ट्रेनर्स उपस्थित राहून पालकांना मार्गदर्शन करतील. या कार्यक्रमाचे लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषद मध्ये डॉ. सुनील पोटफोडे ,डॉ. सचिन बोंद्रे ,रवी पाटील, सागर मैदानकर उपस्थित होते.

---

### डॉ.पंजाबराव देशमुख रुग्णालयात टीएमएस २.० प्रणालीचा शुभारंभ



**अमरावती/का.प्र.**

डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत टीएमएस २.० प्रणालीचा शुभारंभ उत्साहात पार पडला.प्रणालीचा प्रारंभ श्याम रु. अहेरवार यांना योजनेचा प्रथम लाभ प्रदान करून करण्यात आला. यामुळे रुग्णांना अधिक पारदर्शक, जलद व सुलभ सेवा उपलब्ध होण्यास मदत होणार आह कार्यक्रमास अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ. पवन टेकाडे, डॉ. वसंत लुंगे,श्रीकांत फुटाणे, ऋग्वेद देशमुख,धनराज चव्हाण, वैभव भोरे,अक्षय पावडे तसेच सर्व योजना कर्मचारी व आरोग्य मित्र उपस्थित होते.

---

# होळी दहन, धुळवडीसाठी मोकळया मैदानाचा वापर करा

### रंगोत्सव साजरा करा पण जरा जपून; महावितरणचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

होळीच्या उत्सवाला विजेच्या अपघाताने गालबोट लागू नये यासाठी होळी पेटवितांना संभाव्य अपघात टाळण्याकरिता आवश्यक ती खबरदारी घेत होळीचा आनंद व्दिगुणित करण्याचे आवाहन महावितरण अमरावती परिमंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

होळी पेटवितांना सभोवताली वीजवाहिन्या किंवा वितरण रोहीत्रे नाहीत याची खातरजमा करून घ्या, अन्यथा होळीच्या ज्वाळांनी वीजवाहिन्या वितळून जीवंत तार खाली पडून भिषण अपघात होण्याची शक्यता असते. याशिवाय अनेक ठिकाणी वीजवाहिन्या हया भुमिगत असल्याने त्यापासून लांब अंतरावरच होळी पेटवावी, जेणेकरून होळीच्या उष्णतेपासून भुमिगत वीजवाहिन्या सुरक्षित राहतील, होळी पेटवितांना शक्यतो मोकळया जागेचा वापर करा, ट्रक किंवा इतर वाहनांतून होळी आणतांना होळीचा स्पर्श रस्त्यालगतच्या वीजवाहिन्यांना होणार नाही याची खबरदारी घ्या,



विजेचे अपघात हे प्राणघातक असल्याने एक चूकही प्राणांतीक अपघातास कारणीभूत ठरू शकते.

त्याचप्रमाणे रंगोत्सव साजरा करतांना पाण्याचे फवारे वीज वाहिन्यापर्यंत उडणार नाही याची काळजी घ्या. रंग भरलेले फुगे फेकतांना ते विजेचे खांब आणि वीज वाहिन्या यांना लागणार नाही याची खबरदारी घ्या. वीज वितरण यंत्रणेचे रोहीत्रे व तत्सम वितरण उपकरणे बसविलेल्या जागेपासून लांब अंतरावरच रंग खेळा. रंग खेळतांना ओल्याचिंब शरीराने वीज खांबाला स्पर्श झाल्यास अपघाताचा संभाव्य धोका असल्याने विजेचा खांबांना स्पर्श करू नका.

विजेच्या खांबासभोवती पाण्याचा निचरा होणार नाही याची खबरदारी घ्या. घरात होळी खेळतांना वीज मिटर, विजेचे प्लग, वीज तारा आणि वीज उपकरणांचा पाण्यापासून बचाव करा, ओल्या हाताने वीजेच्या बटनांना स्पर्श करू नका.

**हे लक्षात ठेवा: -** वीज वितरण यंत्रणेपासून लांब अंतरावर होळी पेटवा,होळी आणतांना तीचा स्पर्श वीज वाहिन्यांना होऊ नये,वीज वाहिन्या, वितरण रोहीत्रांवर पाणी फ़ेकू नका,ओल्या शरीराने वीज उपकरणांना स्पर्श करू नका,वीज खांबासभोवती पाण्याचा निचरा करु नका.

वीज यंत्रणेला आग लागणे, किंवा वीज अपघातासारखे काही अनपेक्षीत प्रकार घडल्यास तात्काळ महावितरणच्या १८००२१२३४३५/१८०० २३३३४३५ या टोल फ्रि क्रंमाकावर . तसेच अमरावती जिल्हयाकरीता असलेल्या ७८७५७६३८७३ व यवतमाळ जिल्हयाकरीता उपलब्ध असलेल्या ७८७५७६३०९९ या २४ तास सुरू राहणाऱ्या दैनंदिन सनियंत्रण कक्षाच्या नंबरवर कॉल करून तात्काळ माहिती देण्याचे आवाहन महावितरण अमरावती परिमंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

# घे! विज्ञाना विश्रांती...

कॉपी पेस्ट केले की, कॉफी घेऊ ! चल!! काम सोप्पी झाली.टायपिंग ते कॉपी पेस्टपर्यंतचा वेग अफलातून वाढला, अन् कामाचा ताण पण ! कारण आता माणसाचं काम मशीनच्या ताब्यात.हाथ कले पासून कत्तल, तर बुद्धी कौशल्यपासून शितल होत चालली.हाथ मोबाईलधारक झाले,मेंदूसुन्न करणाऱ्या नवनवीन ॲप, फंक्शनची गॅप भरून काढणारे कॉन्टम चे सिद्धांत मानवी जीवनात हस्तक्षेप करून, कृत्रिम बुद्धिमत्तेने जिवंत मानवाला जिवंत राहण्यासाठी आव्हान निर्माण केले आहे.




उत्क्रांतीची वेळ संपली.कारण झपाट्याने औद्योगिक क्रांती झाली.पुरातन,सनातन,ऐतिहासिक पासून तर आधुनिकतेपर्यंत माणसाची मजल गेली.आधुनिकतेत जगताना माणस मशीन झाले.पुन्हा विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली म्हणणारे जोतिबा आठवते.विज्ञानदृष्टीचे बुद्ध बाबा सुद्धा ध्यानवस्थित झाले.

वेदातून, वेदनातून, वेधातून विज्ञानाला जन्म घातला गेला.वेदात शस्त्र, अस्त्र व तंत्र अध्यात्माच्या कक्षेत सामावली होती.ध्यानधारणेतून अनुरेणु ते परमाणु. पिंडी ते ब्रम्हांडी अशा ज्ञानाला विज्ञानात साकारत सूर,नर,मुनी जन प्रगत झाले.मंत्राने होणारे काम यंत्राने करण्याची किमया विज्ञानाने स्पष्ट केली.मंत्र ही मानवाचे अन् तंत्र ही मानवाचेच.

योग,याग, विधी तेणे नव्हे सिद्धी,धर्माधर्मी माया गेले ते विलया.. ही ज्ञानोबाची ओळ विज्ञान काळात आठवते.कारण आता सर्व सृष्टीच कोड उलगडायला आरंभ होताच ते उलगडण्यापूर्वीच भीतीची पाल चुकचूकली.जीवनाचे रहस्य ध्यान,धारणा, संयम विधीने उघडले व त्याच्या आधार भौतिक रासायनिक तत्वापेक्षा स्वतंत्र तत्व असल्याचे पुरावे तर्क,तात्विक दार्शनिक मांडून गेले.

जीवापासून मानवी देहापर्यंतचा प्रवास झाला.त्याला ज्ञानाने ओळखता येते.ते ज्ञान विज्ञानाच्या कसोटी बाहेर असल्याचे अनुमान लावल्या गेल्यानंतर, कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास मानवाच्या अंतिम टप्प्यात असल्यामुळे विज्ञानाच्या विरामाचा विचार करण्याची वेळ पृथ्वीग्रहावर आली. ही सजगता आता वैज्ञानिकांना सुद्धा दिसू लागत आहे.

विश्रामाशिवाय उत्स्फूर्ती नाही.श्रमाशिवाय उन्नती नाही.उन्नती शिवाय विकास नाही अशी मांडणी या व्यवस्थेत आहे.तेव्हा विकासाचा अंतिम बिंदू निश्चित करताना मानवाला आता कायमची विश्रांती घेण्यापूर्वी विज्ञानाला विश्रांती देणे आवश्यक आहे.आम्ही यंत्र,तंत्र आणि स्वतंत्र होऊन या सृष्टीच्या रचनेला सर्वत्र सूत्रहीन समजून धोके ओढवून घेतले आहे.

शस्त्र हे मानवी वंश संपवायला प्रथमास्त्र,क्षेपणास्त्र ते जैविक घातकी अस्त्र सुद्धा युद्धासाठी वापरण्याची तयारी जगात झाली. एलॉन मस्क चे ऐलान परग्रहावर वस्ती.अंतराळात जीव सृष्टीचा शोध ही सर्व वर्तमानातील नियोजन विज्ञानाच्या मदतीने करत असताना कृतिम बुद्धिमत्तेने माणसावर ताबा घेण्यापू, इथे विश्रांती विज्ञानाला द्यायला हवी! जेणे करून मानवी वंश या पृथ्वीचा वारस म्हणून विकासाचा टप्पा नोंदवू शकेल.विज्ञानदिनाच्या निमित्ताने विश्रांतीचे पत्र कुणीतरी काढायला हवे ही भावना संवेदनशील मानवाकडून अपेक्षित आहे, विज्ञान सोय देते सुख नाही,शोध देते बोध नाही,शुद्धी देईल बुद्धी नाही.कारण विज्ञानाने खूप दिले ते क्षणात घेऊ शकते अशी अण्वस्त्र सुरक्षित ठेवणारा मेंदू कृत्रिम बुद्धिमत्तेत वावरण्यापूर्वी इथे विश्रांती घे विज्ञान म्हणणारी पिढी वर्तमानात आहे.भावी पिढीसाठी हीच भेट...

**डॉ.प्रवीणकुमार राऊत**
मो.७७९८६४५५६५

# अंधश्रद्धेच्या अंधारात विज्ञानाच्या दिव्याची गरज

समाजात काही वेळा काही माणसं अशी भेटतात आणि म्हणतात की, विज्ञान-तंत्रज्ञानाचा विकास होण्यापूर्वी माणसाच्या जिवनामध्ये ताणतणाव कमी होते, संघर्ष कमी होते आणि त्यामुळे माणूस अधिक सुखी होता. आधुनिक विज्ञान युगात मात्र ताणतणाव व संघर्ष इतके वाढले की त्यातून माणसाचे सुखच हरवून गेले आहे. भारतीय माणूस भुतकाळात जास्त रमतो, त्यामुळे आपल्या जन्मापूर्वी येथे अधिक सुखाचे, कमी संघर्षाचे आणि कमी ताणतणावाचे जीवनमान होते असे त्याला वाटणे शक्य आहे. थोडक्यात विज्ञान तंत्रज्ञानाच्या वाढीमुळे मानवाची प्रगती झाली आहे, होत आहे व त्याचे जीवन जास्तीत जास्त सुखाचे होत आहे यात शंका नाही. याचा अर्थ असा नव्हे की, आज आदर्श परिस्थिती निर्माण झाली व सर्व संघर्ष व सारी दु:ख लयाला गेली आहेत. मात्र पुर्वीपेक्षा आताची परिस्थिती नक्कीच सुधारली आहे आणि पुढील काळातही विज्ञान-तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर केला तर त्यामध्ये जास्त सुधारणा होईल एवढे मात्र नक्की. राष्ट्रीय विज्ञान दिन २०२६ ची मुख्य संकल्पना 'विज्ञानातील महिला: विकसित भारतासाठी उत्प्रेरक' ही आहे, ही थीम वैज्ञानिक संशोधनात महिलांचे योगदान अधोरेखित करते आणि विकसित भारताच्या ध्येयासाठी त्यांना प्रोत्साहन देते.

आज २८ फेब्रुवारी रोजी संपूर्ण देशभरात 'राष्ट्रीय विज्ञान दिवस' म्हणून साजरा केला जातो. १९८६ मध्ये तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी डॉ. सी.व्ही. रमन यांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी २८ फेब्रुवारी हा दिवस 'राष्ट्रीय विज्ञान दिन' म्हणून साजरा करण्याची घोषणा केली.




रमन इफेक्ट हा केवळ एक वैज्ञानिक शोध नसून, भारतीय संशोधनाची जगातील ओळख आहे. महान वैज्ञानिक भौतिकशास्त्रज्ञ सर चंद्रशेखर वेंकट रामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी भौतिकच्या गंभीर विषयावर एक महत्वपुर्ण शोध लावला होता. पारदर्शी पदार्थ मधून जाणाऱ्या प्रकाशांचा किरणात बदल करणारा हा बदल रामन यांनी शोधुन काढला. त्यामुळे त्यांना १९३० साली भौतिकमध्ये नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार मिळवणारे ते पहिले भारतीय व आशियातील पहिले व्यक्ती होते. तसेच १९५४ साली भारत सरकारने सर्वोच्च 'भारतरत्न पुरस्कार' देऊन त्यांचा सन्मान केला.

'रमन इफेक्ट नक्की काय? तर पाण्यातून बाहेर पडतांना प्रकाशाचे किरण ज्या पद्धतीने विखुरतात त्या प्रक्रियेला, रमन इफेक्ट असे म्हटले जाते. समुद्राच्या पाण्याचा रंग निळा का आहे, हे या 'रामन इफेक्ट' च्या अभ्यासावरून स्पष्ट होते. प्रकाशाच्या ह्या विखुरण्याला आता जगभर 'रामन स्कॅटरिंग' असे देखील म्हटले जाते. लॅबमध्ये जेव्हा या इफेक्टचा वापर काही संशोधनात केला जातो, तेव्हा या प्रक्रियेला 'रामन स्पेक्ट्रोस्कोपी' असेही म्हणतात. याचा वापर रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी करतात. सध्या, 'रामन स्पेक्ट्रोस्कोपी' हे पर्यावरणीय आणि पर्यावरणविषयक अभ्यासातील एक प्रमुख संशोधन साधन आहे आणि समुद्राच्या पाण्यातील आणि इतर जलसाठ्यांमधील प्रदुषणाच्या अभ्यासात याची महत्वाची भूमिका आहे.

आपल्या समाजावर फलज्योतिषाचा प्रचंड पगडा आहे. सर्व माध्यमातून आजचे, आठवड्याचे, महिण्याचे, वर्षाचे भविष्य राशींच्या आधारावर घ्यावेच लागते. ते अनेकदा अतिशय अर्थहीन, चुकीचे असते हे सिद्धही झालेले असते. 'आकाशाशी जडले नाते', या पुस्तकात ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी 'खगोलशास्त्रज्ञ आणि फलज्योतिष' हे प्रकरण लिहीले आहे. त्यांनी म्हटले आहे 'एकविसाव्या शतकात पुढे उभे असतांना आपल्या अंधश्रद्धा आपल्याला पहिल्या शतकाच्या पुढे जाऊ देत नाहीत'. विज्ञानाच्या गरूड झेपेत आपल्या सुर्यमालेचे घटक ग्रह आणि त्यांचे उपग्रह यांचीच काय तर लांबच्या लांब ताऱ्यांच्या आणि त्याहून दुरच्या आकाशगंगेची माहिती आता मिळत आहे. धुमकेतुंच्या कक्षा बिनचुक ठरवता येतात. विसाव्या शतकात मानवाने चंद्रावर पाऊल टाकले, एकविसाव्या शतकात तो मंगळ पाद्राकांत करेल. पाच-सहा शतकापुर्वीच्या मानवाचे ग्रहांचे नीट आकलन न झाल्याने फलज्योतिषावर विश्वास ठेवणे आपण समजू शकतो.पण आजच्या काळात पुष्कळ माहिती उपलब्ध असूनही अनेक वैज्ञानिक चाचण्यात नापास झालेल्या कल्पनांवर विश्वास ठेवून वेळेचा, शक्तीचा आणि धनाचा अपव्यय करणे कितपत योग्य आहे?आपल्याला जर जीवनाचे गणित नीट सोडवायचे असेल तर वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारल्याखेरीज पर्याय नाही हेच राष्ट्रीय विज्ञान दिनाचे सांगणे आहे.

डॉ. विजय बाबर, वर्धा
मो. नं. ९४२३११८८०६

## एआय च्या साथीने विज्ञान क्रांती

२१व्या शतकातील सर्वात मोठी वैज्ञानिक क्रांती म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता. मशीन लर्निंग, बिग डेटा, डीप लर्निंग यांसारख्या संकल्पनांनी जगाचे चित्र बदलले आहे.परंतु एक मूलभूत प्रश्न आहे - एआय ला आधार कोणाचा?उत्तर स्पष्ट आहे-संख्याशास्त्राचा !डेटा हा एआय चा प्राण आहे आणि त्या डेटाचे संकलन, वर्गीकरण, विश्लेषण, निष्कर्ष काढणे हे सर्व संख्याशास्त्रावर आधारित आहे. रिगरेशन, प्रोबॅबिलिटी, बेशियन इन्फरन्स, हायपोथेसिस टेस्टिंग, सॅम्पलिंग थेरी या सर्व संकल्पना एआय च्या मुळाशी आहेत.म्हणूनच आजच्या काळात स्टॅटिसटिक्स हा विषय केवळ 'गणिताचा भाग' न राहता तो डेटा सायन्सचा कणा बनला आहे.

एआय मुळे संख्याशास्त्राला मिळणारे नवे आयाम:-बिग डेटा विश्लेषणात संख्याशास्त्रज्ञांची मोठी मागणी. हेल्थकेअर मध्ये रोगनिदानासाठी प्रेडिक्टिव मॉडेल्स.शेतीमध्ये हवामान अंदाज व उत्पादन विश्लेषण.उद्योगक्षेत्रात गुणवत्ता नियंत्रण आणि जोखमीचे व्यवस्थापन.सामाजिक क्षेत्रात धोरण निर्मिती साठी डेटा-आधारित निर्णय.यामुळे संख्याशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या अमाप संधी निर्माण झाल्या आहेत.

**विजय कोष्टी**

# अभिजात मराठीचे लेणे म्हणजेच सर्व बोलीभाषा



**मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यास मदत झाली ती सर्व बोलीभाषेतील उपलब्ध प्राचीन साहित्यामुळेच.त्यामुळे समृद्ध संस्कृती व विविध परंपरेने नटलेल्या आपल्या बोलीभाषा टिकवून ठेवणे हे आपले कर्तव्यच ठरते.गरज आहे ती बोलीभाषेचे जतन व संवर्धनाच्या चळवळीची व्याप्ती वाढविण्याची.असे केल्याने आपली अभिजात मराठी भाषा अधिक समृद्ध होण्यास मदतच होईल.**

महाराष्ट्रातील पाच विभागात म्हणजेच विदर्भ,मराठवाडा,खानदेश, कोकण व उर्वरित महाराष्ट्रात वऱ्हाडी, मराठवाडी, कोकणी, कोल्हापूरी, आगरी, पुणेरी, मालवणी, झाडी, अहिराणी ह्या प्रमुख बोलीभाषेसह एकूण ५२ बोलीभाषा बोलल्या जातात.त्यातही दर बारा कोसांवर प्रत्येक बोलीभाषेत फरक आढळतो.बोलीचा लहजाही अल्लग आढळतो.उदा.वऱ्हाडी बोलीभाषा विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ या पाच जिल्ह्यात बोलली जाते.पण या प्रत्येक जिल्ह्यात बोलल्या जाणाऱ्या भाषेत थोडाफार फरक आहेच. अकोल्यात इथेला 'अथी', तिथेला 'तथी' अशी भाषा वापरली जाते. पण संपूर्ण वऱ्हाडात असे शब्द वापरल्या जात नाही.यवतमाळ, बुलढाणा जिल्ह्यात जाल का ला 'जासाल' कां, याल ला 'येसाल' का असे शब्द वापरले जातात.प्रत्येक जिल्ह्यात देणाऱ्या बोलीभाषेतील शिव्या देखील अल्लग प्रकारच्या आढळतात.सामाजिक शिष्टाचाराच्या विरोधात असल्यामुळे त्या शिव्या इथे लिहिणे ईष्ट होणार नाही.वाचकांनी ते समजून घ्यावे.

### मराठी भाषेला राज्यभाषेचा दर्जा

काही जिल्ह्यात आदिवासी भाषा फक्त बोलल्या जातात,त्यांना लिपी नसल्यामुळे त्यांचा हवा तसा प्रसार झालेला नाही त्यामुळे त्यात साहित्य निर्मितीही होऊ शकली नाही.१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली.तेव्हा शिक्षण व प्रशासनात कोणतीही एक भाषा सुलभ व्हावी ह्या दृष्टीकोनातून प्रमाण मराठी भाषा तयार करण्याचो ठरविण्यात आले.त्यानुषंगाने प्रमाण मराठी भाषा लेखन समिती नेमण्यात येवून २६ जानेवारी १९६५ ला महाराष्ट्रात मराठी प्रमाण भाषेला राज्यभाषेचा दर्जा देण्यात आला.

त्यावेळी प्रमाण मराठी भाषा लेखन समितीवर जी मंडळी होती त्यांनी तत्पूर्वीची मोडी लिपी वगळून देवनागरी लिपीतील मराठी भाषा अस्तित्वात आणली.या देवनागरी लिपीतच नागरी हा शब्द आहे.देव म्हणजे दैवी व नागरी म्हणजे शहरी.कारण की ती लिहिण्यास सुलभ आहे.आपण आता लिहितो,वाचतो,बोलतो ती प्रमाण मराठी भाषा होय.त्यामुळे साहजिकच शहरी भागात बोलल्या जाणाऱ्या शब्दांच्या अनुषंगाने प्रमाण मराठी भाषेचा ढाचा तयार झालेला आहे.अर्थात बोलीभाषेतील शब्दाशिवाय तिला पूर्णता येणे शक्य नव्हते.

### मराठी बोलीभाषा

महाराष्ट्रातील त्यावेळची पुणे, मुंबई हीच मुख्य प्रगत शहरे मानली जात होती हे लक्षात घ्यावे.मग वऱ्हाडी बोलीभाषेतील मले,तूले ऐवजी मला तुला.कोकणी भाषेतील माका,तुका ऐवजी मला,तुला.आगरी भाषेतील मना ऐवजी मला असे बदल करून बोली भाषेला शुद्ध स्वरूप देण्यात आले.त्यामध्ये काही संस्कृतप्रचूर शब्दही व्यवस्थितपणे घुसविण्यात आले.तसेच बोलीभाषेतील इतर शब्दांतही बदल अनेक करण्यात आले.त्यानुषंगाने कठीण वाटावे असे व्याकरण तयार करण्यात येवून मराठी भाषा क्लिष्ट करण्यात आली.शब्दोच्चार, शब्दसंग्रह,आघातात व वाक्प्रचारातही बदल वाटायला लागला.सांप्रत काळातही घरीदारी मराठी भाषा बोलणारे विद्यार्थीही मराठी भाषेत नापास होऊ लागले यावरुन तिच्यातील क्लिष्टता लक्षात यावी.प्रमाण मराठी भाषेचा विचार करता महाराष्ट्रात प्रांतिक बोलीभाषा ह्या दुय्यम वाटायला लागल्या.नविन देवनागरी लिपीतील शब्दबदल व शब्दोच्चारामुळे बोलीभाषेचा ढाचाच कोसळला. प्राथमिकपासून शैक्षणीक क्षेत्रात व शासन व्यवहारातही प्रमाण मराठी भाषेचा वापर सर्वार्थाने वाढल्यानंतर तीच शुद्ध भाषा आहे असे महाराष्ट्रातील सर्व मंडळींना वाटू लागले आपण जी बोलीभाषा बोलतो ती अशुद्ध आहे असे अनेकांना वाटू लागले.वास्तविक कोणतीही भाषा शुद्ध किंवा अशुद्ध नसतेच ती मूळ असल्यामुळे अशुद्ध असण्याचे काही कारणच नाही.परंतू प्रमाण मराठी भाषा स्वतंत्रपणे बोलू लिहू लागल्यानंतर बोलीभाषेतील शब्द उच्चारायचा की नाही हा भयगंड,न्यूनगंड बोलीभाषेत संवाद करणाऱ्यांच्या मनात निर्माण झाला.कालांतराने पुस्तकी भाषेवरच त्यांचे प्रेम जडू लागले.ते त्यांच्या वागण्या बोलण्यातून दिसू लागले.मागील तीन चार दशकातील त्यांच्या वागण्या-बोलण्याने तर कहरच केला होता.आपली स्वतःचीच बोलीभाषा बोलणाऱ्या इतर गावकरी मंडळींना ते गावंढळ समजू लागले.बोलीभाषा बोलणाऱ्या लोकांचा पेहरावही ह्या शहरी मंडळींना हिणकस वाटू लागला तिथे बोलीभाषेची काय कथा?

शिकून सवरुन मोठी झालेली मंडळी आपल्याच बोलीभाषेला अव्हेरु लागली.चारचौघात आपल्याच बोलीत बोलतांना लाज त्यांना लाज वाटू लागली.सर्वच प्रांतातील बोलीभाषा ही शैक्षणिक व प्रशासनिक व्यवहारात वापरात नसल्यामुळे ती बोलणे जनता टाळू लागली व सर्रास प्रमाण मराठी भाषा बोलायला लागली.त्यामुळे आपली जी मूळ बोलीभाषा आहे ती बोलण्यातून व व्यवहारातून हळूहळू बाद होवू लागली.कारण तिचा वापरच कमी झाला.शहरातली मंडळी तर आपली बोलीभाषा बोलण्यात व व्यवहारातही अजिबात वापरत नाहीत.शहरातील बहुतेक मंडळी ही खेड्यातूनच आलेली आहे.त्यामुळे ती गावाकडे गेल्यानंतरही प्रमाण मराठीतच बोलू लागली.ह्या सर्वांचा परिणाम गावाकडील मंडळीवरही झाला.मग तीही मराठी प्रमाण भाषेतच बोलायला लागली.आपल्याच बोलीभाषेला हीन समजू लागली. साहित्यही निर्माण होत गेले ते प्रमाण मराठी भाषेतच.बोलीभाषेत लिहायला कोणी लेखक धजावलेच नाही.वऱ्हाडात गो.नी.दांडेकर, मधुकर केचे,उद्धव शेळके,शंकर बढे,विठ्ठल वाघ, बाजीराव पाटील,पुरुषोत्तम बोरकर, बाबाराव मुसळे, देविदास सोटे,डॉ मिर्झा रफी अहमद बेग अशी वऱ्हाडी प्रेमी मंडळी बोलीभाषेत लिहिण्यास धजावली पण त्यांची ग्रंथसंपदा सर्वसामान्य लोकांपर्यंत विपुल प्रमाणात पोचलीच नाही.तिकडे कोकणी भाषेत रविंद्र रेळेकर, रेवणासिद्ध नाईक, दामोदर मावजी, देविदास कदम. आगरी भाषेत गजानन म्हात्रे मराठवाडी भाषेत कौतिकराव पाटील,प्रा.डॉ.जगदीश कदम कोल्हापूरी भाषेत शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर ,दया पवार मालवणी भाषेत मच्छिंद्र कांबळी ,दा.र.दळवी, डॉ.श्यामकांत मोरे.अहिराणीत बहिणाबाई चौधरी,डॉ.रमेश सूर्यवंशी तर झाडीबोली भाषेत एकमेव असे डॉ.हरिश्चंद्र बोरकर अशा मंडळींचे कार्य विशेष आहे.परंतु बोटावर मोजण्याएवढे लेखक सोडले तर यातील किती मंडळींची पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत.बोलीभाषेतील साहित्य वाचण्यात लोकांचा कल कमी झाल्याने ह्या लेखकांच्या पुस्तकांस हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही.बोलीभाषेत लिहिणाऱ्या अनेक लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाही. अडगळीत पडलेली ती पुस्तके शोधावी लागेल.

### वऱ्हाडातील मराठी

वऱ्हाडात विठ्ठल वाघांची तिफण अन् डॉ.मिर्झा रफी अहमद बेग यांच्या मिर्झा एक्स्प्रेसने व हास्य बळी डॉट कॉमचे लोकप्रिय वऱ्हाडी कलाकार किशोर बळी,सुप्रसिद्ध सिने कलाकार भारत गणेशपुरे,हास्य कलाकार नरेंद्र इंगळे,'वऱ्हाडी झटका'वाले रमेश ठाकरे ह्या महोदयांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण सादरीकरणातून वऱ्हाडी बोलीभाषा प्रवाही ठेवली हेच काय ते समाधान.प्रमाण मराठीवर वऱ्हाडी,कोळी,अहिराणी,मालवणी या बोलीभाषेचा प्रभाव जरी जाणवत असला तरी ह्या मूळ भाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.बोलीभाषेतील काही शब्द तर लुप्तच झालेले आहेत.अनवधनाने ते कोणाच्या तोंडी आलेच तर त्याचा अर्थही आपणास माहीत नसतो.वऱ्हाडातील काही बोलीभाषा प्रेमींना ते जाणवायला लागले.

बोलीभाषेला लागलेली उतरती कळा अगदी जिव्हारी लागल्याने अलीकडेच वऱ्हाडातील काही मंडळी तिला जगविण्यासाठी पुढे आली.त्यात प्रामुख्याने अकोल्याचे प्रा.डॉ.विठ्ठल वाघ, रावसाहेब काळे,बहिरखेड(अकोला)चे पुष्पराज गावंडे,बार्शीटाकळीचे श्याम ठक,तिवसा (अकोला)चे प्रा.महादेव लुले (देवबाबू) व इतरही काही अशी समविचारी मंडळी पुढे आली.अकोल्याचे शिवलिंग काटेकर यांनी 'वऱ्हाडधन' हा वऱ्हाडी बोलीभाषेतील शब्दकोश तयार केला.बार्शीटाकळीच्या श्याम ठक यांनी वऱ्हाडी साहित्य व बोलीभाषा संवर्धन संस्था स्थापण करुन अ.भा.वऱ्हाडी साहित्य मंच अकोलाच्या माध्यमातून वऱ्हाडी बोलीभाषा संवर्धनाचे कार्य सुरू केले.त्यांचेमार्फत वऱ्हाडी बोलीभाषेतून दरवर्षी प्रकाशित होणारा 'चिरांगन' हा एकमेव दिवाळी अंक आहे.आतापर्यंत त्यांनी ८ दिवाळी अंक प्रकाशित केलेले आहेत.

### बोलीभाषेतील दिवाळाअंक

सन २०२४ साली शब्दवेल साहित्य संघ पनवेल यांनी सुद्धा बोलीभाषा दिवाळी विशेषांक प्रकाशित केला होता.त्यास उत्तम असा प्रतिसाद लेखकांडून व वाचकांकडून मिळाला होता.तसाच प्रयत्न महाराष्ट्रातील वेगवेगळ्या प्रादेशिक भागात कार्यरत असलेल्या इतरही साहित्यिक संघातर्फे होणे अपेक्षित आहे.महाराष्ट्रातील प्रत्येक बोलीभाषेतून दिवाळी अंक प्रकाशित व्हावेत.सन २०१५ सालापासून अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य मंचाने २३ फेब्रुवारी ह्या वैराग्यमूर्ती कर्मयोगी श्रीसंत गाडगे बाबांच्या जन्मदिनी 'वऱ्हाडी बोलीभाषा दिवस' म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली.तेव्हापासून हा दिवस वऱ्हाडात धडाक्यात साजरा होत आहे.यावर्षी सुद्धा २३ फेब्रुवारी रोजी प्रभात कीड्स स्कूल अकोला येथे या मंचाच्या व विदर्भ साहित्य संघ अकोला शाखेच्या संयुक्त विद्यमाने 'वऱ्हाडी बोलीभाषा दिवस' मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला व त्यात वऱ्हाडी बोलीभाषेतील २७ वऱ्हाडी सारस्वतांचा सत्कार करण्यात आला. प्रभात कीडस् स्कूलचे संचालक गजाननजी नारे यांनी या उपक्रमास भरघोस सहाय्य केले.

अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य मंचाचे वेगळेपण यातच आहे की या मंचावर फक्त आणि फक्त वऱ्हाडी बोलीभाषाच बोलली जाते,लिहिली जाते.मंचाचे ब्रीदवाक्यच 'बोलू वऱ्हाडी,लिहू वऱ्हाडी,जगवू वऱ्हाडी' असे आहे.त्यामुळे या मंचाचे कार्य वैशिष्ट्यपूर्ण आहे.

### बोलीभाषेचे जतन व संवर्धन

इतर बोलीभाषेतील लेखक, साहित्यिकांनी सुद्धा आपल्या बोलीभाषेकरिता अशा प्रकारचा मंच स्थापन करुन त्यानुसार जोमाने लुप्त होत चाललेल्या बोलीभाषेचे जतन व संवर्धन करण्यासाठी ह्याच दिवशी 'बोलीभाषा दिन' साजरा करावा.'वऱ्हाडी बोलीभाषा दिन' हा फक्त वऱ्हाडी बोलीभाषेकरिताच मर्यादित आहे.इतरही प्रांतिक ,भाषिक लेखक,साहित्यिकांनी आपल्या बोलीभाषेकरिता असा मंच स्थापन करुन व त्याचे कार्यक्षेत्र वाढवून 'बोलीभाषा दिन' दरवर्षी साजरा करावा.जेणेकरुन बोलीभाषेचे जतन व संवर्धन करण्याच्या प्रयत्नाला चालना मिळू शकेल.

बोलीभाषेत प्रामुख्याने २३ फेब्रुवारीला 'वऱ्हाडी बोलीभाषा दिन' व ४ एप्रिल ह्या मच्छिंद्र कांबळे यांच्या जन्मदिनी 'मालवणी बोलीभाषा दिन' हे दोनच दिन साजरे होत आहेत.एवढ्याने भागणार नाही म्हणून सर्वच बोलीभाषेत 'बोलीभाषा दिन' साजरा करण्याची व्याप्ती वाढणे आवश्यक आहे.गाडगे बाबा हे महाराष्ट्रातील सर्वमान्य संत आहे.त्यांनी प्रबोधनाकरिता आपल्या बोलीभाषेचाच वापर केला.म्हणून सर्व बोलीभाषिक साहित्यिक मंडळींनी गाडगे बाबांच्या २३ फेब्रुवारी ह्या जन्मदिनाचे औचित्य साधून आपापल्या प्रांतात 'बोलीभाषा दिन' साजरा करावा.त्या निमित्ताने आपल्या बोलीभाषेची उजळणी होऊन तिचे संवर्धन होईल व साहित्य निर्माण करण्यास बळ मिळेल.जेणेकरुन ह्या सर्वच बोलीभाषा प्रवाही राहून प्रमाण मराठी भाषाही अजून समृद्ध होईल.ह्या चळवळी सुरू झाल्या तेव्हापासून मराठी लिहितांना त्यात आपण बोलीभाषेतील शब्द व वाक्प्रचाराचा वापर करायला लागलो आहो.तिला प्रतिसादही मिळत आहे.सुरुवात झालेलीच आहे ती वृद्धींगत व्हावी हाच या चळवळीचा उद्देश आहे.

### मराठीला अभिजात दर्जा

महाराष्ट्रातील सर्वच बोलीभाषा ह्या प्रमाण मराठी भाषेची मायकूस आहे.प्रमाण मराठीचे मूळच ह्या बोलीभाषा आहेत.या बोलीभाषेत आपली महाराष्ट्रीयन संस्कृती दडलेली आहे.या बोलीभाषा प्रमाण मराठी भाषेचे अलंकार आहेत.प्रमाण मराठीला सुंदरता आली ती या बोलीभाषेतील शब्दांमुळेच.मराठीला अभिजात दर्जा देताना वऱ्हाडातील वाशिम इथल्या 'महाकवी गुणाढ्य' यांनी अकराव्या शतकात लिहिलेला बृहकथा हा ग्रंथ प्राचीनतेच्या दृष्टीने प्रमाण मानल्या गेला.मराठीला अभिजात दर्जा मिळाला तो याच ग्रंथामुळे. म्हणून वऱ्हाडी बोलीभाषेला विशेष स्थान प्राप्त आहे.म्हणून मराठी भाषेचे हे मूळ नष्ट होता कामा नये.त्यासोबतच मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यास मदत झाली ती सर्व बोलीभाषेतील उपलब्ध प्राचीन साहित्यामुळेच.त्यामुळे समृद्ध संस्कृती व विविध परंपरेने नटलेल्या आपल्या बोलीभाषा टिकवून ठेवणे हे आपले कर्तव्यच ठरते.गरज आहे ती बोलीभाषेचे जतन व संवर्धनाच्या चळवळीची व्याप्ती वाढविण्याची.असे केल्याने आपली अभिजात मराठी भाषा अधिक समृद्ध होण्यास मदतच होईल.

**आबासाहेब कडू**
वऱ्हाडी साहित्यिक

# श्री गुरू तेग बहादुर साहिब जी' यांच्या ३५० व्या शहिदी समागमाचे नवी मुंबईत आयोजन

## कार्यक्रमासाठी प्रशासन सोयी-सुविधांसह सज्ज – विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

**मुंबई/जनमाध्यम**

'हिंद- दी- चादर' श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाचे आयोजन २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी नवी मुंबई येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांसाठी सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली.

नवी मुंबई येथे होणाऱ्या हिंद -दी- चादर कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अखिल भारतीय धर्म जागरण समितीचे प्रमुख शरद रावजी ढोले, राज्यस्तरीय समन्वय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, सहसमन्वयक जसपालसिंग सिद्धू, राज्यस्तरीय समन्वय समितीचे निमंत्रक बल मलकित सिंह, अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य हॅपी सिंग उपस्थित होते.विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले की, या दोन दिवसीय कार्यक्रमात देश विदेशातून १८ ते २० लाख भाविक येणे अपेक्षित आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने सर्व नियोजन करण्यात आले असून, मुख्य मंडपात एकावेळी ८० हजार ते १ लाख भाविक आसनस्थ होतील अशी व्यवस्था करण्यात आली



आहे. या कार्यक्रमासाठी १५० पेक्षा अधिक विशेष एनएमएमटी बस सेवा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. स्वतंत्र पार्किंग स्थळे ३८, विशेष तीन हेलिपॅडची व्यवस्था, २५ हजार भाविकांची निवास व्यवस्था, तात्पुरती स्वच्छतागृहे १ हजार पेक्षा अधिक, स्वच्छता कर्मचारी ५०० पेक्षा अधिक उपलब्ध असणार आहेत. तसेच आरोग्याच्या दृष्टीने डॉक्टर व पॅरामेडिकल कर्मचारी ३०० पेक्षा अधिक असणार आहेत. तात्पुरती वैद्यकीय केंद्रे १५ पेक्षा अधिक, तात्पुरते एक आयसीयू केंद्र उपलब्ध करण्यात आले आहे. राखीव खाटा (जवळील रुग्णालये) ३५०, तर नजीकच्या रूग्णालयात राखीव आयसीयू खाटा ७५उपलब्ध आहेत. या दोन दिवसीय कार्यक्रमात १० हजारांपेक्षा अधिक स्वयंसेवकांचा सहभाग असणार असल्याची माहिती डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली.

**शहिदी समागमाच्या निमित्ताने राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन**

राज्य समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक राज्यस्तरीय समन्वयक रामेश्वर नाईक म्हणाले की,'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त देशभर विविध प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. अल्पसंख्याक विकास विभाग व शहिदी समागम राज्य समन्वय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई येथे भव्य शहिदी समागमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थितांना संबोधित करणार आहेत. तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जम्मू-काश्मीरचे उप राज्यपाल मनोज सिन्हा, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्रभाई पटेल, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिग सैनी, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी, तामीळनाडू येथील भाजपा नेते अण्णामलाई, योग गुरु बाबा रामदेव, बागेश्वर धाम पीठाधीश्वर धीरेंद्र कृष्ण शास्त्री, दीदी मा साध्वो ऋतंभरा उपस्थित राहणार आहेत.तसेच शिख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन तसेच भगत नामदेव संप्रदाय या समाजातील संत आणि रागी जत्थेदार उपस्थित राहणार आहेत. २७ फेब्रुवारी रोजी नगर किर्तन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या शौर्य, धर्मस्वातंत्र्य, मानवता आणि न्यायमूल्यांचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश असल्याची माहिती रामेश्वर नाईक यांनी यावेळी दिली.कार्यक्रमाची संपुर्ण माहिती https://gurutegbahadurshahidi.com/home या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# हिंगणघाटात 'कट'वरून रक्तरंजित हल्ला

## कटरने सपासप वार; दोघे जखमी, तिघांवर गुन्हा

**वर्धा/जनमाध्यम**

क्षुल्लक कारणावरून पेटलेला वाद थेट जीवघेण्या हल्ल्यापर्यंत पोहोचला. कट का मारला या प्रश्नावरून तिघांनी तरुणाला अडवून कटरने हल्ला केल्याची थरारक घटना हिंगणघाट येथील नंदोरी चौकात मल्हारी पेट्रोलपंपसमोर २४ रोजी रात्री घडली. या प्रकरणी हिंगणघाट पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.स्वप्नील देवीदास सुरकार (२३, निशानपुरा वॉर्ड) हे दुचाकीने जात असताना मोहित फुलझेले, आर्यन भगत व त्यांच्या अल्पवयीन साथीदाराने त्यांना अडवून वाद घातला. सुरकार यांनी वाद टाळण्याचा प्रयत्न केला; मात्र आरोपींनी पाठलाग करून पुन्हा अडविले. शिवीगाळ, दुचाकीची तोडफोड आणि संगनमताने कटरने हल्ला असा थरार उडाला. मध्यस्थीला धावलेल्या प्रगत तितरे यांनाही मारहाण करण्यात आली. दोघे जखमी असून पुढील तपास सुरू आहे.

# वर्धा नगरपालिकेची अतिक्रमणवर कारवाई

## रस्त्यावरची दुकाने उध्वस्त

**वर्धा/जनमाध्यम**

शहरातील रस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्या दुकानदारांवर वर्धा नगरपालिकेने आज कारवाई केली. वंजारी चौक पासून शास्त्री चौकापर्यंत रस्त्यावर वाहतूक करणाऱ्या नागरिकांना होणाऱ्या त्रासामुळे मुख्याधिकारी विजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहिम राबविण्यात आली.

लहान दुकानदारांवर लक्ष केंद्रीत; मालमत्ता जप्त - नगरपालिकेच्या टीमने शुक्रवारी निखिल लोहवे यांच्या नेतृत्वाखाली अतिक्रमित



दुकानदारांवर कठोर कारवाई केली. रस्त्यावर असलेली दुकाने हटवण्यात आली, काही अतिक्रमित दुकानदारांचे थेले जप्त करण्यात आले. अधिकाऱ्यांनी सांगितले की, या मोहिमेत नागरिकांना रस्त्यावर सुरळीत चालण्याची सुविधा देणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे.चेतावणी: भविष्यात कठोर कारवाई नगरपालिकेने पूर्वीही अनेकदा अतिक्रमित दुकानदारांना सूचनाद्वारे पत्र पाठवले, परंतु सुधारणा न झाल्यामुळे आज ही धडक कारवाई करावी लागली. अधिकारी स्पष्ट करतात की, रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्यांवर भविष्यात आणखी कठोर कारवाई केली जाईल. शहरातील रस्त्यांवर सुकर वाहतूक नगरपालिकेचे म्हणणे आहे की, अतिक्रमण हटवून रस्त्यांवर वाहतूक सुकर केली जाईल. नागरिकांनीही मार्गदर्शनाचे पालन करावे, अन्यथा नगरपालिकेची कारवाई सतत चालू राहील. ही मोहिम शहरातील सार्वजनिक मार्ग सुरक्षित व नागरिकांसाठी सुविधा संपन्न बनविण्यासाठी महत्त्वाची ठरली आहे.


# नांदपूर-टाकरखेड रस्ता : निकृष्ट बांधकामामुळे नागरिक नाराज

## अरविंद लिल्लोरे यांनी जिल्हाधिकाऱ्यानां निवेदन

**आर्वी/जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यातील नांदपूर-टाकरखेड रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत असल्याची नागरिकांची नाराजी व्यक्त झाली आहे. आर्वी तालुक्यातील ग्राम नांदपूरचे नागरिक अरविंद लिल्लोरे यांनी माननीय उपविभागीय अधिकारी आर्वी यांच्या माध्यमातून जिल्हाधिकारी, वर्धा यांना निवेदन दिले असून, रस्त्याच्या बांधकामाची चौकशी करून संबंधित इंजिनिअर व अधिकार्यांवर कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

अरविंद लिल्लोरे यांनी सांगितले की, रस्त्याच्या दोन्ही बाजूने सुरू असलेल्या नाल्या निकृष्ट बांधल्या गेल्या असून त्यांना भेगा पडलेले आहेत. इंजिनिअर व अधिकार्यांनी याकडे योग्य लक्ष दिले नसल्यामुळे संपूर्ण रस्ता निकृष्ट होत आहे. हा रस्ता येत्या तीस वर्षांसाठी एकदाच बांधला जात आहे, त्यामुळे उत्कृष्ट दर्जाचे बांधकाम करणे अत्यंत गरजेचे आहे, असे लिल्लोरे



यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. ३एप्रिल २०२५ पासून मंद गतीने सुरू असलेल्या रस्त्याचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण होईल अशी परिसरातील लोकांची अपेक्षा होती, परंतु बांधकाम अशा मंद गतीने चालल्यास किमान आणखी तीन वर्षे लागतील, अशी खंत लिल्लोरे यांनी व्यक्त केली.अरविंद लिल्लोरे म्हणाले, एकीकडे प्रशासन जलद गतीने रस्ते बांधून उदाहरण तयार करते, तर दुसरीकडे मंद गतीने काम करून नागरिकांच्या निंदेला सामोरे जाते. अशी कार्यपद्धती ग्रामीण विकासाला हानी पोहोचवते.

# खेळातूनच घडते सशक्त पिढी-निसार तांबोळी

**वर्धा/जनमाध्यम**

खेळ हा व्यक्तिमत्त्व विकासाचा पाया असून तो जीवनाचा अविभाज्य भाग बनविणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राज्य राखीव पोलीस बल, नागपूरचे विशेष महानिरीक्षक निसार तांबोळी यांनी केले. राष्ट्रीय आंतरशालेय कराटे स्पर्धेत सुवर्णपदक मिळविणाऱ्या वर्धा जिल्ह्यातील खेळाडूंच्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.

तांबोळी म्हणाले, खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबर मानसिक बळ आणि शिस्त विकसित होते. खेळाडू मैदानावर केवळ विजयासाठी लढत नाही, तर देशाच्या सन्मानासाठी झटत असतो. त्यामुळे क्रीडाक्षेत्रात यश मिळवणे म्हणजे राष्ट्राचा गौरव वाढविणे होय. भारतात मोठ्या प्रमाणावर क्रीडा प्रतिभा असून



योग्य प्रशिक्षण आणि सुविधा मिळाल्यास ही तरुणाई जागतिक स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या कार्यक्रमाला स्पोर्ट कराटे असोसिएशनचे पदाधिकारी व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी सुवर्णपदक विजेते पियुष अनुज सिंह, नैतिक निलेश राऊत आणि देवांशू प्रकाश लाखे यांचा शाल, पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात खेळाडूंच्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.

# राकेश पांडे सह अनेक कार्यकर्त्यांनी घेतला छत्रपती सेनेत प्रवेश

**वर्धा/जनमाध्यम**

सामाजिक कार्यासाठी प्रसिद्ध छत्रपती सेना या संघटनेत मोठा प्रवेश झाला आहे. संघटनेच्या पदाधिकारी बैठकीत, राकेश पांडे यांनी आपल्या अनेक कार्यकर्त्यांसह संघटनेत प्रवेश घेतला.

छत्रपती श्री. शिवाजी महाराजांच्या विचारांचे पालन करून गोर गरीब जनतेची सेवा करणे हेच आमचे ध्येय आहे. यावेळी त्यांना भगवा दुपट्टा देऊन अनेक पदाधिकाऱ्यांनी सन्मानित केले.संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मंगेश चोरे (पाटील) यांनी सांगितले, ही संघटना सर्वांची आहे. समाजहिताचे कार्य करणाऱ्यांचे स्वागत आहे. गोरगरीबांची सेवा आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आचरणात आणणे हे आमचे उद्दिष्ट आहे.यावेळी प्रवेश प्रक्रियेत राज्य कार्याध्यक्ष प्राध्यापक रमेश चौधरी मार्गदर्शन करत होते, तर जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश डोडानी, विदर्भ उपाध्यक्ष सूर्यप्रकाश पांडे, फाऊंडेशन सल्लागार राजाभाऊ साबळे, आणि जिल्हा सचिव दांडेकर उपस्थित होते.संघटना झपाट्याने सामाजिक उपक्रम राबवत असून, राजकारणापासून दूर राहून समाजहितासाठी कार्यरत छत्रपती सेना आता नव्या कार्यकर्त्यांसह अधिक सामर्थ्यशाली बनत आहे.

# आज गवळाऊ जनावरांच्या प्रदर्शनीचे आयोजन

**वर्धा/जनमाध्यम**

पशुसंवर्धनासाठी प्रदर्शन व प्रचार कार्यक्रमांतर्गत पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद, गौळाऊ गोवंश जतन, संवर्धन, संशोधन व पैदासकार चॅरिटेबल ट्रस्ट तळेगाव रघुजी यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि.२८ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता आर्वी येथे गवळाऊ जनावरांच्या प्रदर्शनी आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनीचा लाभ पशुपालकांनी घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

आर्वी येथील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार आवार परिसर, वर्धा रोड येथे आयोजित गवळाऊ जनावर प्रदर्शनीचे उद्घाटन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते होणार असून यावेळी खा.अमर काळे, सर्वश्री आ. दादाराव केचे, अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, समीर कुणावार, राजेश बकाने, सुमित वानखेडे, आर्वीच्या नगराध्यक्ष स्वाती गुल्हाने, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय प्रादेशिक सहआयुक्त डॉ.सतिश राजु, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय जिल्हा उपआयुक्त डॉ.जगदिश बुकतरे, आर्वी कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती संदीप काळे, उपसभापती प्रशांत वानखेडे उपस्थित असणार आहे.पशुपालकांनी पशुप्रदर्शनीस उपस्थित राहून आपल्याकडील जातिवंत गवळाऊ जनावरांना प्रदर्शनीमध्ये सहभाग नोंदवून गवळाऊ प्रजाती संवर्धनाच्या या अभियानात सहभागी व्हावे. यासाठी पशुपालकांनी आपल्या जनावरांची सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत नोंदणी करुन घ्यावी, सहभागी होणाऱ्या गवळाऊ कालवड, गवळाऊ गाय व गवळाऊ वळू या तीन गटानुसार अनुक्रमे ११ हजार, ८ हजार, ६ हजार व ३ हजार रुपये याप्रमाणे पुरस्कार देण्यात येणार आहे.अधिक माहितीसाठी जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा, असे तालुका पशुसंवर्धन व



दुग्धव्यवसाय अधिकारी डॉ.भारतभूषण अस्वार, गटविकास अधिकारी प्रादिप चव्हाण व गवळाऊ चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष पुष्पराज कालोकार यांनी कळविले आहे.

अवकाळीच्या जखमा भरून काढा

# शेतकऱ्यांच्या हाकेला वर्धा सोशल फोरमचा आवाज

## पंचनामे तातडीने पूर्ण करून तत्काळ मदतीची मागणी

**वर्धा/जनमाध्यम**

अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या स्वप्नांवर अक्षरशः पाणी फेरले असताना प्रशासनाची गती मात्र कासवाच्या पावलांनीच चालल्याची खंत व्यक्त करत आज वर्धा सोशल फोरमने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर केले. नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करून बाधित शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत जाहीर करावी, अशी ठाम मागणी या निवेदनातून करण्यात



आली.

शेतात उभ्या पिकांचे नुकसान, भाजीपाला आणि फळबागांचे झालेले मोठे हानीचित्र यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. अशा वेळी कागदी कारभारात वेळ घालवण्यापेक्षा थेट शिवारात जाऊन वास्तव पंचनामे करावेत, अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही देण्यात आला.या प्रसंगी मनीष तेलरांधे, नगरसेवक शैलेश झाडे, धोटे ताई, वीणा दाते, अक्रम पठाण, अविनाश उबाळे, डफ तसेच मोहित सहारे आदी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या अश्रूंना न्याय मिळेपर्यंत लढा सुरूच राहील, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## संक्षिप्त

### नियम डावलून रेतीची वाहतूक लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा** - क्षमतेपेक्षा जास्त रेती भरून वाहतूक करणाऱ्या टिप्परवर पोलिसांनी धडक कारवाई करत तब्बल २० लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई सिंदी रेल्वे येथील बसस्थानक चौकात करण्यात आली. कर्तव्यावर असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांना अवजड वाहनाबाबत संशय आल्याने ते बाजार समितीच्या वजनकाट्यावर नेण्यात आले. वजन तपासणीदरम्यान रेतीची ओव्हरलोड वाहतूक होत असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर टिप्पर व त्यातील रेती जप्त करण्यात आली. चालक अनिल धुर्वे तसेच मालक उमेश बोरबन (बुटीबोरी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अवैध रेती वाहतुकीविरुद्ध पोलिसांचा कारवाईचा बडगा कायम राहणार असल्याचे संकेत यानिमित्ताने मिळाले आहेत.

### घरासमोरून कार लंपास

**वर्धा** - घरासमोर उभी केलेली कार अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना रोहणा येथे उघडकीस आली आहे. एमएच-३२ एएच-४६३६ क्रमांकाची कार घरासमोर उभी केली होती. रात्रीच्या सुमारास अज्ञात व्यक्तींनी ती लंपास केली. याबाबत संजय बोंदरे (५८) यांनी तक्रार दिल्यानंतर पुलगाव पोलिस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून चोरट्यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. शहर व ग्रामीण भागात वाहनचोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज व्यक्त होत आहे.

### भरधाव ट्रकची दुचाकीला धडक युवक जखमी

**वर्धा** - साटोडा परिसरात भरधाव ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने युवक जखमी झाला. वृषभ राऊत (२९, रा. कारला) हा दुचाकीने जात असताना एमएच-३१ डीएस-२३०० क्रमांकाच्या ट्रकने त्याला धडक दिली. अपघातात तो जखमी झाला असून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी सावंगी पोलिस यांनी ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अपघातानंतर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

### महावितरणचे साहित्य चोरीला

**समुद्रपूर** - नंदोरी व आरंभा गावठाण फिडरवरील १८ वीजखांब आणि सिंगल फेज ट्रान्सफॉर्मर असा २ लाख ७८ हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. या चोरीमुळे परिसरातील वीजपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. तक्रारीनंतर समुद्रपूर पोलिसांत गुन्हा नोंदविण्यात आला असून चोरट्यांचा शोध सुरू आहे. महावितरण विभागाकडून नुकसानीचा पंचनामा करण्यात आला आहे. वाढत्या चोरीच्या घटनांमुळे सुरक्षा उपाययोजनांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### कनिष्ठ लिपीकाकडून लाखांचा अपहार गुन्हा दाखल

**वर्धा** - नगर परिषदेतील कनिष्ठ लिपीक आशिष गायकवाड (रा. पुलफैल) याने १७ लाख ४० हजार २१५ रुपयांचा अपहार केल्याचा प्रकार उघड झाला आहे. तक्रारीवरून शहर पोलिस ठाणे वर्धा येथे गुन्हा नोंदविण्यात आला. ऑगस्ट २०१५ पासून कार्यरत असलेल्या गायकवाडकडे रोखपाल पदाचा कार्यभार होता. रोकडवही अद्ययावत न ठेवल्याने तफावत आढळून आली. संबंधित रक्कम बँकेत जमा केल्याबाबत स्पष्टीकरण मागविण्यात आले होते; मात्र उत्तर न मिळाल्याने प्रशासनाने फौजदारी कारवाई केली. या प्रकरणामुळे पालिका प्रशासनात खळबळ उडाली आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ९३**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३५६/२०२६
**सयद व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२९.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Syed Asar Syed Ali, Age 33 Yrs. Occu.: Business R/o S/o Syed Ali Itwara Bazar Road, Ratanganj, Amravati.
2. Syed Maqsood Syed Ali (Deceased),Age Adult Occu.: Deceased R/o S/o Syed Ali Itwara Bazar Road, Ratanganj, Amravati.
2(a) Shubham Parveen Syed Maqsood, Age 40 Yrs. Occu.: Household R/o Gawalipura, Near Masjid Near Tamjid Bhai Chamde Wale House Gawalipura, Amravati.
2(b) Syed Umer Syed Maqsood, Age 17 Yrs. Occu.: Education R/o Gawalipura, Near Masjid Near Tamjid Bhai Chamde Wale House Gawalipura, Amravati.
2(c) Madiya Parveen Syed Maqsood, Age 20 Yrs. Occu.:Education R/o Gawalipura, Near Masjid Near Tamjid Bhai Chamde Wale House Gawalipura, Amravati.
3. Alimunnisa A.Gani, Age 44 Yrs. Occu.: Household R/o W/o Abdul Tousif Ward No.4, Nerpinglai, Tq.Morshi, Dist.Amravati
4. Farin Anjum Abdul Tousif, Age 36 Yrs. Occu.: Household R/o W/o Abdul Tousif Ward No.4, Nerpinglai, Tq.Morshi, Dist.Amravati
5. Amina Afreen Zafar Ahemad, Age 31 Yrs. Occu.: Household R/o W/oZafar Ahemad, Nerpinglai Tq.Morshi Dist.Amravati.
6. Sumaiya Parveen Mohd.Waseem Akhtat, Age 29 Yrs. Occu.: Household R/o Qtr.No.13, Walgaon Road, Kohinoor Colony, VMV Amt.
7. Aliya Parvin Saiyad Ali, Age 26 Yrs. Occu.: Education R/o Near Masjid Gawalipura, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **आशा बी सयद अली आणि हाजी सयद अली सयद डुले** हे अनुकमे दिनांक 16.01.2019 " 14.10.2006 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सयद व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सयद व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२४.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

प्रो.क्र.३३५९/२०२६
दिनांक २४ फेब्रु.२०२६

No.2
## CIVIL JUDGE SENIOR DIVISION
IN THE COURT OF **Asgar Hyder Baig**
5th Jt.Civil Judge, Sr. Dn. Amravati, AMRAVATI

**SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES (0.5, R.1, 5)**

Spl.C.S../435/2024
**Dr.Manohar Gulabrao Wankhade -Vs- Rupesh Gajanan Burghate**
NEXT DATE 23.03.2026

To,
1) Rupesh Gajanan Burghate, Prop.M/s Burghate Builders & Developers 14, Vaikuntha, Anand Vihar Colony, Kathora Road, Amravati.
2) Meenakshi Arvindrao Verulkar, Gulshan Tower Residency, B-Building Sundarlal Chowk, Chaprasipura Camp, Amravati
3) Rekha Sanjayrao Gudadhe, Near Sonone Atta Chakki, Shyam Nagar, Amravati, Tq.Dist.Amravati
4) Lata Avinash Wankhade, R/o Plot No.12, Flat No.T-1, Pranay Apartment, Wardha Road, Near Ramkulit Ashram, Prerana Society, Manish Nagar, Nagpur.
5) Anita Jiwanrao Bodkhe, Gulshan tower Residency, B-Building, Sundarlal Chowk, Chaprasipura Camp, Amravati
6) Rajeshree Pramodrao Jawanjal, Gulshan tower Residency, B-Building, Sundarlal Chowk, Chaprasipura Camp, Amravati
7) Gaurao Pramodrao Jawanjal,Gulshan tower Residency, B-Building, Sundarlal Chowk, Chaprasipura Camp, Amravati
8) Shubham Pramodrao Jawanjal, Gulshan tower Residency, B-Building, Sundarlal Chowk, Chaprasipura Camp, Amravati
9) Ankush Gajanan Burghate, Near Meher Baba Centre, Dastur Nagar Road, Amravati
Tq.Dist.Amravati (Maharashtra)

Whereas **Dr.Manohar Gulabrao Wankhade,** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the **27.02.2026** at **11.00** o'clock in the forenoon, to answer the claim, and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base y our defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this 24.02.2026.

**5th Jt.Civil Judge Sr.Dn.Amravati**

**Notice :** 1) Should you apprehend your witnesses will not attend of their own accord, y ou can have a summons from this Court to compel the attendance of any witness, and the production of any document that you have a right to call on the witness to produce, on applying to the Court and on depositing the necessary exenses. (2) If you admit the claim, you should pay the money into Court together with the costs of the suit, to avoid execution of the decree, which may be against your person or property, or both.

शिक्का

---

प्रो.क्र.३३५०/२०२६
दिनांक २४ फेब्रु.२०२६

No.2
## CIVIL JUDGE SENIOR DIVISION
IN THE COURT OF **Asgar Hyder Baig**
5th Jt.Civil Judge, Sr. Dn. Amravati, AMRAVATI

**SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES (0.5, R.1, 5)**

Spl.C.S../436/2024
**Sunil Mahadeorao Dhule -Vs- Rupesh Gajanan Burghate, Prop.M\s Burghate Builders & Developers**
NEXT DATE 23.03.2026

To,
1) Rupesh Gajanan Burghate, Prop.M/s Burghate Builders & Developers 14, Vaikuntha, Anand Vihar Colony, Kathora Road, Amravati.
2) Meenakshi Arvindrao Verulkar, Gulshan Tower Residency, B-Building Sundarlal Chowk, Chaprasipura Camp, Amravati
3) Lata Avinash Wankhade, Plot No.12, Flat No.T-1, Pranay Apartment, Prerna Society, Near Ram Kulit Ashram Manish Nagar, Nagpur
4) Anita Jiwanrao Bodkhe, Gulshan Tower Residency, B-Building, Sundarlal Chowk, Chaprasipura Camp, Amravati
5) Rajeshree Pramodrao Jawanjal, Gulshan Tower Residency, B-Building, Sundarlal Chowk, Chaprasipura Camp, Amravati
6) Gaurao Pramodrao Jawanjal, Gulshan Tower Residency, B-Building, Sundarlal Chowk, Chaprasipura Camp, Amravati
7) Shubham Pramodrao Jawanjal, Gulshan Tower Residency, B-Building, Sundarlal Chowk, Chaprasipura Camp, Amravati
Tq.Dist.Amravati (Maharashtra)

Whereas **Sunil Mahadeorao Dhule,** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the 27.02.2026 at 11.00 o'clock in the forenoon, to answer the claim, and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base y our defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this 24.02.2026.

**5th Jt.Civil Judge Sr.Dn.Amravati**

**Notice :** 1) Should you apprehend your witnesses will not attend of their own accord, y ou can have a summons from this Court to compel the attendance of any witness, and the production of any document that you have a right to call on the witness to produce, on applying to the Court and on depositing the necessary exenses. (2) If you admit the claim, you should pay the money into Court together with the costs of the suit, to avoid execution of the decree, which may be against your person or property, or both.

शिक्का

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१५८/२०२६ ने.ता.०८.०४.२०२६

**अर्जदार -**
१. **श्रीमती अरुणा प्रकाशराव गणबहाददुर,** वय ६१ वर्षे, धंदा - घरकाम
२. **श्री आकाश प्रकाश गणबहादूर,** वय ३२ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.विवेकांनद कॉलनी,मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२,बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट**-(८) **१८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती न अर्जदार नं.२ चे वडिल नामे **प्रकाशराव दशरथ गणबहादुर** हे दि.**१७.०६.२०२२** रोजी **पीडीएमसी हॉस्पिटल, अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २७.०२.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## तडीपार आरोपी चाकूसह जेरबंद

**अमरावती :** राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बेलपुरा परिसरातील न्यू हायस्कूलजवळ तडीपार असलेल्या आरोपीस गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. सागर रामदुलार यादव (वय ३२, रा. चिंचफैल) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

त्याच्याकडून एक धारदार चाकू जप्त करण्यात आला आहे. तडीपार आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

---

## अमरावती महानगरपालिका, अमरावती
## कार्यकारी अभियंता-१, विभाग

**अमनपा/बां.वि./का.अ.१/नि.सु.क्र./५२/२०२६**
**दिनांक २७.०२.२०२६**

मा.आयुक्त यांचे वतीने **सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना - सन २०२५-२६** अन्वये (महाराष्ट्र नगरोत्थान अभियानासाठी मनपाना अनुदाने) अमरावती महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत खालील कामासाठी ब-१ निविदा करारावरील अमरावती महानगरपालिका योग्य श्रेणीत नोंदणी करण्यात आलेल्या कंत्राटदारांकडून ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम | बयाणा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | | कोऱ्या निविदा फॉर्मची किंमत रुपये | कामाची मुदत दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नगदी/बँक गॅरंटी/ केव्हीपी २ टक्के | बिलातून ३ टक्के | | |
| १. | म.न.पा.उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा, जेवड गोपालनगर येथील शाळेचे बांधकाम करणे (फेज-२) | ८४६४४०९ | ८४६४५ | १६९२८९ | २५३९३३ | १००० + १८० जीएसटी | १८० |

**ई-निविदा प्रसिध्दीचा तपशील**

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी | दिनांक २७.०२.२०२६ सायं.६.०० वाजेपासून |
| ई-निविदा दस्ताऐवज डाऊनलोड प्रारंभ (Start) | दिनांक २७.०२.२०२६ सायं.६.०० वाजेपासून |
| ई-निविदा दस्ताऐवज डाऊनलोड समाप्त (End) | दिनांक १६.०३.२०२६ सायं.४.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा दाखल करण्याची सुरुवात दिनांक | दिनांक २७.०२.२०२६ सायंकाळी ६.०० वा.पासून |
| ई-निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दिनांक १६.०३.२०२६ सायं.४.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक (Technical) | दिनांक १७.०३.२०२६ सायं.४.०० वाजता |
| (Financial) ई-निविदा उघडण्याची दिनांक व वेळ Mail व SMS द्वारे कळविण्यात येईल. | |

**स्वाक्षरी/-**
**(रविंद्र पवार)**
**कार्यकारी अभियंता-१,**
**महानगरपालिका, अमरावती**

**स्वाक्षरी/-**
**(नरेंद्र वानखडे)**
**उपायुक्त-२**
**महानगरपालिका, अमरावती**

---

## महाराष्ट्र शासन
## आदिवासी विकास विभाग,
## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी, जि.अमरावती

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी, जि.अमरावती यांचे कार्यक्षेत्रांतर्गत पारधी समाजाच्या विकासाकरीता योजना सन २०२१-२२ अंतर्गत **१.वेल्डीग कामाचे प्रशिक्षण देऊन साहित्य वाटप करणे, २. पारधी समाजाच्या युवक-युवतीना स्पर्धा परीक्षेबाबत मार्गदर्शन करणे, ३. पारधी समाजाच्या लाभार्थ्यांना दुचाकी वाहने दुरुस्ती व देखभाल करण्याचे प्रशिक्षण देणे.**

मंजूर योजनाच्या अंमलबजावणी करीता कामाचा अनुभव असलेल्या पात्र नामांकित स्वयंसेवी संस्था व संबंधित कामाची यंत्रणा असणाऱ्या शासकीय विभागाकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहे. सदर योजना बाबत अटी व शर्तीबाबत माहिती कार्यालयाचे सुचना फलक (बोर्ड) वर लावण्यात आली आहे. तसेच विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयातून घेवून जावे. त्यांची कालावधी दिनांक २७.०२.२०२६ ते दिनांक १२.०३.२०२६ पर्यंत राहील. (सुटीचा दिवस वगळून) अधिक माहितीकरीता कार्यालयाशी संपर्क साधावा.

**(सिध्दार्थ शुक्ला (भा.प्र.से.)**
**सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प**
**धारणी, जि.अमरावती**

**(क्र./अम/जाही/१११३/२०२५-२०२६)**

---

## जाहीर नोटीस

आम जनतेला सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **अनिल गणेशराव काळे** यांचे मालकी व ताब्यातील खालील वर्णनांकित मिळकत ज्याचे वर्णन येणेप्रमाणे :-

नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर कचेरीचे कक्षेतील व मनपा अमरावती चे हददीतील मौजे कठोरा, प्रगणे-नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती, येथील शेत सर्वे नं. ९२/१, भोगवटदार वर्ग १ मधील १ हे ५९ आर जमीन असीसस्टंट टाउन प्लॅनिंग अमरावती यांनी पत्र क्र.१३२० दिनांक २९/०७/२००२ व विद्यमान उप विभागीय अधिकारी साहेब अमरावती यांनी रे.के.नं.एन.ए.पी.३४ कठोरा बु./१३/२००१-२००२ आदेश पारित दिनांक २३.१०.२००२ नुसार लेआउट कन्वर्हशन मंजुर झालेल्या व वैष्णवी नगर नावाने ओळखल्या जाणा-या प्लॉट नं.४, याचे एकूण क्षेत्रफळ १२५.३७ चौ.मी.(१३५९.७ चौ.फुट) आहे.याची चतुःसिमा येणेप्रमाणे पुर्वेस प्लॉट क्र.५, पश्चिमेस- प्लॉट क्र.३, उत्तरेसः ९ मी.रुंदीचा रोड, दक्षिणेस : सर्व्हे नं.९२ ची जमीन.

येणेप्रमाणे वर उल्लेखित प्लॉट अनिल गोपाळराव सोनोने यांनी उमाशंकर साहेबदीन असोरिया यांचे जवळून नोंदणीकृत खरेदीदस्त दस्त क्र.२४७३/२००३ दिनांक २४/०६/२००३ नुसार विकत घेतले होते.सदरचे खरेदीदस्त अनिल गोपाळराव सोनोने यांच्याकडून दिवाळी २०२५ ची घरातील साफ सफाई करतांना हरविले आहे. त्याबाबत त्यांनी पोलीस स्टेशन गाडगे नगर येथे तक्रार दिलेली आहे.

सदरच्या सदनिकेवर कोणत्याही बँकेचे कर्ज, गहाण, बोजा नाही, परंतू सदरच्या घराचे पुर्वीचे दस्त गहाळ झालेले असून सध्या त्यांच्याकडे उपलब्ध नाही. याबाबत त्यांनी पोलिस स्टेशन गाडगे नगर, अमरावती यांच्याकडे तक्रार दिलेली आहे. सदर सदनिकेचे / प्लॉटचे अनिल गणेशराव काळे यांनी युनियन बँक ऑफ इंडिया शाखा अमरावती यांच्याकडे गृह कर्ज मिळण्याकरिता मागणी अर्ज दाखल केलेला आहे. सबब वर उल्लेखित मालमत्तेत कोणाचाही हक्क, गहाण, कर्ज, बोजा, किंवा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष हितसंबंध, असल्यास ही नोटीस मिळाल्यापासून ७ दिवसांत खालील पत्त्यावर संपर्क करावा अन्यथा आमची बँक कर्ज मागणी अर्ज मंजूर करुन कर्ज पुरवठा केल्यास त्यानंतर कोणाचाही उजर चालणार नाही. करिता सदरची नोटीस.

**दिनांक २७.०२.२०२६**

**सही/-**
**ॲड.रोहित एस.सावळे,**
**जेवड नगर, अमरावती**
**मो.नं.९१७२८३६११३**

---

## तहसिलदार मोर्शी यांचे न्यायालय
**रा.मा.क्र./९/MRC-८१/खोपडा/२०२५-२०२६**

### जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार जयप्रकाश हरिषचंद्र पांडे, रा.खोपडा, ता.मोर्शी, जि.अमरावती यांनी त्यांचे काका नावे राजेंद्र नरसाजी पांडे यांच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायत खोपडा ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.प. कार्यालय खोपडा येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुउपलब्धता प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र, इ.अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत.

त्या अर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आंत आक्षेप वा हरकती दाखल कराव्या दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतींचा विचार करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.

**दिनांक- १२.०२.२०२६**

शिक्का

**सही/-**
**तहसिलदार, मोर्शी**

---

## -सायटेशन/जाहिरनामा-

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१६०/२०२६ ने.ता.०८.०४.२०२६

**अर्जदार -**
१. श्रीमती सुब्रद्रा दामोधर ठाकरे, वय ७५ वर्षे, धंदा - घरकाम
२. श्री गजानन दामोधर ठाकरे, वय ५७ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.ईनापुर, पो.निंभी, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. सौ.वर्षा संजय उगले, वय ४२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.पेठपुरा, मोर्शी,ता.मोर्शी, जि.अमरावती
४. रजनी गणेशराव जवंजाळ, वय ६१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.कठोरा गांधी,पो.सालोरा खुर्द, ता.जि.अमरावती
५. रेखा महादेवराव लकडे, वय ५४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.पिंपळखुटा लहान, ता.मोर्शी, जि.अमरावती
६. छाया ज्ञानेश्वर चांगोले,वय ५३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.यशपंतपूरा रिध्दपुर, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती न अर्जदार नं.२ ते ६ चे वडिल नामे **दामोधर बाजीराव ठाकरे** हे दि.**०८.०७.२०२१** रोजी निंभी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २७.०२.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## तहसिलदार मोर्शी यांचे न्यायालय
**क्र. रामाक्र/६४/एमसीआर-८१/खानापूर/२०२५-२०२६**

### जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **शहनाज अब्दुल सत्तार मन्सुरी,** यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत खानापूर ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.खानापूर येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व ईतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय खानापूर येथे स्वतःचे जन्म दिनांक **२५.०५.१९७५** रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती अर्ज केला आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

शिक्का

**तहसीलदार, मोर्शी**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.८८/२०२६ ने.ता.२७.०३.२०२६

**अर्जदार :**
१. श्रीमती मनोरमा अजाब ओलीवकर, वय ८३ धंदा - गृहिणी
२. श्री.अशोक अजाब ओलीवकर, वय ५६ धंदा - बिझनेस
३. श्रीमती वंदना गणेश वडुरकर, (D/o अजाब राजेराम ओलीवकर) वय ५४ धंदा - गृहिणी
अर्जदार नं.१ ते ३ रा.पो.तळवेल, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती-४४४८०१
४. श्रीमती चंदा मुरलीधर अनकार (D/o अजाब राजेराम ओलीवकर) वय ४७ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.गल्ली नं.४, विलास नगर, अमरावती-४४४६०४

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक श्री.अजाबराव राजेराम ओलीवकर** यांचा मृत्यू दिनांक **१६.०९.१९९८** रोजी **तळवेल,** ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराव्यतिरिक्त ईतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.८८/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२०.०२.२०२६०** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

## तहसिलदार मोर्शी यांचे न्यायालय
**क्र. रामाक्र/१८२/एमसीआर-८१/खानापूर/२०२५-२०२६**

### जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **शाहिस्ता अब्दुल सत्तार मन्सुरी,** यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत खानापूर ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.खानापूर येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व ईतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय खानापूर येथे स्वतःचे जन्म दिनांक २२.०५.१९७४ रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती अर्ज केला आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

शिक्का

**तहसीलदार, मोर्शी**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१४४/२०२६ ने.ता.०१.०४.२०२६

**अर्जदार -**
१. श्रीमती उषाताई प्रल्हादराव वासनकर, वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम
२. नितीन प्रल्हादराव वासनकर, वय ४२ वर्षे, धंदा - शेती व नोकरी
दोन्ही रा.मालवीय गार्डन, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. सौ.स्मिता दिलीप मेश्राम, वय ४१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.रुक्मिणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ यांचे वडील नामे **प्रल्हादराव सावजी वासनकर** हे दि.२१.०१.२०२६ रोजी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २५.०२.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझ्या अशिल **श्रीमती चंद्रकला शंकरराव काळे** ह्यांनी **श्री.शंकरलाल छिनकुमल गावडा** यांच्या विरुध्द विद्यमान अपर जिल्हाधिकारी, अमरावती यांचे न्यायालयात खालील नमुद शेत जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर झालेल्या फेरफार क्र.३२३२ रद्द करण्याकरीता अपिल क्र.२४/२०२६ दाखल केले आहे. तरी कोणाही खाली नमुद शेतजमिनीच्या हस्तांतरणाचा कोणत्याही प्रकारचा व्यवहार **श्री.शंकरलाल छिनकुमल गावडा** यांचेसोबत करु नये. तसे केल्यास तो व्यवहार अवैध राहील तसेच माझ्या अशिलांवर बंधनकारक देखील राहणार नाही. सदरील शेतजमिनीचा वास्तविक ताबा आज पावेतो माझ्या अशिलाकडेच आहे.

**मालमत्तेचे वर्णन -** नोंदणी तुकडी अमरावती नोंदणी पोट तुकडी, मोर्शी कक्षेतील मौजा-नेरपिंगळाई भाग-१, ता.मोर्शी, जि.अमरावती येथील सर्व्हे नं.१०६/१अ, एकुण क्षेत्रफळ १ हे.६२ आर पैकी उत्तर-दक्षिण वाटणीचे पश्चिमेकडील ० हे.८१ आर (७/१२ उताऱ्यावर ० हे.७८ अरी) ह्या शेताची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्वेस - मनोज काळे यांचे शेत
पश्चिमेस - काळे यांचे शेत
उत्तरेस - नाला
दक्षिणेस - मासोदकर यांचे शेत

दिनांक २६.०२.२०२६
स्थळ - अमरावती

(ॲड.एच.एम.ग्वालानी)
मो.८४८४८९८९८७

---

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार याद्वारे सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, नामे **मिनाक्षी किशोर लखोटीया** यांनी इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड, शाखा अमरावती येथे गृह कर्जाकरीता अर्ज केला असून खालील नमुद मालमत्ता ही **सोमेश्वर लक्ष्मणराव निंभोरकर** यांच्याकडून रजिस्टर खरेदीखत नं.**८७९८**, दिनांक **२१.१२.२०२४** ला खरेदी केली आहे. परंतु या रजिस्टर मिळकती संबंधीत खरेदी खत नं.८३०, दि.११.०३.२०१४ ही ओरिजनल खरेदी झेरॉक्स काढतांना राजापेठ परिसरातून गहाळ झाली आहे.

**मिळकतीचे वर्णन -** नझुल शिट नं.५४-डी, नझुल प्लॉट नं.६/१७, मौजा राजापेठ, प्रगणे बडनेरा, रघुनंदन टॉवर, पहिल्या मजल्यावर दुकान नं.१५, ता.जि.अमरावती

सदर मालमत्तेवर कोणाचा वारसा हक्क, बोजा, गहाण, पतसंस्था, कर्ज असल्यास प्रसिध्द झाल्यापासून तीन दिवसांचे आत प्रत्यक्ष कागदपत्रासह खालील पत्त्यावर संपर्क करुन आपली लेखी हरकत नोंदवावी. त्यानंतर आपली हरकत विचारात घेता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

आपला,
**(ॲड.अनिकेत देशमुख)**
इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड, अमरावती
मो.नं.९५६१२४८२१५

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १७२**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### मंगेश महल्ले यांचे कडून शाळेची शैक्षणिक सहल

**अमरावती-**माजी सरपंच मंगेश भाऊ महल्ले नी स्वतःच्या खर्चाने एस टी महामंडळाची बस बुकिंग करून जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा कठोरा बु पंचायत समिती अमरावती येथील शैक्षणिक सहल श्री क्षेत्र शेगाव गजानन माऊली येथे संपूर्ण कुटुंबासह बस ची पूजा करून रवाना केली. यावेळी सहल मध्ये शाळेचे सर्व विद्यार्थी हजर होते व त्यांना सकाळी सोडायला त्यांचे पालक वर्ग हजर होते. शेगाव येथे पोहोचल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षक मंडळींनी श्री गजानन महाराज मंदिर येथे दर्शन घेऊन, मंदिरातच जेवणाचे प्रसाद घेतला व नंतर त्या मंदिराबद्दल संपूर्ण माहिती घेतली त्यानंतर विद्यार्थिनी आनंद सागर मध्ये जाऊन आनंद घेतले.या शैक्षणिक सहल मध्ये शाळेची मुख्याध्यापक अपर्णा सोनटक्के, सहाय्यक शिक्षक राजेंद्र दिक्षित, विषय शिक्षक रामचंद्र चव्हाण, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मंगला गाडे,शालेय पोषण आहार शिजवणारे संगीता दाभणे,पुष्पा गडलिंग, अंगणवाडी मदतनीस पदमा युवनाते, रानी तायडे हे विद्यार्थ्यासोबत शाळेच्या शैक्षणिक सहल मध्ये हजर होते. शाळेची शैक्षणिक सहल हे शेगाव येथे संपूर्ण खर्च घेऊन पाठवल्या बद्दल जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी कठोरा बु येथील मुख्याध्यापक व शिक्षक वृंदांनी माजी सरपंच मंगेश भाऊ महल्ले यांचे आभार मानले.



### संत लहरीबाबा पुण्यतिथी महोत्सव उत्साहात

**धामणगाव रेल्वे-**अवघे विश्वचि माझे घर' या उदात्त भावनेतून विश्वकल्याणाचा आणि बंधुतेचा विचार प्रत्येक घरात पोहोचावा,अठरापगड जातींतील' लोकांना भक्तीच्या एका माळेत ओवून सामाजिक विषमता नष्ट व्हावी यासाठी किर्तन, अभंगातूनच संतांनी माणुसकी,सत्याचा मार्ग दाखविला असल्याचे उद्बोधन नागपूर येथील ह.भ.प. विलास महाराज कोरडे यांनी केले. तालुक्यातील जळगाव आर्वी येथील संत लहरी बाबा पुण्यतिथी महोत्सवाच्या तिसऱ्या रात्री ग्रामस्थांच्या उपस्थितीत 'संत व समाज' या संदर्भात ह.भ.प विलास महाराज कोरडे यांनी समाजाला दिशा देणाऱ्या संताविषयी आपल्या वाणीतून मार्गदर्शन केले.संत नेहमी समाजाला योग्य दिशा देते, समाजातील अंधश्रद्धा अनिष्ट दूर करण्याचा प्रयत्न करतात आजपर्यंत संत तुकाराम महाराज, संत एकनाथ महाराज,संत ज्ञानेश्वर महाराज, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज यांच्यासह विदर्भातील अनेक संतांनी समाजाला योग्य दिशा दिली.संतांनी महाराष्ट्राच्या माळरानावर भक्तीचे नंदनवन फुलवले आणि माणसाला माणसासारखे जगण्याची नवी दिशा दिली.संतांनी आपल्या अभंग, कीर्तनातून साध्या सोप्या भाषेत समाजाला सत्याचा आणि धर्माचा,माणुसकीचा मार्ग दाखविला आहे,संत साहित्याने समाजाला मानवी मूल्ये, नैतिक शिकवण आणि प्रेमळ संस्कार दिले. आज खऱ्या संतांमुळे मानव जिवंत असल्याचे उद्बोधन ह भ प विलास कोरडे महाराज यांनी केले.परमहंस संत लहरी बाबा यांच्या आयुष्य पटातील अनेक उदाहरण त्यांनी यावेळी दिली शनीवारी या पुण्यतिथी महोत्सवाचा सांगता होणार आहे.



### महापौर यांचा डॉ.कासट मित्र मंडळातर्फे सत्कार

**अमरावती-**बढते कदम संस्था डॉ. गोविंद कासट मित्र इत्यादी अनेक सेवाभावी संस्थांची जोडलेल्या श्रीचंद तेजवानी यांचा महापौर पदासाठी डॉ. गोविंद कासट मित्र मंडळ तर्फे सत्कार करण्यात आला. लक्ष्मण विला या कॅम्प विभागातील मनोज खंडेलवाल यांच्या निवासस्थानी श्याम चौक मित्र मंडळातर्फे आयोजित सत्कार समारंभात ही संधी मित्र मंडळ लाभली.शाल व पुस्तक वरदान करून डॉ. गोविंद कासट विजय बख्तार नरेंद्र भूत मनोज खंडेलवाल प्रकाश हेडा अनिल धामोरीकर संतोष हेडा अमिष राजा हरीश अडवाणी संजय चौधरी किशोर मेहता देवेंद्र मालपाणी अनिल शिवजी कैलास लाड अजय पोपटानी विवेक सहस्त्रबुद्धे कुकरानी यांच्यासह प्रामुख्याने श्याम चौक मित्र मंडळ अध्यक्ष भारत भयानी व कार्यक्रम आयोजक डॉ. रवींद्र कासट हजर होते. संचालन डॉ. रवींद्र कासट आभार विजय खंडेलवाल यांनी मानले.

# नूतनीकरण केलेल्या उद्यानात फुलली सौंदर्याची पर्वणी

## शहरात भव्य गुलाब उत्सवाचा शुभारंभ, महापौर व आयुक्तांच्या हस्ते उद्घाटन

**अमरावती/क्रा.प्र.**

शहरातील फुलप्रेमींसाठी आनंदाची पर्वणी ठरणारा भव्य गुलाब उत्सव आज उत्साहात पार पडला. अमरावती महानगरपालिका यांच्या वतीने २६ फेब्रुवारी ते१ मार्च २०२६ या कालावधीत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत रोज गार्डन, आय.एम.ए. हॉल लगत, मांगीलाल प्लॉट, इर्विन चौक ते गर्ल्स हायस्कूल चौक रोड, कॅम्प, अमरावती येथे या उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. उत्सवाचे उद्घाटन महापौर श्रीचंद तेजवाणी व महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या हस्ते



करण्यात आले. यावेळी गटनेते,नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी, कर्मचारी, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी गुलाब फुलांच्या विविध प्रजातींची पाहणी करत आयोजकांचे कौतुक केले.महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या संकल्पनेतून रोज गार्डन उद्यानाचे व्यापक नूतनीकरण करण्यात आले आहे.विविध प्रजातींचे आकर्षक प्रदर्शन गुलाब उत्सवामध्ये लाल, पिवळे, गुलाबी, पांढरे, नारिंगी अशा विविध रंगांतील तसेच देशी-विदेशी प्रजातींच्या शेकडो गुलाबांचे आकर्षक प्रदर्शन मांडण्यात आले आहे. सुगंधी गुलाब, मिनिएचर गुलाब, हायब्रिड टी, फ्लोरीबुंडा, क्लायंबिंग रोज अशा विविध प्रकारांनी सजलेले बाग नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहेत. फुलांची आकर्षक रचना, सेल्फी पॉइंट्स आणि सजावटीमुळे परिसर रंगीबेरंगी व प्रसन्न वातावरणाने नटला आहे.

महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी अमरावतीकरांना गुलाब उत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. आपल्या संदेशात त्यांनी म्हटले आहे की, अमरावती महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेला गुलाब उत्सव हा केवळ फुलांचे प्रदर्शन नसून शहराच्या सौंदर्यवृद्धीचा आणि पर्यावरण जागरूकतेचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी अमरावतीकरांना गुलाब उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.नागरिकांनी १ मार्च २०२६ पर्यंत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत रोज गार्डन येथे भेट देऊन या उपक्रमाचा लाभ घ्यावा. आयुक्तांनी पुढे सांगितले की, महानगरपालिकेच्या वतीने उत्सवासाठी स्वच्छता, सुरक्षा आणि सुव्यवस्थेची योग्य ती काळजी घेण्यात आली असून नागरिकांनीही सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी करावा.या उत्सवात सभागृह नेता चेतन गावंडे, नगरसेवक दिनेश बुब, मनिष बजाज, संजय तिरथकर, अतिरिक्त महेश देशमुख, शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, शहर अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव, उद्यान अधिक्षक अजय विंचुरकर, उद्यान निरीक्षक श्रीकांत गिरी, उपअभियंता प्रमोद इंगोले, दिनेश हंबर्डे, अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार, परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हितेश भागवत यांचा सत्कार



**अमरावती-**श्याम नगरातील रहिवासी संजय भागवत यांचे कनिष्ठ पुत्र हितेश भागवत यांनी यु जी सी - निट परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केल्याबद्दल राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.राजीव जामठे तर प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे, पी.बी.वनस्कर, प्रा.गजानन वानरे, देविदास किटे, नगरसेविका राधा कुरील, बाळकृष्ण गव्हाळे, मंगेश गणोरकर, राजु कुरील हे उपस्थित होते.

## नाफेड हमीभावानुसार तुर, चना खरेदी केंद्राचे उद्घाटन

**शिराळा** - चिरायू सप्तरुऋषी फेड फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमिटेड महाकिसान वृध्दी अँग्रो प्रोड्युसर कंपनी व नाफेड यांच्या संयुक्त विद्यमाने शिराळा येथे नाफेड हमीभावानुसार तुर चना खरेदी केंद्राचे उद्घाटन समारंभ पार पडला. कडधान्य आत्मनिर्भरता अभियान हमीभाव खरेदी हंगाम २०२५- २६ नाफेड खरेदी केंद्र नर्मदा टेंडर गुल्हाने किराणा शॉपच्या बाजुला



मुख्य बस स्टॉप शिराळा येथे नोंदणी सुरू आहे.

यावेळी तुर उत्पादक पाच शेतकऱ्यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बाबुरावजी बोराळकर शिवाजी खाडे आदी कंपनीचे संचालक तसेच शिराळा येथील शेतकरी विठ्ठलराव जिभकाटे, चंद्रशेखर लव्हाळे दिलीप आमले शितल आमले प्रकाश आमले मनोज पोहण, हरिदास शेंडे, दिलीप बांब, नानासाहेब लव्हाळे पत्रकार डीआर वानखडे असे असंख्य शेतकरी उपस्थित होते. विठ्ठलराव जिभकाटे चंद्रशेखर लव्हाळे, शितल आमले हरिदास शेंडे, दिलीप आमले यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

## तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालय दारापूर येथे वार्षिक स्नेहसंमेलनाचा जल्लोष

**अमरावती/का.प्र.**

श्री. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालय दारापूर येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. टी. इंगोले यांच्या मार्गदर्शनात आयोजित इनोव्हेशन २६ - वार्षिक स्नेहसंमेलन आणि कॉलेज लेव्हल डे सेलिब्रेशन कार्यक्रम उत्साहात पार पडला. श्री. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष कीर्तीताई राजेश अर्जुन, सचिव प्राचार्य डॉ. कमलाकर पायस, प्रशासकीय अधिकारी प्रा. डॉ.सचिन पंडित, सीईओ प्राचार्य पि. आर. एस.राव तसेच अनेक क्षेत्रातील मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. घेण्यात आलेल्या 'क्रीडा सप्ताह' मध्ये भव्य मॅरेथॉन, क्रिकेट, हॉलिबॉल, कबड्डी, रनींग या खेळांमध्ये



विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.यावेळी व्यासपीठावरून आपले मनोगत व्यक्त करतांना प्राचार्य डॉ. डि. टी. इंगोले म्हणाले की, महाविद्यालयीन जीवनात मिळणारे संस्कार आणि व्यासपीठ विद्यार्थ्यांच्या भवितव्यास आकार देणारे असते. हे संमेलन विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, सांघिक भावना आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देते. यावेळी प्रा.डॉ. संतोष यावले, अर्पित काळमेघ, प्रा. डॉ. एस. टि. वरघट, प्रा.निखिल बोडखे,विभाग प्रमुख प्रा. डॉ. एन. एस. घोटकर, प्रा.पी. एस. दंडे, अतुल कौशल,प्रा.अतुल चिंचमलातपुरे, प्रा. पूजा देशपांडे, प्रा.ए. एस. बोंबटकर, लेखापाल श्री. प्रकाश मोहोड, इस्टेट मॅनेजर मुकेश बनसोड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी करण्यात आली. कार्यक्रमाचे वृत्तांकन ग्रंथपाल देवेंद्र चोरे यांनी केले. कार्यक्रमाला धीरज मनोवार, मनिष बिजवे, एम. जे. वाटाणे, प्रा.डॉ. श्रीकांत दाभाने, प्रा.रोशन देवतारे, प्रा. मेघा चिंचमलतपुरे, प्रा. हेमंत लोणपांडे, पवन भडांगे, मोहिनी वानखडे, अपेक्षा इंगळे, श्रीकांत भुंते, एस. पि.झाडे, प्रा. गौरी गुल्हाने, ए.एन. कोरडे, जाणव्हि जयसिंगपुरे, एस.ए. पोखरे, डी.एम.सगणे, मनिष पाटील, दुशन्त पवार, प्रा. हेमंत लोणपांडे, प्रा. डि. व्ही. आष्टोणकर, भूषण मेश्राम, प्रा. केवल मोहोड, प्रा.योगेश गोंडाने, व्ही. आर. काळे,एस. एम. हुमणे, पि. ए. वैद्य, पि. एन. घरडे, प्रवीण ठाकरे, प्रफुल्ल श्रीखंडे, योगेश सवई, राजेश कमलापुरे, अमोल पेढेकर, प्रवीण बांगरे, तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व प्राध्यापकवर्ग, कर्मचारीवर्ग तसेच विद्यार्थी मोठ्या उत्साहात उपस्थित राहिले. अत्यंत आनंददायी, रंगतदार व संस्मरणीय वातावरणात वार्षिक स्नेहसंमेलनाचा यशस्वीपणे झाला.

## जि.प.माध्यमिक शाळेतील पाच विद्यार्थी उत्तीर्ण



**अमरावती**-जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, उत्तमसरा येथील विद्यार्थ्यांनी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत शाळेतील पाच विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडली आहे. वर्ग आठवीचे विद्यार्थी लावण्या विलास दहीकर,सान्वी सतीश मानेकर,शुभेच्छा दीपक मावंदे, सम्यक रवींद्र गवई, नैतिक बंडू थोटे हे उत्तीर्ण झाले आहे. हे यश शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत व पालकांचे सहकार्य यांचे फलित आहे. या यशामुळे विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार आहे. या यशाबद्दल मुख्याध्यापक लोमेश खैरकर ज्येष्ठ शिक्षक संतोष कुऱ्हेकर, चंद्रशेखर ब्राह्मणकर, शितल भोपाळे. अश्विनी एस. झाडे,उमेश रामदास बसरे, प्रतिभा नांदणे, ज्योत्स्ना हायगले, भूषण एस बुरंगे, रेणुका केचे. मीनाक्षी इंगळे, राजेश सावरकर गजानन येलोने आणि प्रमोद कांबळे यांनी शुभेच्छा दिल्या व पालकांनी त्यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### श्री.संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार संस्था गटात दिव्या फाऊंडेशन व व्यक्ती गटात मनिष पावडे यांचा सन्मान

## समाजघटकांनीही समाजकार्यात आपला सहभाग द्यावाः कुलगुरू

**अमरावती/का.प्र.**

पुरस्कार दिल्यानंतर आपले कार्य संपले असे नाही, तर समाजघटकांनीही सामाजिक कार्यामध्ये आपला सहभाग द्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. २०२५ या वर्षीचा कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणारा श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार संस्था गटात बुलडाणा जिल्ह्यातील वरवंड येथील दिव्या फाऊंडेशनला व व्यक्ती गटात अमरावती शहरातील मनिष रमेशराव पावडे यांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते



ससन्मान प्रदान करण्यात आला. अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी दिव्या फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अशोक काकडे व समाजसेवक मनिष पावडे यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रु. पाच हजार रोख देऊन सन्मान केला व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, दानदात्यांचे प्रतिनिधी व विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही.एम. मेटकर, संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राचे समन्वयक दिलीप काळे, दिव्या फाऊंडेशनचे अध्यक्ष अशोक काकडे, समाजसेवक मनिष पावडे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.पुरस्कारप्राप्त दोन्ही मान्यवरांच्या कार्याला शुभेच्छा देवून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, सुरुवातीला एकच पुरस्कार दिला जात होता. दिव्या फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री अशोक काकडे यांनी संस्था उभारणीचा मागोवा घेतांना एका मनोयात्री महिलेचा प्रसंग सांगितला आणि त्यानंतर आपण एक भूखंड घेऊन तेथे प्रत्यक्ष कामाला सुरूवात केल्याचे सांगून दु:ख निवारण्याचे काम फाऊंडेशनच्या माध्यमातून केले जात असल्याचे ते म्हणाले. मनोयात्रीची सेवाच नाही, तर त्यांना स्वत:च्या पायावर उभे करेपर्यंत फाऊंडेशनचे कार्य आहे.व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.व्ही.एम. मेटकर म्हणाले, माजी आमदार बबनराव मेटकर व दादासाहेब गवई यांचा विद्यापीठाच्या विकासात मोठा हातभार लागला आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या नामकरणातही त्यांचा मोलाचा वाटा आहे. याप्रसंगी स्व. नागोरावजी व स्व. बबनरावदादा मेटकर याच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आराष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविकातून कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी दिव्या फाऊंडेशन व श्री मनिष पावडे यांच्या कार्याची माहिती दिली. सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, तर आभार जनसंपर्क विभागातील श्री ओम जगताप यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, ॲड. यदुराज मेटकर, डॉ. एम.टी. देशमुख, सामाजिक कार्यकर्ते श्री गोविंद कासट, श्री अभिनंदन पेंढारी, श्री मुंधडा, शाम देशमुख, दिपक हुंडीकर, प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, संजय जैन, श्री पावडे, श्री काकडे व श्री मेटकर कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

## विद्यापीठाचा पर्यावरण पुरस्काराचे वितरण ५ मार्च रोजी

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा 'पर्यावरण पुरस्कार २०२४' व 'पर्यावरण पुरस्कार २०२५'जाहीर झाला असून ५ मार्च, २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर दृकश्राव्य सभागृह येथे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते प्रदान होणार आहे. संस्था व व्यक्तिगत अशा दोन गटांमध्ये हा पुरस्कार पर्यावरण संवर्धनासाठी उत्कृष्ट कार्य करणारी संस्था व व्यक्तीला विद्यापीठातर्फे दरवर्षी दिल्या जातो. संस्था गटात शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र आणि रू. १५,०००/- रोख व व्यक्ती गटात शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र आणि रू. १०,०००/- रोख, असे पुरस्काराचे स्वरुप आहे. 'पर्यावरण पुरस्कार २०२४' करीता यावर्षी संस्था गटात हा पुरस्कार जे.डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर, जि. अमरावती या महाविद्यालयाला, तर व्यक्ती गटात नारायणराव नागरे महाविद्यालय, दुसरबिड, ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणाचे प्राचार्य डॉ. विजय हिम्मतराव नागरे यांना पुरस्कार जाहीर झाला आहे. 'पर्यावरण पुरस्कार २०२५' करीता यावर्षी संस्था गटात हा पुरस्कार मातोश्री सुभद्राबाई पाटील कला, विज्ञान व कै. पांडुरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालय, मानोरा, जि. वाशिम या महाविद्यालयाला, तर व्यक्ती गटात अमरावतीचे वसंत माणिकराव पाटील (माजी सैनिक) यांना जाहीर झाला आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी पुरस्कार प्राप्तकर्त्यांचे अभिनंदन केले आहे. तरी पर्यावरण पुरस्कार वितरण समारंभाला सर्वांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, पर्यावरण पुरस्कार निवड समिती २०२४ चे अध्यक्ष डॉ.व्ही.एम. मेटकर व पर्यावरण पुरस्कार निवड समिती २०२५ चे अध्यक्ष डॉ.आर.एम. कडू यांनी केले आहे.

## परवाना नसतांनाही अनोंदणीकृत पीयूसी व ड्रायव्हिंग स्कूल

### प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे तक्रार

**खल्लार/वार्ताहर**

कोणताही नोंदणीकृत शासकीय परवाना नसतांनाही खल्लार फाटा व सासन फाटा येथे सर्रासपणे अवैध पि. यु. सी व ड्रायव्हिंग स्कुल विना परवाना सुरु असून याबाबत नोंदणीकृत ड्रायव्हिंग स्कुलच्या संचालकांनी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे लेखी तक्रार करूनही अद्यापही अनोंदणीकृत चालकांवर कारवाई केल्या गेली नाही. खल्लार फाटा व सासन फाटा येथे अनोंदणीकृत असलेल्या सेंटरवरुन अवैध पि. यु. सी व ड्रायव्हिंगचे प्रशिक्षण न देता व्यवयाय सुरु केला असून नागरिकांच्या जिवाशी दोन्ही अनोंदणीकृतचे खेळत आहेत. याचा फटका नोंदणीकृत ड्रायव्हिंग स्कुलच्या संचालकांना बसत आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे नोंदणीकृत ड्रायव्हिंग स्कुलच्या संचालकांनी लेखी तक्रार करूनही याकडे परिवहन कार्यालयाचे दुर्लक्ष होत आहे. दोन्ही अनोंदणीकृत सेंटरवर प्रादेशिक परिवहन विभागाने तातडीने कारवाई करावी अशी मागणी नोंदणीकृत ड्रायव्हिंग स्कुलच्या संचालकांनी केली.




GHARKUL Masale
पाहिजेत
ब्रँडेड अगरबत्ती घरोघरी विक्रीकरिता महिला व पुरुष पाहिजे.
: संपर्क :
घरकुल मसाले फॅक्टरी,
एमआयडीसी. अमरावती

## मेळघाटात ‘अनोखी जोडी’

# लांडगा आणि ढोलांचा शांत सहवास

## -आंतरप्रजाती सहजीवनाची दुर्मिळ नोंद

कळपाच्या अग्रस्थानी प्रौढ लांडगा, मेळघाटातील पहिली घटना



**अमरावती/प्रतिनिधीः-** वन्यजीव अभ्यासकांनाही थक्क करणारा प्रसंग मेळघाटच्या जंगलात नोंदवला गेला आहे. सहसा वेगवेगळ्या अधिवासात आढळणारे भारतीय राखाडी लांडगा आणि ढोल (आशियाई रानकुत्रा) हे दोन ‘कॅनिड’ प्राणी एकत्र, तेही पूर्ण शांततेत फिरताना दिसले. विशेष म्हणजे या गटाचे नेतृत्व एका प्रौढ लांडग्याकडे असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पच्या बफर क्षेत्रात ज्येष्ठ वन्यजीव अभ्यासक व मानद वन्यजीव रक्षक डॉ. सावन देशमुख यांनी भारतीय राखाडी लांडगा (Indian wolf) आणि चार ढोल (Dhole) यांचा समन्वयाने फिरणारा गट जवळपास ४० मिनिटे पाहिला. या काळात कोणतीही गुरगुर, झेप किंवा वर्चस्वासाठी संघर्षाचे संकेत आढळले नाहीत. लांडगा प्रामुख्याने मोकळी गवताळ कुरणे, शुष्क माळराने व कृषी-पशुपालक भागात आढळतो; तर ढोल दाट पानझडी व सदाहरित जंगलात कळपाने वास्तव्य करतो. त्यामुळे या दोन मोठ्या सामाजिक ‘कॅनिड’ प्रजातींचा असा मैत्रीपूर्ण सहवास दुर्मीळ मानला जातो. भारतीय वन्यजीव अभ्यासात ही केवळ तिसरी नोंद असल्याचे सांगितले जाते; मेळघाटात मात्र ही पहिलीच घटना ठरली आहे. निरीक्षणातील सर्वात लक्षवेधी बाब म्हणजे प्रौढ लांडगा गटाच्या अग्रभागी राहून हालचालींना दिशा देत असल्याचे स्पष्ट दिसले. ढोलांच्या कळपात ठरावीक सामाजिक शिस्त असते; अशा वेळी ☞(पान २ वर)

# डाकघर बचत बँकेतून काढलेल्या रक्कमेत नोटा कमी

## -अंजनगाव डाकघर कार्यालयात घडला प्रकार

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी येथील डाक बचत बँकेत २४ फेब्रुवारी २०२६ रोजी माजी पंचायत समिती सभापती अमुताई हिरोळे यांनी १ लाख ५० हजार रुपये काढले. गर्दी असल्यामुळे कर्मचाऱ्यांवर विश्वास ठेवून त्यांनी घरी जाऊन पैसे मोजले, तेव्हा ४६०० रुपये (२०० रुपयांच्या २३ नोटा) कमी आढळले. दुसऱ्या दिवशी तक्रार केली तेव्हा डाक विभागाने ‘आम्ही पूर्ण रक्कम दिली, तुम्ही काउंटरवरच मोजायला हवे होते’ असे सांगितल्या गेले. त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांवरील विश्वास टाकल्यामुळे आपल्याकडुन झालेल्या चुकीवर पश्श्चाताप करण्याची वेळ आली आहे. मात्र त्यापायी त्यांना आर्थिक भुर्दंडासह मानसीक त्रासाला समोरे जावे लागले असुन संबंधीतांविरोधात तक्रार करण्यात आली आहे.



> मी काऊंटरवर रक्कम मोजली नाही ती माझी चुकी आहे. पण माझ्या १ लाख ५० हजार रुपयांच्या बडल मध्ये दोनशे रुपयांच्या २३ नोटा कमी होत्या. माझा हाच उद्देश माझ्या सोबत असे झाले तसे इतर खातेदारा सोबत होऊ नये व भारतीय डाक विभागाने प्रत्येक अकाउंटवर पैसे मोजण्याची मशिन व सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे जेणेकरून असा प्रकार कोणासोबत होणार नाही
> **-अमुताई हिरोळे,** खातेदार

माजी पंचायत समिती सभापती अमुताई हिरोळे यांनी शहरातील पोस्ट ऑफिसमधुन १,५०,००० रुपये काढले परंतु ते कमी भरले कॅश काउंटरवर पैसे मोजून घेणे ही ग्राहकाची प्राथमिक जबाबदारी असते. काउंटर सोडल्यावर नंतर तक्रार करणे कठीण होऊ शकते. याची जानिव दोघाही माजी लोकप्रतिनीधी असलेल्या पती-पत्नीला असल्याने त्यांचे पती माजी सरपंच प्रेमदास हिरोळे व स्वतः त्यांनी आपली कैफीयत पत्रकारांसमोर मांडल्यावर त्यांच्या सोबत स्थानिक पत्रकार डाक विभागात सीसीटीव्ही फुटेज तपासणी करण्यासाठी साठी गेले असता ☞(पान २ वर)

# २१४ जागांसाठी झुंज; ९,२९० उमेदवार पुढील फेरीत

## अमरावती ग्रामीण पोलीस भरती २०२५-२६ ची शारीरिक चाचणी यशस्वी

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती ग्रामीण पोलीस दलाच्या २०२५-२६ भरती प्रक्रियेत शारीरिक चाचणीचा टप्पा यशस्वीरीत्या पार पडला असून तब्बल ९,२९० उमेदवारांनी पुढील लेखी परीक्षेसाठी पात्रता मिळवली आहे. ११ ते २६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पार पडलेल्या या प्रक्रियेत २१४ पदांसाठी उमेदवारांमध्ये चुरस पाहायला मिळाली.

भरतीसाठी ऑनलाईन पद्धतीने २१,२०६ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १६,२८६ पुरुष तर ४,९२० महिला उमेदवार होते. पुरुष व महिला मिळून ९,२९० उमेदवारांनी शारीरिक चाचणीची अडथळा शर्यत पार केली असून ते आता लेखी परीक्षेच्या मैदानात उतरणार आहेत. भरतीदरम्यान उमेदवारांसाठी वसंत हॉल, अमरावती येथे मोफत निवासाची व्यवस्था करण्यात आली होती. लहान बाळ☞(पान २ वर)

## २२ वी बालनाट्य स्पर्धा अंतिम फेरी

# दुसऱ्या दिवशी ६ बाल नाट्यांची दर्जेदार प्रस्तुती

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र शासनाच्या वतीने सांस्कृतिककार्य संचालनालयाच्या माध्यमातून मराठी बाल नाट्यस्पर्धेची अंतिम फेरीच्या दुसऱ्या दिवशी दर्जेदार ६ बाल नाट्यांची सादरीकरण शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी अमरावती मधील छत्रपती श्री. शिवाजी महाराज सभागृह येथे प्रेक्षकांच्या उत्स्फुर्त प्रतिसादात सादर झाले.



सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली बाल नाट्य स्पर्धेची ही अंतिम फेरी सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे यांच्या देखरेखीत सुरु झाली असून एकापेक्षा एक सरस नाटकांचे सादरीकरण होत आहे.

शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून कोल्हापूर येथील अलंकार कला अकादमी फाउंडेशनचे चेटकीणीच्या बंगल्यात, बहुजन एजुकेशन सोसायटीचे डॉ. सतीश साळुंखे लिहित झाले मोकळे आभाळ, भरवी कला अकादमी अचलपूरचे अबोलांचे बोल, छत्रपती सेवाभावी संस्था परभणीचे शेख आसिफ दिग्दर्शित बेला, सिटी हायस्कूल सांगली येथील सागर सगरे दिग्दर्शित जंगल स्कूल, गोपाला फाउंडेशन परभणीचे बालाजी दामुके☞(पान २ वर)

# चाकूच्या धाकावर लुटणारा ताब्यात

## -वरुड येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** चाकूच्या धाकावर तरुणाला लुटणाऱ्या आरोपी राहुल उर्फ चाटी राजू तडस (वय २५, पोस्ट ऑफिसच्या मागे ब्रह्मपुरी, वरुड )याला गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. त्याच्या कडून मोबाईल व रोख सह १० हजार ९४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीला पुढील कारवाईसाठी वरुड पोलिसांनी ताब्यात देण्यात आले आहे.



माहिती नुसार हर्षल साहेबराव माकोडे (वय २६, देशमुख पुरा) यांनी तक्रार दिली होती की, ते गुरुवारच्या रात्री ८.३० वाजता दरम्यान ब्राह्मणपुरा☞(पान २ वर)

# अचलपूर नप लेखा विभागाच्या मनमानी कारभारामुळे कंत्राटदार त्रस्त

## -शासकीय कामे पूर्ण करूनही देयक रखडली

**-कंत्राटदारावर उपासमारीची वेळ**

**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा शहरातील अचलपूर नगर परिषद कार्यालयातील लेखा विभागाच्या गलथान कारभारामुळे कंत्राटदार मंडळी त्रस्त झाली आहे.अचलपूर नगर परिषद अंतर्गत शासकीय विकासकामे कर्ज घेऊन अनेक कंत्राटदारानी पूर्ण केली आणि देयक प्राप्त झाल्यास कर्जाची रक्कम फेडू ही आशा त्यांची २- ३ महिन्यापासून प्रलंबित आहे. यात अचलपूर नगर परिषद लेखा विभागातील अधिकारी मंडळी दुर्लक्ष करीत आहे .या विभागांतर्गत शासकीय कामाची देयके ,कर्मचाऱ्यांचा पगार व विविध कामे केली जातात . पण या विभागातील कार्यरत अधिकारी आपल्या मनमर्जी प्रमाणे कारभार करीत असल्याची प्रतिक्रिया कंत्राटदार मंडळींनी दिली आहे .अनेक कंत्राटदार नगर परिषद अंतर्गत मंजूर असलेल्या☞(पान २ वर)



# वरुडमध्ये ‘कृष्णा लॉज’वर पोलिसांचा सापळा; देहव्यापार उघड

## - बनावट ग्राहकाद्वारे कारवाई यशस्वी

**-एक जेरबंद; दोन महिलांची सुटका**


**अमरावती/प्रतिनिधीः-** बसस्थानक परिसरातील एका लॉजमध्ये सुरू असलेल्या अनैतिक कारवायांवर ग्रामीण गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलिसांनी संयुक्त धाड टाकत शुक्रवारी दुपारी मोठी कारवाई केली. वरुडमधील ‘कृष्णा लॉज’ येथे देहव्यापार चालवला जात असल्याची गुप्त माहिती मिळताच पोलिसांनी योजनाबद्ध सापळा रचला आणि प्रकार रंगेहात पकडला.

गोपनीय माहितीची खात्री करून ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने वरुड पोलीस ठाणे यांच्या सहकार्याने छाप्याची आखणी केली. पथकाने बनावट ग्राहक पाठवून खात्री केली. त्यानंतर अचानक धाड टाकत लॉजमधील कारवाया उघडकीस आणल्या. या कारवाईत प्रमोद रघुनाथ चव्हाण (वय ४२, रा. वरुड) ☞(पान २ वर)

# महावितरण अचलपूर विभागीय कार्यालयाला वृक्षतोड प्रकरणी नोटीस

## -अन्यथा दंडात्मक कारवाई चा दिला इशारा

**अचलपूर/प्रतिनिधीः-** गेल्या अनेक दिवसापासून चर्चेत असलेले परतवाडा येथील ऑक्सिजन पार्क मध्ये महावितरण विभागीय कार्यालयाकडून केलेल्या वृक्षतोडी बाबत अचलपूर नगरपरिषद प्रशासनाने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे .यात फांद्या कापणी न करता थेट महावितरण कंपनी अचलपूरकडून नेहमी पूर्ण झाड किंवा अर्ध्यातूंन झाड तोडली जातात असा आरोप सुद्धा आदिवासी परिवर्तन सामाजिक संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. यामुळे या प्रकरणी आता पुढे काय घडते ? याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.



> या संदर्भात माहिती घेऊन प्रतिक्रिया देतो, अशी प्रतिक्रीया महावितरण विभागीय कार्यालय,अचलपूर येथील कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे यांनी दिली.

गेल्या २१ फेब्रुवारी रोजी महावितरण कंपनीने अवैधरित्या विना परवानगी २४ उंबर झाडे व ६ पिंपळची☞(पान २ वर)

# ‘कार्ड मर्ज’चा सापळा; ओटीपी सांगताच १.४४ लाखांचा फटका

## - एसबीआय कस्टमर केअरचा बनाव


**अमरावती/प्रतिनिधीः-** सायबर गुन्हेगारांनी आता ‘कार्ड मर्ज’चा नवा फंडा वापरत शहरातील एका युवकाला तब्बल १ लाख ४४ हजार ९४६ रुपयांचा आर्थिक फटका दिला आहे. स्वतःला स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) क्रेडिट कार्ड ग्राहक सेवा प्रतिनिधी असल्याचे भासवून एका महिलेने विश्वास संपादन केला आणि ओटीपी मिळवतच रक्कम लंपास केली.




लक्ष्मी नगर परिसरातील रोशन राजेंद्र अब्रुक यांना २० फेब्रुवारी रोजी अज्ञात क्रमांकावरून कॉल आला. संबंधित महिलेने, ‘आपल्या आयआरसीटीसी☞(पान २

# ६ मार्चला मनपाला मिळणार स्थायी समिती सभापती

## -नवनियुक्त समितीची पहिली बैठक



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेच्या नवनियुक्त स्थायी समिती सदस्यांची पहिली बैठक ६ मार्च रोजी होणार आहे. विभागीय आयुक्त डॉ.श्वेता सिंगल यांनी या बैठकीला मंजुरी दिली आहे. पहिल्याच बैठकी मध्ये स्थायी समिती सभापतीची नियुक्ती होणार आहे. समिती मध्ये महायुतीला बहुमत आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचा सभापती होणार अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

पहिल्या सभेसाठी मनपा प्रशासनाच्या वतीने विभागीय आयुक्तांना पत्र पाठविण्यात आले होते. त्यानुसार सहा मार्च रोजी ही सभा होणार आहे. १६ सदस्यीय समितीमध्ये भाजपा, युवा स्वाभिमान पार्टी, राष्ट्रवादी अजित पवार गटाला स्पष्ट बहुमत आहे. समितीमध्ये भाजपाचे पाच, युवा स्वाभिमानचे ३, राष्ट्रवादीचे दोन सदस्य आहे आणि दुसरीकडे विरोधी पक्षामधून कॉंग्रेसचे ३, एमआयएमचे २ सदस्य आहे. तसेच शिवसेना व बसपा गटाचाही एक सदस्य या समितीमध्ये आहेत. स्थायी समिती सभापती महायुतीचा होणार असल्याने भाजपा, युवा स्वाभिमान आणि राष्ट्रवादी मधून कोणाला संधी मिळणार याकडे लक्ष लागलेले आहे. राष्ट्रवादी गटाला संधी मिळण्याची शक्यता आहे. महायुती धर्माचे पालन करून राष्ट्रवादी अजित पवार गटाला स्थायी समिती सभापती पद मिळण्याची शक्यता आहे. तिन्ही पक्षाच्या वतीने सभापती पदासाठी रस्सीखेच केली जाणार आहे. स्थायी समितीमध्ये भाजपाकडून पद्मजा कौंडण्य,स्मिता सूर्यवंशी, मिलिंद बाबंल, ☞(पान २ वर)

**समितीमध्ये पक्षनिहाय सदस्य**

- भाजपा - ५
- काँग्रेस - ३
- युवा स्वाभिमान - ३
- राकंपा - २
- एमआयएम- २
- सेना- बसपा गट - १

# तलाठी कार्यालयात धिंगाणा; तिघांना सश्रम कारावास

## -शासकीय कामात अडथळा ठरला महागात

**अमरावती/प्रतिनिधीः-** नांदगाव खंडेश्वर येथील तलाठी कार्यालयात घुसून शासकीय कर्मचाऱ्याला मारहाण करत कामकाज ठप्प केल्याप्रकरणी तिघांना सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश (क्र. १) अश्वघोष डी. रामटेके यांनी २६ फेब्रुवारी रोजी हा निकाल सुनावला.

१३ ऑगस्ट २०२० रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास नांदगाव खंडेश्वर येथील तलाठी कार्यालयात कर्जमाफी अर्जांची छाननी सुरू होती. तलाठी सचिन पुटाणे यांनी ७/१२ उताऱ्यासाठी आलेल्या नागरिकांना ‘सध्या इतर काम सुरू आहे, थोडा वेळ थांबा,’ असे सांगितले. यानंतर आरोपींनी शिवीगाळ व धमक्या देत कार्यालयाचा दरवाजा लाथाबुक्क्यांनी☞(पान २ वर)

# श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात वाढता सहभाग

## -ऐतिहासिक उन्हाळी शिबीराची तयारी

**-विविध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय शैक्षणिक करार**

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्वातंत्र्य चळवळीपासून राष्ट्रहिताची परंपरा जपणारे श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ आज आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा प्रशिक्षण व शैक्षणिक क्षेत्रात आपला ठसा उमटवत आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत होत असलेले शैक्षणिक करार विद्यार्थ्यांसाठी उज्ज्वल भवितव्याची नवी दारे उघडत असून परदेशी विद्यार्थी, खेळाडू व शिक्षकांनाही दर्जेदार प्रशिक्षणासाठी अमरावतीकडे आकर्षित करत ☞(पान २ वर)



> **उच्च शिक्षणाची सुवर्णसंधी-**
> रशियातून शिक्षण पूर्ण करून आलेल्या विद्यार्थ्यांनी सांगितले की, मंडळाच्या प्रयत्नांमुळे त्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण व अनुभव मिळाला. या माध्यमातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा व्यवस्थापन क्षेत्रात व्यक्तिमत्त्व घडविण्याची दिशा मिळाली. विद्यार्थ्यांनी पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, डॉ. श्रीकांत चेंडके, प्रा. डॉ. माधुरी चेंडके व डॉ. श्रीनिवास देशपांडे यांचे आभार मानले.

# धीरूभाई सांगानी यांना पुत्रशोक

**अमरावती :** श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलचे संस्थापक सदस्य तसेच अमरावती शहरातील सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते धीरूभाई सांगाणी यांचे पुत्र चिरंजीव हेमंत उर्फ राजू धीरूभाई सांगाणी यांचे आज सायंकाळी वयाच्या ६२ व्या वर्षी दुःखद निधन झाले. गेल्या काही दिवसापासून ते किडनीच्या आजाराने ग्रस्त होते. त्यांची अंत्ययात्रा उद्या शनिवार दिनांक २८ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेअकरा वाजता धीरूभाई सांगानी यांच्या कॅम्प रोडवरील केशव कॉलनी मधील निवासस्थानावरून निघणार आहे.

## यवतमाळ जिल्ह्यात १६ मे पासून जनगणनेचा पहिला टप्पा

# ‘संकल्प शिबिर’, ‘निरोगी गाव’ व शेती पांदण रस्ता योजनांना गती

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** २०२७ च्या जनगणनेसाठी जिल्हा प्रशासनाने सर्वसमावेशक आणि कालबद्ध कृती आराखडा तयार केला असून जनगणनेचा पहिला टप्पा १६ मे २०२६ पासून सुरू होणार आहे. जिल्हा दंडाधिकारी विकास मीना यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती देताना सांगितले की, ही प्रक्रिया दोन टप्प्यांत राबवली जाईल. पहिल्या टप्प्यात १६ मे ते १४ जून २०२६ दरम्यान घरांची यादी तयार करणे व गृहसंख्या गणना केली जाईल, तर दुसऱ्या टप्प्यात फेब्रुवारी २०२७ मध्ये लोकसंख्या गणना पार पडेल.

जनगणनेसाठी जिल्हा दंडाधिकारी मुख्य जनगणना अधिकारी म्हणून काम पाहतील. निवासी उपविभागीय दंडाधिकारी यांची जिल्हा जनगणना अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व उपविभागीय अधिकारी उपविभागीय जनगणना अधिकारी म्हणून कार्यरत राहतील. ग्रामीण भागातील १६ तहसीलदार तसेच १७ नगरपरिषद व नगर पंचायतींचे मुख्य अधिकारी प्रभारी अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळतील. जिल्ह्यातील २,१२६ गावे आणि २५५ शहरी वॉर्डांचा या प्रक्रियेत समावेश आहे.




लोकसंख्या निकष (७०० ते ८०० नागरिक प्रति गट) लक्षात घेऊन ग्रामीण भागात ४,०६७ आणि शहरी भागात १,२३३ असे एकूण ५,३०० हून अधिक गणना गट तयार करण्यात आले आहेत. या कामासाठी ४,००० हून अधिक प्रगणकांची नियुक्ती केली जाणार असून ६७८ ग्रामीण व २०६ शहरी पर्यवेक्षक तैनात केले जातील. प्रशिक्षणाची प्रक्रिया तीन टप्प्यांत राबवली जाईल. पहिल्या टप्प्यात यशदा येथे मास्टर ट्रेनरना प्रशिक्षण दिले जाईल. त्यानंतर जिल्हास्तर व प्रभारी स्तरावरील अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले जाईल. तिसऱ्या टप्प्यात तहसील स्तरावरील गणना गट व पर्यवेक्षकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाईल.

दरम्यान, ‘छत्रपती शिवाजी महाराज संकल्प शिबिर’ अभियानाचा टप्पा-२ सुरू करण्यात येणार असून प्रलंबित तक्रारी, अर्ज व शासकीय योजनांशी ☞(पान २ वर)